# अर्थ, उद्योग, कर आणि कायदे

लेखक : प्रा. पुनम सिंगवी




विनामूल्य ‘इ’ संदर्भ पुस्तिका

# अर्थ, उद्योग, कर आणि कायदे


**लेखक**

**प्रा. पुनम सिंगवी**


**(विनामूल्य 'ई' संदर्भ पुस्तक)**

या पुस्तकातील लेखांचा कालखंड १९७६ ते १९९७ असा आहे. साहजिकच या लेखांतील राजकीय व आर्थिक धोरणांबाबतचे संदर्भ तसेच कायद्यांचा उल्लेख हा त्या त्या काळातील आहे. या लेखांतील अर्थशास्त्रविषयक मूलभूत तत्त्वे आणि तांत्रिक बाबी या कालातीत असल्यामुळे हे लेख संदर्भ म्हणून अर्थशास्त्राचे ज्ञान मिळवण्यासाठी उत्कृष्ट आधारलेख आहेत. परंतू या लेखांचा वापर नवीन कायदे आणि नियम समजून घेतल्याशिवाय करणे योग्य होणार नाही.

निवेदन

या पुस्तकातील लेखांचा कालखंड १९७६ ते १९९७ असा आहे. साहजिकच या लेखांतील राजकीय व आर्थिक धोरणांबाबतचे संदर्भ तसेच कायद्यांचा उल्लेख हा त्या त्या काळातील आहे. या लेखांतील अर्थशास्त्रविषयक मूलभूत तत्त्वे आणि तांत्रिक बाबी या कालातीत असल्यामुळे हे लेख संदर्भ म्हणून अर्थशास्त्राचे ज्ञान मिळवण्यासाठी उत्कृष्ट आधारलेख आहेत. परंतू या लेखांचा वापर नवीन कायदे आणि नियम समजून घेतल्याशिवाय करणे योग्य होणार नाही.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (तुरुंगवास व दंड) होऊ शकते. This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

त्यांनी ई साहित्य प्रतिष्ठानला याचे ई पुस्तक विनामूल्य वितरित करण्या्चे कायदेशीर अधिकार दिले आहेत. त्यानुसार आम्ही आमच्या वाचकांना ते पुस्तक विनामूल्य देत असून त्यांनी ते आपल्या ओळखीच्या वाचकांत विनामूल्य वितरित करावे ही विनंती करत आहोत.

ई साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com
www.esahity.com
www.esahity.in

## पुस्तकं वाचून कोणाला शहाणपण येतं का?

हो! आम्ही म्हणतो हो. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

अनुभवाहून मोठा गुरू नाही. कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. काही प्राण्यांना त्यांचे जन्मदाते थोडं शिक्षण देतात. बाकीचे प्राणी अनुभव घेत घेत शिकतात. फक्त मानवच असा प्राणी आहे ज्याला पुर्वीच्या पिढीतल्या माणसांचे अनुभवही शिकवतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

**अनुभव पुस्तक असतात आणि पुस्तक अनुभवच असते.**

**वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे**.

www.esahity.in आणि www.esahity.com

मंडळी!
वाचायला तर हवंच!
पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...
...आणि स्वतःही लिहायला हवं.

# अनुक्रमणिका


लेखकाचे मनोगत ........ ०३
१. केंद्रीय अर्थसंकल्प तयार होतो तरी कसा? ........ ०५
२. पंचवार्षिक योजना, वार्षिक अर्थसंकल्प आणि कर कायदे ........ ०८
३. औद्योगिक विकासात लोकसंख्येचा अडसर? ........ १४
४. भ्रष्टाचाराचे निर्मूलन कसे होऊ शकेल? ........ १९
५. नकारात्मक आंदोलन नको! ........ २३
६. काळ्या पैशाबाबत काही सूचना ........ २८
७. बेनामी गुंतवणूक करून नामानिराळे होता येत नाही! ........ ३२
८. गुंतवणुकीचा गुंता सोडवाल कसा? ........ ३५
९. कर नियोजन व बचत यांचे आणखी एक प्रभावी साधन-मृत्युपत्र ........ ३९
१०. आयकर निवेदन पत्र भरण्याचे महत्त्व
(Income Tax Return) ........ ४२
११. गृहसंपत्तीपासून मिळणारे उत्पन्न ........ ४५
१२. गुडविल म्हणजे काय? ........ ४९
१३. आयकर पद्धती : भारत व जपान (पूर्वार्ध) ........ ५४
१४. आयकर पद्धती : भारत व जपान (उत्तरार्ध) ........ ५८
१५. भागीदारी संस्था व खासगी मर्यादित कंपनी ........ ६२
१६. प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे रूपांतर का व कसे? ........ ६६
१७. जपानला भीती दक्षिण कोरियाची आणि तैवानची! ........ ७१
१८. उद्योजक महाराष्ट्र ........ ७५
१९. प्रगतीची विलोभनीय झेप ........ ७८

# लेखकाचे मनोगत

इसवी सन. १९६६ मध्ये चार्टर्ड अकाउन्टंटची सनद मिळवल्यानंतर सन १९९६ पर्यंत मी प्रामुख्याने 'हिशेब तपासनीस आणि कर सल्लागार' म्हणून कार्यरत होतो. 'सिंगवी, ओतुरकर ॲण्ड केळकर, चार्टर्ड अकाउन्टंटस' या भागीदारी फर्मच्या माध्यमातून हा व्यवसाय करत असतानाच एक उद्योजक आणि प्राध्यापकाच्या भूमिकादेखील मी निभावल्या.

या विविध भूमिकांमधून कार्यरत असताना माझा अर्थ, उद्योग, कर, कायदे आदी विषयांशी खूप जवळचा संबंध आला आणि त्या विषयांचा अभ्यास करण्याची नुसती आवश्यकताच भासली असे नव्हे, तर त्यांची गोडी लागली. साहजिकच मला त्यातून मिळत गेलेले ज्ञान आणि अनुभवांवर आधारित लिहीत राहण्याची उर्मी झाली.

असे लिखाण करत राहून व्यापक हितासाठी प्रसिद्ध करत राहण्यासाठी मला त्या वेळी माझे एके काळचे माध्यमिक शाळेतील आवडते शिक्षक आणि त्या वेळी 'विवेक' या मराठी साप्ताहिकात उपसंपादक म्हणून कार्यरत असलेले श्री. श्रीधर वासुदेव खरे यांच्याकडून खूपच उत्तेजन मिळाले. असेच उत्तेजन महाविद्यालयीन जीवनातील प्राध्यापक आणि त्या काळातील मार्गदर्शक सहकारी, घनिष्ठ मित्र मुलुंड कॉलेज ऑफ कामर्सचे प्राचार्य डॉ. भ. ग. बापट यांच्याकडून सातत्याने मिळत गेले.

या विषयांवरील माझे त्या वेळचे लेखन हे लेख आणि लेख–मालिकांच्या स्वरूपात साप्ताहिक विवेक, मराठीतील अग्रगण्य दैनिक महाराष्ट्र टाइम्स, सन्मित्र, मुंबई तरुण भारत आदी नियतकालिकांमधून प्रसिद्ध होत गेले. त्या सर्वांप्रती ऋण व्यक्त करावे तेवढे थोडेच होईल.

सदरचे पुस्तक हे अशा निवडक लेखांचे संकलन होय. त्यातील कर, कायद्यांवरचे लेख त्यात्या वेळच्या संबंधित तरतुदींवर आधारित असल्यामुळे साहजिकच त्यांच्यावर स्थळ आणि काळाचे बंधन येते. त्यामुळे त्याच्यावर आधारित असलेले काही दाखले आणि विवेचन आजच्या परिस्थितीत तसेच लागू होईल असे नव्हे. मात्र ऐतिहासिक संदर्भ म्हणून असलेले त्यांचे महत्त्व कसे नाकारता येईल? अन्यथा, भ्रष्टाचार, काळापैसा, नकारात्मक आंदोलने, व्यवस्थापत्राचे महत्त्व आदी अनेक विषयांवर आधारित विवेचन वाचकांसाठी आजच्या संदर्भावरदेखील उद्‌बोधक ठरावे. सदर लेखांचे वाचन अनेकांना भूतकाळातील घटनांची आठवण करून देईल. तर इतर अनेकांना भविष्यासाठी मार्गदर्शक ठरेल अशी आशा करतो.

पुनम सिंगवी

# केंद्रीय अर्थसंकल्प तयार होतो तरी कसा?

**केंद्रीय अर्थसंकल्प असतो कोणाचा?**

– सत्ताधारी पक्षांचा? पंतप्रधानांचा की अर्थमंत्र्यांचा? नियोजन मंडळाचा की राष्ट्रीय विकास मंडळाचा? रिझर्व्ह बँकेचा की नोकरशाहीतील पोलादी चौकटीचा? सर्वसामान्य माणसाच्या हिताचा की अर्थव्यवस्थेतील विविध घटकांच्या हितसंबंधांची जोपासना करणाऱ्या लॉबींचा? राष्ट्रीय फायद्याची जपणूक करणाऱ्यांचा की आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व इतर परदेशस्थ देणेकऱ्यांचा? विचारस्वातंत्र्य व अर्थशास्त्रीय सिद्धान्तावर आधारलेला की मतपेटीच्या कोंदणात अडकलेला? की एका बाजूला मर्यादित साधनसामग्री व दुसऱ्या बाजूला अटळ अनुत्पादित खर्च या दोन टोकांना बांधलेल्या तारेवर कसरत करणाऱ्या डोंबाऱ्याचा?

तारेवरील कसरत तर खरीच, म्हणून तर दरवर्षी त्याची एवढी उत्सुकतेने वाट बघितली जात असावी.

भारताचे माजी पंतप्रधान व काही वर्षे ज्यांनी अर्थमंत्रिपद सांभाळले होते, असे श्री. मोरारजी देसाई यांचे म्हणणे असे की, वरील सर्व प्रश्नांची उत्तरे त्या त्या वेळचा अर्थमंत्री कितपत स्वतंत्र विचार करणारा, दूरदृष्टी व राष्ट्रीय हिताची जाण असणारा, तसाच निर्धारपूर्वक निर्णय घेणारा आहे, यांवर आधारित असतात.

**पूर्वी वचक होता**

एक काळ असा होता की, सत्ताधारी पक्षाच्या विचारांना काही दिशा होती. या पक्षात सरकारबाहेरही वचक असणारी माणसे होती. ज्यांचे ऐकावे, असा दरारा असणारे मुख्यमंत्री राज्यांच्या राजधानीत होते. नियोजन मंडळाला मान होता व विरोधकांचे म्हणणे ऐकण्याचे सौजन्य होते. त्याचबरोबर अर्थसंकल्प सादर करणाऱ्यांकडे स्वतःचे खंदे विचार असायचे आणि त्यावर त्यांची ठाम निष्ठा असायची. ज्यांच्या हेतूंविषयी सरास शंका घेतली जाऊ नये, अशी पोलादी चौकट होती.

अलीकडील काळात अर्थखात्याने ही बंधने झुगारलेली दिसतात. त्याचबरोबर काही नवीन बंधनांचा स्वीकार केलेला दिसतो. सगळ्यात मोठे बंधन म्हणजे मर्जी व खुर्ची सांभाळणे. मतपेटीचे बंधनही तेवढेच मजबूत

असते. वाढता अनुत्पादित खर्च व त्यातून उद्भवणारी लाचारी हे एक तिसरे, पण तेवढेच जोरकस बंधन. त्याचबरोबर दोन अर्थसंकल्पांच्या मध्येच वाटेल तेव्हा आणि वाटेल तेवढी करवाढ करण्याची शोधून काढलेली पळवाटही महत्त्वाची.

अशी गुंतागुंतीची पार्श्वभूमी लाभलेला अर्थसंकल्प सर्वसाधारणपणे दरवर्षी फेब्रुवारी महिन्यातील शेवटच्या दिवशी लोकसभेला सादर करण्यात येत असला, तरी तो तयार करण्याची खरी प्रक्रिया सुरू झालेली असते जून अखेरपासूनच. तोवर फेब्रुवारीत सादर झालेल्या अर्थसंकल्पातील तरतुदी अमलात आलेल्या असतात. त्याचे बरेवाईट परिणाम दिसायला लागतात. अर्थसंकल्पातील आकडेवारीला प्रमुख आधार असतो रिझर्व्ह बँकेने गोळा करून प्रसिद्ध केलेल्या माहितीचा व वस्तुनिष्ठ अहवालाचा. या बँकेचे वर्ष संपते ३० जूनला. त्यानंतर हिशेब वगैरे पूर्ण होऊन वार्षिक अहवाल ताळेबंदासह केंद्र सरकारकडे सादर होईस्तोवर सप्टेंबर उजाडतो. या वार्षिक अहवालाबरोबरच 'रिपोर्ट ऑन ट्रेण्ड अॅण्ड प्रोग्रेस ऑफ बँकिंग' व 'रिपोर्ट ऑन करन्सी अॅण्ड फायनॅन्स' असे दोन वेगळे अहवालही या बँकेकडून सरकारला सादर होत असतात. रिझर्व्ह बँकेबरोबरचा सुसंवाद व माहिती गोळा करण्याचे काम अर्थमंत्रालयातील अधिकारी व स्वतः अर्थमंत्री वर्षभर सतत करतच असतात.

**महत्त्वाची भूमिका**

रिझर्व्ह बँकेबरोबरच अर्थसंकल्प तयार करण्यात तेवढीच महत्त्वाची भूमिका बजावतात अर्थखात्यातीलच विविध कार्यशाखा. डिपार्टमेन्ट ऑफ एक्स्पेंडिचर, डिपार्टमेन्ट ऑफ रेव्हेन्यू, डिपार्टमेन्ट ऑफ इकॉनॉमिक अफेअर्स इत्यादी.

उद्योग, व्यापार, शेती, संरक्षण इत्यादी सर्व महत्त्वाच्या व कमी महत्त्वाच्या खात्यांकडूनही माहिती मागवण्याचे काम सतत चालू असते. शेतकी विभागातील उत्पन्नाचे खरे आकडे मिळवणे अतिशय जिकीरीचे काम असते. नियोजन मंडळ, अर्थमंडळ, राष्ट्रीय विकास मंडळ व राज्य सरकारांच्या मागण्या व त्यांचे विचार समजून घेण्याचे कामही सतत चालू असते. शेअर बाजार व भावांच्या पातळीवर सतत लक्ष असते. डिसेंबर–जानेवारीत उद्योग आणि व्यापार क्षेत्रांतील विविध प्रातिनिधिक

संघटनांची मते व विचार ऐकले जातात. काही बाबींवर कायदे खात्याचा सल्ला घेतला जातो.

**पंतप्रधानांशीच चर्चा**

हे सर्व करत असताना, त्याचा आगामी अर्थसंकल्पाशी काही संबंध आहे किंवा त्याचा कसा उपयोग करून घेतला जाणार आहे, याचा सुगावा लागू न देण्याची दक्षता घेतली जाते. पंतप्रधान आणि इतर मंत्र्यांचा सल्ला घेतला जात असला, तरी अर्थसंकल्पातील प्रत्यक्ष तरतुदींबद्दल चर्चा मात्र फक्त पंतप्रधानाशीच होत असते. अर्थमंत्री खंबीर असला, तर तो पंतप्रधानांचे विचार ऐकून ते सामावून घेण्याचे सौजन्य दाखवत असला, तरी त्यांची ढवळाढवळ मात्र होऊ देत नाही. पंतप्रधानही सहसा तसे करत नाहीत. अर्थसंकल्प सादर करण्यापूर्वी फक्त अर्धा तास आधी लोकसभेच्या दालनात मंत्रीमंडळातील इतर सर्व सहकाऱ्यांना वेगळे घेऊन, तरतुदींची माहिती दिली जाते. तेथून तडक त्यांना लोकसभेच्या अर्थसंकल्पीय बैठकीस नेले जाते.

अर्थसंकल्प तयार करणाऱ्या अधिकाऱ्यांना व इतर कर्मचारी वर्गांना अर्थसंकल्प सादर करण्यापूर्वीच्या तयारीचे दोन-तीन दिवस कार्यालयातच ठेवण्यात येते. गोपनीयता सांभाळण्यासाठी इतर कोणाला भेटता येत नाही की टेलिफोनवर संपर्क साधता येत नाही.

असा हा अर्थसंकल्प आपले नवे अर्थमंत्री दि. २९ फेब्रुवारीस सादर करणार आहेत, जो १९८८-८९ या वर्षासाठी असेल.

महाराष्ट्र टाइम्स, २९-०२-१९८८

* * *

# पंचवार्षिक योजना, वार्षिक अर्थसंकल्प आणि कर कायदे

आपला देश स्वतंत्र झाला तो समाजवाद आणि नियोजनबद्ध अर्थव्यवस्थेचा वसा घेऊनच. आपले पहिले पंतप्रधान आणि त्यांचे सहकारी यांनी पंचवार्षिक योजनांद्वारे देशाच्या अर्थव्यवस्थेस दिशा आणि गती देण्याची प्रक्रिया सुरू केली.

देशाच्या अर्थव्यवस्थेच्या संदर्भात नियोजन म्हणजे काय? नियोजन म्हणजे देशात एकंदरीत उपलब्ध असलेला पैसा–श्रम–ज्ञान–नैसर्गिक साठा इत्यादी स्वरूपातील संपत्ती व लोकांच्या गरजा लक्षात घेऊन, अशा साधनसामग्रींचा उपयोग अधिकाधिक लोकांच्या जास्तीत जास्त मूलभूत गरजा भागवण्याच्या दृष्टीने करणे. तसेच अशा साधनसामग्रीचा उपयोग उत्पादन वाढवणाऱ्या आणि अर्थव्यवस्थेस गती देणाऱ्या योजनांसाठी करणे.

**देशातील साधनसामग्रीचा आढावा**

त्यासाठी सरकार देशातील अशा साधनसामग्रीचा आढावा घेते. लोकांच्या वैयक्तिक व सार्वजनिक जीवनातील गरजांची माहिती करून घेते. बचतीच्या स्वरूपात ठरावीक काळात सरकार आणि लोकांकडे किती प्रमाणात पैसा उपलब्ध होऊ शकेल याचा आढावा घेते. आणि मग असा आढावा घेतल्यानंतर साधनसामग्रीचा आवाका लक्षात घेऊन योजना तयार करते. त्या योजनेद्वारा देशात कोणत्या नवीन उद्योगांना चालना द्यायची ते ठरवते. त्याचबरोबर सरकारकडे उपलब्ध होणाऱ्या पैशातून संरक्षण, शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, लोककल्याणाच्या योजना यांवर किती खर्च करता येईल ते ठरवते.

सरकारसाठी बराचसा खर्च हा अपरिहार्य असतो. उदा. संरक्षण, अंतर्गत सुरक्षा व कायदेव्यवस्था, व्यवस्थापन इत्यादी खर्च. त्यामुळे बऱ्याच वेळा नियोजनबद्ध अर्थव्यवस्थेत बहुतांश खर्चाचे अंदाजपत्रक आधी ठरवून मग त्याप्रमाणे सरकारी तिजोरीत पैसा कसा जमा होईल हे बघायला लागते.

सरकारकडे पैसे जमा करण्याचे मार्ग अनेक आहेत. त्यांतील प्रमुख म्हणजे, लोकांकडून विविध स्वरूपातील करांद्वारे वसुली करणे. तसेच लोकांना बचत करण्यास उत्तेजन देऊन, काही वेळा सक्ती करून अशी बचत सरकारकडे जमा होईल हे बघणे. तसेच देशांतर्गत व देशाबाहेरून कर्जरूपाने निधी गोळा करणे.

पण एवढे करूनही खर्च आणि उत्पादन यांत जी तफावत राहते, ती सरकार अधिक पैसा निर्माण करून म्हणजेच नोटा छापून, त्या चलनात आणून भरून काढते.

**अर्थसंकल्पाचे प्रयोजन**

एकदा योजना ठरवून ती अमलात आणताना दरवर्षीचे अंदाजपत्रक तयार केले जाते. आणि त्यातूनच उत्पन्न व खर्चाची वरीलप्रमाणे तरतूद केली जाते. म्हणजेच वार्षिक अंदाजपत्रक किंवा अर्थसंकल्पाचे मर्यादित काम म्हणजे योजनेने आखून दिलेल्या चौकटीत राहून एका मर्यादित काळासाठी म्हणजेच एकेका वर्षासाठी नियोजनाची अंमलबजावणी करणे, प्रगतीचा आढावा घेऊन त्याप्रमाणे आवश्यक ती दुरुस्ती, फेररचना इत्यादी करणे.

कर कायद्यांचे काम तर त्याहून अधिकच मर्यादित. सबंध अर्थव्यवस्थेच्या संदर्भात योजनेने आखून दिलेल्या चौकटीत व मार्गांनी, त्या त्या वर्षासाठी कर उभारणी व वसुली करण्यासाठी ठरवलेले दंडक, नियम, दर, पद्धती इत्यादी अशा कायद्यांद्वारे ठरवतात. असे कायदे प्रामुख्याने प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अशा दोन प्रकारचे आहेत, हे आपण मागील लेखातच बघितले आहे. त्यांतील प्रत्यक्ष कायद्यातील आयकर कायदा हा एक कायदा आहे. म्हणजे या सबंध व्यवस्थेत त्याचे महत्त्व किती मर्यादित असायला हवे याची आपणास कल्पना यावी.

पण आज प्रत्यक्षात दिसते ते मात्र काय, तर वार्षिक अर्थसंकल्प आणि त्याद्वारे सुचवण्यात येत असलेल्या कर कायद्यातील, विशेषत: आयकर कायद्यातील बदलास अतोनात महत्त्व येत चालले आहे. दरवर्षीच्या अर्थसंकल्पातील तरतुदींकडे नुसता दृष्टिक्षेप टाकला, तरी असे लक्षात येते की, त्यातील ७५% पेक्षा अधिक भाग हा आयकर कायद्याला वाहलेला असतो. दूरवाणी, आकाशवाणी इत्यादींवरून प्रसारित होणाऱ्या बातम्यांमधूनदेखील त्याला जबरदस्त महत्त्व दिले जात असते. वास्तविक पाहता, अर्थसंकल्पातील तरतुदींची आकडेवारी बघता, आयकराचा त्यांतील वाटा अगदी नगण्य असाच म्हणायला हवा. मग हे असे का व्हावे? चुकलेल्या वाटा, नियोजन पद्धतीशी फारकत, गुंतलेले हितसंबंध आणि राजकीय चलाखी ही याची प्रमुख कारणे आहेत.

**आयकर तरतुदींना अवास्तव महत्त्व**

लोकांच्या उत्पन्नातील ठरावीक वाटा राष्ट्रीय गंगाजळीकडे ओढणे हा मर्यादित उद्देश आयकर कायद्यामागे असल्याचे लक्षात घेतले, तर त्याला अवास्तव महत्त्व देऊन त्यात वारंवार बदल करायचे कारणच नाही. १९६१ साली अमलात आलेला हा कायदा आत्तापर्यंत जवळजवळ चाळीस वेळा बदलला गेला आणि त्यात दोन हजारांपेक्षा अधिक बदल केले गेले. दर कोष्टकातील बदल वेगळेच! नको त्या उद्दिष्टांशी या कायद्याची सांगड घातली जाऊ लागली. उदा. ठरावीक उद्योगांना प्राधान्य द्यायचे असले की त्यांना आयकरात सूट द्यायची. ठरावीक प्रकारच्या खर्चात अथवा गुंतवणुकीस उत्तेजन द्यायचे. सरकारमधील काही व्यक्तींच्या मनात आले की द्या त्यास सवलती आयकर कायद्यातून! ठरावीक खर्चावर बंधने आणायची असली की घाला त्यावर या कायद्यांद्वारे मर्यादा! निर्यातीस उत्तेजन द्यायचे आहे, द्या त्याला या करांतून सूट! बँकांकडे पैशाचा ओघ वळवायचा आहे? सरकारी ठेवींमध्ये पैसा हवा आहे? द्या त्यावरील करपात्र व्याजात सवलती! त्यामुळे या कायद्याचा मूळ उद्देश आणि साचाच संपूर्ण बदलून गेला आहे. बरे, या ध्येयधोरणात काही सातत्य आहे असे म्हणावे तर तेही नाही. एका वर्षी दिलेली सूट ताबडतोब दुसऱ्या किंवा तिसऱ्याच वर्षी काढली गेल्याची कित्येक उदाहरणे आहेत. निर्यातीस तसेच नवीन शेअर्समधील गुंतवणूक, नवीन उद्योगधंद्यांतील गुंतवणूक, अनेक प्रकारच्या खर्चावरील मर्यादा यासंबंधीच्या तरतुदी ही याची उदाहरणे होत. सामान्यांना दिलासा देण्यासाठी या कायद्यात बदल करत असल्याची घोषणा वारंवार केली जाते. या देशात ज्याला सर्वसामान्य (खरे म्हणजे अतिसामान्य! आणि आपल्या देशात आज अतिसामान्यांचीच संख्या जास्त आहे.) म्हणता येईल अशा व्यक्तींचा आयकर कायद्याशी कधी संबंधच येत नाही. ज्या मध्यमवर्गीयांचा संबंध येतो त्यांना या कायद्याद्वारे फार काही सूट अथवा दिलासा देता येणेच शक्य नाही. त्याचे कारण असे की, या कायद्याद्वारे जेवढी सूट दिली जाते अथवा देण्याची प्रवृत्ती आहे त्याच्या किती तरी अधिक पटीने महागाई वाढत आहे. त्यामुळे गेल्या काही वर्षांत आयकरातील बोजात कपात होत आली असली तरीदेखील या कपातीचा सर्व फायदा हा वाढत्या महागाईमुळे नष्ट झाला आहे, म्हणजेच जाणवेनासा झाला आहे. खालील कोष्टकच बघा ना :–

## वैयक्तिक उत्पन्नावरील आयकराची जबाबदारी

| करपात्र उत्पन्न | करनिर्धारण वर्ष | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १९८०-८१ | १९८१-८२ | १९८२-८३ | १९८३-८४ | १९८४-८५ | १९८५-८६ |
| १५,००० | १,२६० | ९९० | - | - | - | - |
| २०,००० | २,३४० | २,१४५ | १,६५० | १,६५० | १,४०६ | १,१२५ |
| २५,००० | ३,८४० | ३,५२० | ३,३०० | ३,३०० | ३,०९४ | २,५३१ |
| ४०,००० | १०,४०० | ९,५७० | ९,५७० | ९,५७० | ९,५६३ | ८,१५६ |
| ५०,००० | १५,२४० | १३,९७० | १३,९७० | १३,९७० | १४,०६३ | १२,६५६ |
| ८०,००० | ३३,८४० | ३१,०२० | ३१,०२० | ३१,२९५ | ३१,७८१ | २८,४०६ |
| १,००,००० | ४७,०४० | ४३,१२० | ४३,१२० | ४३,८०८ | ४४,५७९ | ३९,६५६ |
| १९७०-७१ च्या संदर्भात रुपयाची किंमत | | | | | | |
| | ०.४६ | ०.३९ | ०.३६ | ? | ? | ? |

वरील कोष्टकावरून असे दिसून येईल की, गेल्या काही वर्षांत आयकरात निश्चितपणे कपात करण्यात आलेली आहे. पण त्याचा फायदा किती उत्पन्नावर किती प्रमाणात मिळतो आहे, तेदेखील लक्षात यावे. तसेच १९७०-७१ च्या किमतींच्या संदर्भात रुपयाची किंमत किती घसरली आहे, तेदेखील लक्षात यावे. (वरील कोष्टकात तीन ठिकाणी कर-आकारणी वर्षासाठीची आकडेवारी उपलब्ध नसल्यामुळे दिलेली नाही.) आणि रुपयांची ही घसरण लक्षात घेता आयकर न भरणाऱ्या व्यक्तींच्या बाबतीत काय सूट मिळाली असेल याचा विचार आपण न केलेलाच बरा!

### सामान्य माणसांना दिलासा नाही

खरे म्हणजे सामान्य माणसांना वार्षिक अर्थसंकल्पातून काही सूट अथवा दिलासा देता येणे शक्य आहे काय? करांच्या दरात कपात करून निश्चितच नव्हे. कारण अप्रत्यक्ष करात दिलेली सूट ही ग्राहकांपर्यंत कधी पोहोचतच नाही. आणि प्रत्यक्ष करातील सूट मागे बघितल्याप्रमाणे अतिशय नगण्य ठरत आहे. त्यामुळे कर न वाढवणे हाच उत्तम मार्ग होय. त्याचबरोबर सामान्यांसाठी कल्याणयोजना आखून त्याचा फायदा परस्पर त्यांना मिळेल हे बघावयास हवे.

**अंमलबजावणीतील ढिलाई**

करकायद्यातील धरसोडीच्या धोरणांमुळे त्या कायद्याच्या अंमलबजावणीत गोंधळ उडून एक प्रकारची ढिलाई देखील येत चाललेली दिसून येते. त्याचबरोबर अंमलबजावणीसाठी लागणाऱ्या प्रामाणिकपणाच्या अभावामुळे काळा पैसा वाढत जाऊन त्याचा परिणाम पुन्हा किंमत वाढीत होत असतो. भ्रष्ट मंत्र्यांसाठी कायदे बदलण्याची भाषा सररास होत असताना भ्रष्ट अधिकाऱ्यांना कायदा आणि नीतिमूल्यांची भीती काय वाटणार? त्यामुळे आज परिस्थिती अशी आहे की, उद्योगधंद्यांपेक्षादेखील भ्रष्ट अधिकारी आणि राजकारणी मंडळींकडील काळ्या पैशाचे प्रमाण अधिक आहे. कायद्याचा बडगा नुसताच उद्योगधंद्यांतील मंडळींना दाखवून काय उपयोग? गेल्या काही वर्षांत आयकर कायद्याखाली घातलेल्या धाडीतून काय निष्पन्न झाले आणि त्याचा पाठपुरावा कसा झाला हे सरकारने जाहीर करावे. असे झाले तर सत्य असेच बाहेर येईल की, यातील बहुतांश प्रकरणे दाबली गेली आहेत. त्यातील काही राजकीय उद्दिष्टांनी प्रेरित होऊन केली होती आणि आता प्रसिद्धीचे काम झाल्यानंतर गुंडाळण्यात आली आहेत.

अशा परिस्थितीत करकायद्यांना अर्थसंकल्पाच्या संदर्भात विकृत महत्त्व प्राप्त होते. वर्षानुवर्षे अर्थसंकल्पातील व्याजाचा बोजा वाढत आहे, हे खालील आकडेवारीवरून लक्षात यावे.

१९८०-८१ – २९५७ कोटी
१९८१-८२ – ३८४३ कोटी
१९८२-८३ – ४४६० कोटी

**दिवाळखोरीच्या दिशेने वाटचाल**

याचा अर्थ आमच्या अर्थसंकल्पांचा आवाका नुसताच वाढत आहे असा होत नसून आम्ही दिवाळखोरीच्या दिशेने वाटचाल करत आहोत असाही होतो. त्यामुळेच एका मागून एक सक्तीच्या बचत योजना, राष्ट्रीय ठेव योजना आणि बेअरर बाँडसारख्या योजना अमलात आणल्या जात आहेत. आणि चांगल्या चालणाऱ्या उद्योगधंद्यांचे आणि बँकांचे ठरावीक कालावधीनंतर राष्ट्रीयीकरण केले जात आहे. त्यामुळेच नियोजन पद्धतीचे उद्दिष्ट विसरले जाऊन आपली अर्थव्यवस्था दिशाहीन अवस्थेत भरकटत चालली आहे की काय असे वाटायला लागते. नियोजनात उत्पादनवाढ

आणि खुली स्पर्धा यांस प्राधान्य असले तर एरवीच्या वाढत्या किमतीसही आवर बसतो. एक गमतीची गोष्ट बघा. एरवी सर्वच क्षेत्रात किंमतवाढ होत असली, तरीदेखील वीज आणि विजाणूवर चालणाऱ्या वस्तूंच्या उदा. कॉम्प्यूटर्स, टेपरेकॉडर्स, रेडिओ, टी.व्ही. इत्यादींच्या किमतीत मात्र तेवढ्या प्रमाणात वाढ होत असल्याचे दिसून येत नाही. उलट काही ठिकाणी घसरणच दिसून येते. वाढती स्पर्धा आणि उत्पादन तंत्रात सतत होणारी सुधारणा हीच याची कारणे आहेत.

म्हणूनच नियोजित अर्थव्यवस्थेतील मूलभूत तत्त्वे लक्षात घेऊन अर्थसंकल्प आणि करकायद्यांचे महत्त्व कमी करणे आवश्यक आहे. लोकांचे आणि सरकारचेही प्रामुख्याने लक्ष हवे ते उत्पादन वाढ आणि त्याद्वारे अधिक उत्पन्न मिळवण्यावर, त्याद्वारेच किमतीदेखील काबूत ठेवता येणे शक्य होईल.

विवेक, २५-०३-१९८४

* * *

# औद्योगिक विकासात लोकसंख्येचा अडसर?

आपला देश स्वतंत्र झाल्यानंतर देशाचा औद्योगिक विकास घडवून आणून सर्वसाधारण जनतेचे जीवनमान उंचावण्याचे लक्ष्य समोर ठेवून आर्थिक आणि औद्योगिक धोरण ठरवण्यात आले.

आपल्या आर्थिक-औद्योगिक धोरणांचा आणि विकासाचा आढावा घेण्यासाठी पन्नास वर्षांचा कालावधी अपुरा आहे असे कोणीच म्हणू शकत नाही.

या पन्नास वर्षात औद्योगिक उत्पादनात वाढ होत आली आहे; पण अपेक्षेएवढी नाही. नवनवीन उद्योगक्षेत्रे आणि उद्योगकेंद्रे अस्तित्वात येत आहेत. पण त्याचबरोबर खेडी ओस पडत आहेत आणि शहरे बकाल होत आहेत. १९७०-७१ साली दरडोई उत्पन्न रुपये ६३३/- एवढे होते. ते १९९०-९१ साली रुपये ४,९८३/- एवढे झालेले आहे. मात्र तरीदेखील दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण जे १९७७-७८ साली ४८.१% होते ते १९८७-८८ साली ४८.३% पर्यंत वाढल्याचे १९९१ च्या शिरगणतीत आढळून आले. याचाच अर्थ, जी काही मर्यादित औद्योगिक वाढ होऊ शकली, ती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत फारशी पोहोचू शकली नाही.

आणि या अपयशाचे खापर आमची नेतेमंडळी आणि अर्थतज्ज्ञ उठसूठ आमच्या प्रचंड लोकसंख्येवर फोडत असतात. ते खरे आहे काय? असल्यास कितपत? आणि नसल्यास का? त्याची इतर कारणे काय असू शकतात? आणि ते खरे असल्यास, लोकसंख्येच्या नियमनाबरोबरच इतर कुठल्या उपायांचा अवलंब केला असता आपल्याला अपेक्षित फळ मिळू शकेल? या सगळ्या प्रश्नांचा थोडक्यात ऊहापोह आपल्याला या लेखात करायचा आहे.

**लोकसंख्येचे प्रमाण**

मुळातच आपली लोकसंख्या प्रचंड आहे हे कितपत खरे आहे? निवळ संख्येच्या बाबतीत विचार करायचा झाला तर आपण 'प्रचंड' आहोत हे खरे आहे. त्याबाबतीत जगात आपण चीनच्या खालोखाल म्हणजे दुसऱ्या क्रमांकावर आहोत.

पण लोकसंख्येचा विचार असा करायचा नसतो. तो देशाच्या जमिनीच्या संदर्भात म्हणजेच दर चौरस किलोमीटरला किती वस्ती आहे,

असा करायचा असतो. १९७१ च्या शिरगणनेप्रमाणे दर चौरस किलोमीटला १७७ आणि १९९१ मध्ये २७३ वस्त्या असल्याचे दिसते. आणि हा लेख लिहत असताना माझ्याकडे इतर देशांची आकडेवारी उपलब्ध नसली, तरी जपान, दक्षिण कोरिया, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी इत्यादी प्रगत देशांच्या तुलनेत ती खूप कमी आहे. याची खातरजमा करून घेता येण्यासारखी आहे. म्हणजेच योग्य परिमाण लावले असता इतर औद्योगिक देशांच्या मानाने आपली लोकसंख्या नक्कीच 'प्रचंड' नाही. मग ती आपल्या औद्योगिक विकासात अडसर कशी काय ठरू शकते?

महत्त्वाचा दुसरा मुद्दा म्हणजे लोकसंख्या ही आमची 'संपत्ती' आहे की 'जबाबदारी' याचा विचार होणे आवश्यक आहे.

**सर्वांगीण विकासाचे घटक**

नैसर्गिक साधनसंपत्ती, मनुष्यबळ म्हणजेच श्रम, भांडवल आणि उद्यमशीलता हे उत्पादनाचे चार प्रमुख घटक होत. या चारही घटकांचा योग्य समन्वय साधून त्यांना कामाला जुंपले जाते, तेव्हा नुसताच औद्योगिक आणि आर्थिक नव्हे तर सर्वांगीण विकास व्हायलादेखील वेळ लागत नाही.

आमच्याकडे नैसर्गिक साधनसामग्री किंवा विकासासाठी आवश्यक अशी जमीन अपुरी आहे असे कोण म्हणेल? म्हणजे त्याची कमतरता नाही.

मनुष्यबळ प्रचंड असल्याचा मुळी आमचा दावाच आहे. आणि निवळ संख्येने तो खरा आहे हे मान्य करायला काहीच हरकत नाही.

उत्पादनाचा तिसरा घटक 'भांडवल' होय. म्हणजेच आपल्या देशात पैसा, द्रव्य यांची कमतरता असली, तरी दुर्भिक्ष नक्कीच नाही. आपल्या आवाक्याबाहेर वाटणाऱ्या अनेक प्रकल्पांसाठी 'जागतिक बँक', 'आंतरराष्ट्रीय नाणेनिधी' यांच्याकडून मदत मिळत असते. तसेच आताच्या मुक्त आर्थिक धोरणामागे परदेशी भांडवलदारदेखील मोठ्या संख्येने वेगवेगळ्या प्रकल्पात प्रचंड गुंतवणूक करायला पुढे येत आहेत. म्हणजेच भांडवलाची उणीव नाही.

उद्योजकता कमी आहे म्हणावे; तर तसेही नाही. अनेक छोटे मोठे देशी-विदेशी उद्योजक वेगवेगळ्या प्रकल्पांच्या योजना घेऊन सातत्याने पुढे येत असतात. सर्वसाधारणपणे देशातील पांढरपेशा वर्गातील लोकही प्रचंड संख्येने उद्योगधंद्यांकडे वळताना दिसून येतात.

म्हणजे उत्पादनाच्या कुठल्याही घटकाची कमतरता नाही. मग तरीदेखील औद्योगिक विकास का नाही? का नाही मिळत आम्हांला औद्योगिक वाढीची फळे? का नाही दिसत देश औद्योगिक विकासाच्या शिडीवर सरसर वर चढताना?

गेल्या पन्नास वर्षात आम्ही आमच्या संपत्तीचे रूपांतर आमच्या जबाबदाऱ्यांमध्ये करण्यात तरबेज झालो आहोत! म्हणूनच आमच्या नद्यांच्या पाण्याचा पुरेपुर उपयोग न करता आम्ही ते पाणी समुद्रात वाहून जाऊ देतो. एवढेच नव्हे तर वर्षानुवर्षे त्यांना येणाऱ्या पुरामुळे कोट्यवधी रुपये मूल्यांचे पीकपाणी, इतर साधनसामग्री आणि मनुष्यप्राणी यांची हानी होत असल्याचे हताशपणे बघत राहतो. वृक्षतोड करताना नवीन वृक्ष लावण्याकडे म्हणावे तेवढे लक्ष देत नाही आणि मनुष्यसंपत्तीला विकासाचे साधन न समजता औद्योगिक विकासातील अडसर समजण्याची प्रचंड चूक करत राहतो.

**कार्यशक्तीचा समन्वय**

प्रत्येक खाणाऱ्या तोंडाबरोबर काम करणारे दोन हात असतात हे आम्ही का विसरतो? परंतु काहीवेळा स्वतःच्या कार्यशक्तीपेक्षा माणसाची भूक वाढली की गैरमार्गाने भूक भागवण्याचे प्रयत्न होतात. आणि मग आपली भूक भागवण्यासाठी इतरांचे नुकसान करण्याची प्रवृत्ती बळावते. स्वतःच्या क्षुल्लक स्वार्थासाठी राष्ट्रीय संपत्तीचा नाश केला जातो. औषधे आणि अन्नपदार्थांमध्येही भेसळ केली जाते. अनेक जिवांचे बळी घेतले जातात. शाळा आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अमली पदार्थांच्या नादी लावले जाऊन देशाच्या पिढ्यानपिढ्या बरबाद केल्या जातात. विकासाच्या प्रयत्नातून निर्माण झालेली संपत्ती भ्रष्टाचाराच्या आगीत खाक होते अन् दोष दिला जातो वाढत्या लोकसंख्येला!

काम न करता चैनीकडे अधिक लक्ष दिले जाते. पैसा 'वापरण्यापेक्षा' उडवण्यावर अधिक भर दिला जातो. कुटुंबाचे आणि समाजाचे जीवनमान सुधारण्याऐवजी विडीकाडी, दारू आणि इतर व्यसनांवरचा खर्च वाढत जातो. रिकामा वेळ आणि पैसा उत्पादित घटकांऐवजी अनुत्पादित घटकांसाठी खर्च व्हायला लागतो. दुसऱ्या बाजूला कार्यशक्तीपेक्षा भूक कमी पडली तर निष्क्रियता वाढत जाते. जीवनमान सुधारण्याची महत्त्वाकांक्षाच नसली तर विकासाचा मार्ग दिसणार कसा?

**समस्या की वरदान?**

आपल्या लोकसंख्येत ४६.५% प्रमाण स्त्रियांचे आहे. स्त्री-पुरुष समानतेच्या या युगातदेखील आम्ही त्यांच्या कार्यशक्तीचा पुरेपूर उपयोग करून घेत नाही. त्याचबरोबर दुसरीकडे समाजातील एखाद्या घटकाची इच्छा आणि पात्रता नसली तरी वेगवेगळ्या क्षेत्रात त्यांच्यासाठी 'आरक्षणे' ठेवण्याचा राजकीय अट्टाहास करतो. अशाने उपलब्ध कार्यशक्तीचा विकास होणार कसा? ज्या घरातून महिलांच्या कार्यशक्तीला योग्य असे उत्तेजन दिले जाते त्या घरातील जीवनमान अधिक चांगले असते. जी गोष्ट व्यक्तीची आणि कुटुंबाची; तीच समाजाची आणि देशाची!

म्हणजेच राष्ट्राच्या औद्योगिक, आर्थिक आणि सर्वांगीण विकासाच्या संदर्भात आमची प्रचंड लोकसंख्या ही अडसर नसून ती विकासाचे एक उत्तम साधन आहे हे आपल्या लक्षात यावे. उत्पादनाचे एखादे साधन विपुल प्रमाणात उपलब्ध असणे ही समस्या नसून ते वरदान आहे. आमची समस्या ती 'संख्या'नसून त्या संख्येचा 'पोत' ही आहे. उपलब्ध मनुष्यबळाचा पोत सुधारून त्याला अधिकाधिक उत्पादक करण्यावर भर देणे आवश्यक आहे. वैयक्तिक पातळीवर हे साधले गेले, तर राष्ट्रीय पातळीवर ते आपोआप साधले जाऊ शकेल. मात्र त्यासाठी पुढील उपाययोजना करता येऊ शकतील.

* श्रमशक्तीची अवहेलना न करता तिचा सन्मान करण्याचा आणि तिच्याकडे संपत्ती म्हणून बघण्याचा दृष्टीकोन ठेवायला हवा.

* शिक्षणाचा व्यापक प्रमाणावर विस्तार करण्याला आणि त्यासाठी आवश्यक त्या खर्चाची तरतूद करण्याला प्राधान्य द्यायला हवे.

* व्यक्ती विकासावर भर द्यायला हवा, प्रत्येक व्यक्तीव्यक्तीस वैध मार्गाने आपले जीवनमान सुधारण्यासाठी उद्युक्त करायला हवे.

* पर्यावरणाचा समतोल साधून नैसर्गिक साधन-सामग्रीचा, विकासाच्या कामात योग्य उपयोग करून घेण्याचे शिक्षण दिले जावे.

* उत्पादनाच्या घटकातील असमतोलामुळे विकास होत नाही. त्यामुळे उपलब्ध घटकाची क्षमता कमी करण्यापेक्षा इतर घटकांच्या पुरवठ्यात वाढ आणि सुधारणा करायला हवी.

* शिक्षण, कार्यशक्ती आणि अनुकूलता पाहून लोकसंख्येतील विविध घटकांचा उपयोग रचनात्मक कामासाठी करून घ्यायचे प्रयत्न व्हावेत.

* श्रमिक कामाविषयीची लाज तरुण पिढीच्या मनातून घालवायला हवी. त्यासाठी शाळा आणि महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या सुटीचा कालावधी कमी करून वर्षातून किमान पंधरा दिवस प्रकल्पावर आधारित श्रमदान करणे सक्तीचे व्हावे. त्यासाठी त्यांना गुण देण्यात यावेत. तसेच पाणी अडवण्याचा एखादा राष्ट्रीय प्रश्न घेऊन, अशा कामासाठी ग्रामपातळीवर प्रकल्प आखले जाऊन ते पूर्ण करण्यासाठी भर द्यायला हवा.

* आर्थिक सुस्थितीत असलेल्या वानप्रस्थी लोकांनी द्रव्यार्जनातून मुक्ती घेऊन रचनात्मक समाजकार्यासाठी आपला जास्तीत जास्त वेळ आणि शक्ती द्यावी.

गेल्या पन्नास वर्षात विकासकार्यासाठी झालेल्या प्रयत्नांना अपेक्षित यश मिळाले नाही याचे कारण आमची वाढती लोकसंख्या नसून प्रचंड प्रमाणात बोकाळलेला भ्रष्टाचार आहे हे समजण्याचे आणि सांगण्याचे धाडस आमचे अर्थतज्ज्ञ ज्या दिवशी दाखवतील त्या दिवशी आमच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासाला खरा वेग येईल.

विवेक, २५-०५-१९९७

* * *

# भ्रष्टाचाराचे निर्मूलन कसे होऊ शकेल?

एखाद्या राष्ट्राच्या अथवा समाजाच्या संदर्भात भ्रष्टाचाराचा अर्थ केवळ आर्थिकव्यवहार अथवा पैशाचा अपहार यांपर्यंतच मर्यादित राहत नाही. मात्र वेगवेगळ्या संदर्भात अधिकाराची वस्त्रे लेवून राष्ट्राच्या संपत्तीचे व नागरिकांचे रक्षण करण्याची जबाबदारी पार पाडणाऱ्या अधिकाऱ्यांकडून होणाऱ्या भ्रष्ट आचाराचे दृश्य परिणाम आर्थिक परिमाणात अधिक जाणवतात हेदेखील तेवढेच खरे. त्यामुळेच भ्रष्टाचाराचा संबंध सर्वसाधारणपणे आर्थिक गैरव्यवहाराशी जोडला जातो.

'भ्रष्टाचार' हा शब्द 'भ्रष्ट' आणि 'आचार' या दोन शब्दांची संधी होऊन तयार झालेला आहे. 'भ्रष्ट' म्हणजे गैर आणि 'आचार' म्हणजे वर्तणूक, वागणे असा साधा सोपा अर्थ लक्षात घेतला तर कुठल्याही व्यक्तीचे गैर प्रकारचे वागणे हे भ्रष्टाचारात मोडते. मग प्रत्येक वेळी अशा वागण्यामुळे राष्ट्राचे अथवा दुसऱ्या व्यक्तीचे सहज दिसणारे असे आर्थिक नुकसान होईलच असे नव्हे. मात्र बहुतांश प्रकरणांमध्ये अशा भ्रष्ट वागण्यामुळे तशी वागणूक करणाऱ्याचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरीत्या आर्थिक अथवा अन्य तऱ्हेचा फायदा झालेला दिसून येतो. असा फायदा एरवी नीतिनियमांच्या चाकोरीत राहून होऊ शकला नसता. थोडक्यात गैरप्रकारे वागून अथवा काम करून (किंवा न करून) इतरांची हानी, दु:ख अथवा नुकसानीचा विचार न करता स्वत:चा फायदा अथवा सुख मिळवण्याचा प्रयत्न करणे म्हणजे भ्रष्टाचार होय.

**विविध क्षेत्रातील भ्रष्टाचार**

मतदारांनी आपल्या सद्सद्विवेकबुद्धीचा उपयोग न करता आपले वैयक्तिक हित साधून देण्याचे आश्वासन देणाऱ्या उमेदवारांना निवडून देण्याचा प्रयत्न करणे हा मतदात्यांचा भ्रष्टाचार होय. वैद्यकीय व्यवसायातील लोकांनी आपल्या रुग्णाईतांचा विचार न करता आपल्याला अधिकाधिक पैसा कसा मिळेल हे बघून त्या दृष्टीने वैद्यकीय सल्ला देणे हा त्यांच्या क्षेत्रातील भ्रष्टाचार होय.

करसल्लागारांनी करदात्यांना प्रामाणिकपणे कर भरण्यास उद्युक्त करण्याऐवजी कायद्यातील त्रुटी अथवा पळवाटांचा आधार देऊन करबुडवेगिरीस मदत करणे हा त्यांच्या व्यवसायातील भ्रष्टाचार होय.

कायद्याची अंमलबजावणी आणि रक्षण करण्याची जबाबदारी पेलणाऱ्यांनी निरपराध लोकांनाच अधिकाधिक त्रास देऊन गुन्हेगारांना संरक्षण देणे हा त्यांच्या क्षेत्रातील भ्रष्टाचार होय. न्यायदान आणि त्याच्या प्रक्रियेत गुंतलेल्या लोकांनी, न्यायदानास विलंब होत राहील अशा प्रकारे खटले चालवत राहणे हा त्यांच्या क्षेत्रातील भ्रष्टाचारच होय.

राजकारणातील भ्रष्टाचाराविषयी काय बोलावे? मतांकडे लक्ष ठेवून संसद व सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षणाची व्यवस्था करणे, आपल्याला पाठिंबा द्यायची शक्यता असणाऱ्या उमेदवारांनाच निवडणुकीसाठी उभे करणे, जात-धर्म व प्रादेशिक जवळीक सांगून मतांची मागणी करणे, आपल्याला प्राप्त झालेल्या विशेष अधिकारांची व सोयीसवलतींची पात्रता नसताना उपयोग करणे, विरोधकांवर खोटे-नाटे आरोप करून मतदारांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करणे, सरकारी अधिकाऱ्यांच्या अधिकारात हस्तक्षेप करणे, तसेच आपल्याला गैरसोयीच्या वाटणाऱ्या लोकांच्या बदल्या घडवून आणण्याचे प्रयत्न करणे, निवडणुकीदरम्यान मतदारांना वारेमाप आश्वासन देत सुटणे, सरकारी खर्चाने आवश्यक असो वा नसो, देश-विदेशी दौरे करीत राहणे, आपले संख्याबळ वाढवण्यासाठी वेगवेगळी आमिषे दाखवून इतर पक्षांतील आमदार, खासदार व कार्यकर्त्यांना आपल्याकडे वळवण्याचा प्रयत्न करणे व निवडणुकीतील आचारसंहिता न पाळणे हे सर्व राजकीय भ्रष्टाचाराचे प्रकार होत. अशी अनेक उदाहरणे देता येतील.

सरकारी अधिकाऱ्यांनी आपल्याला असलेल्या अधिकारांचा नकारात्मक वापर करणे अथवा असलेल्या अधिकारांचा जनहितासाठी अजिबात वापर न करणे, हा त्यांच्या पातळीवरील भ्रष्टाचार होय.

मनुष्य हा समूहप्रिय, कुटुंबप्रिय प्राणी आहे. त्यामुळे तो समाजात व कौटुंबिक जीवनात जेव्हा वेगवेगळ्या भूमिकांतून वावरत असतो, तेव्हा त्याने कसे वागावे, कसे बोलावे जेणेकरून इतरांवर अन्याय न होता, इतरांचे नुकसान न होता आपला विकास साधता यावा; यासाठी काही आचारसंहिता त्या-त्या क्षेत्रासाठी, भूमिकेसाठी कायद्याने, धर्माने सामाजिक व कौटुंबिक स्तरावर ठरवली जाते. अशा आचारसंहितेचे पालन न करता विसंगत असे वर्तन जेव्हा एखादी व्यक्ती करू लागते, तेव्हा त्यास भ्रष्टाचाराचे स्वरूप प्राप्त होते.

आणि हेच निकष सर्वच क्षेत्रात लावले, तर जनमानसात काही अधिष्ठान असलेल्या लोकनेत्यांनी, आपले म्हणणे मान्य व्हावे यासाठी सरकार व इतर लोकांनी ऐकण्याचा अट्टहास धरला तर तोदेखील भ्रष्टाचाराचाच एक प्रकार नाही का ठरणार? उद्देश कितीही श्रेष्ठ आणि प्रामाणिक असला तरी ही नीती भ्रष्ट नाही का ठरणार?

त्यामुळे आज भ्रष्टाचारास विरोध करायचा म्हणजे नक्की काय करायला हवे, कोणास असा नैतिक अधिकार आहे? आणि पाठिंबा देणारे लोक स्वत: भ्रष्टाचारापासून किती मुक्त आहेत?

भ्रष्टाचार हा एखाद्या साथीच्या रोगासारखा पसरत जाणारा, परंतु समाजजीवनात मुरणारा व दीर्घ काळ ठाण मांडून बसणारा रोग आहे. तो साथीच्या रोगासारखा पसरत असला, तरी तेवढ्याच वेगाने आटोक्यात येत नाही. एखादी व्यक्ती एखाद्या क्षेत्रांत वावरताना भ्रष्ट आचरण करून आपला वाजवीपेक्षा जास्त फायदा होतो अशा निष्कर्षाप्रत येते, तेव्हा ती सर्वच क्षेत्रात वावरताना या सर्वच भूमिका निभावताना भ्रष्ट आचरणाचा आधार घेऊ लागते. आणि मग एकेक करत समाजातील सर्वच क्षेत्रांतील अधिकाधिक लोक मोठ्या प्रमाणावर या रोगाची शिकार बनत जातात आणि सबंध समाजजीवनास भ्रष्टाचाराची कीड ग्रासून टाकते, नीती-नियम, कायदे, हे सर्व 'कसे वागावे' यांच्याऐवजी 'कसे वागू नये' याचेच मार्गदर्शक ठरतात आणि अशा भ्रष्ट आचरणाचे चटके अधिकाधिक लोकांना बसू लागतात. आपले कुठेतरी, काहीतरी चुकते आहे याची जाणीव समाजजीवनात कुठेतरी होऊ लागते आणि परिस्थिती बदलण्याचे प्रयत्न केले जाऊ लागतात. मात्र तोवर बराच उशीर झालेला असतो. आणि इलाज करणे तेवढे सोपे राहत नाही. कारण इलाज करणाऱ्या डॉक्टरांनादेखील त्याची लागण झालेली असते. आपले राष्ट्र आज अशा अवस्थेत येऊन पोहोचले आहे.

आणि अशा परिस्थितीत भ्रष्टाचाराचे निर्मूलन करणे म्हणजे मळलेला सदरा स्वच्छ धुऊन काढण्याएवढे ते सोपे नाही. शस्त्रक्रिया करून रोगाचे मूळ दूर करण्याएवढे ते आता सोपे राहिलेले नाही. दोनचार भ्रष्ट मंत्र्यांना अथवा अधिकाऱ्यांना बदलून आरोपणाची पद्धतदेखील अशा वेळी निष्प्रभ ठरते. कारण आरोपण करून नव्याने बदललेले अवयव रोगमुक्त असतीलच असे नाही.

दिवंगत लोकनेते श्री. जयप्रकाश नारायण यांची जनमानसावर खूप मोठ्या प्रमाणावर छाप होती. त्यांच्या भोवतीचे तेजोवलय व नैतिक अधिकारही मोठा होता. व्यापक प्रमाणावर भारतभर भ्रष्टाचार निर्मूलनाचे आंदोलन त्यांनी १९७०-८० च्या कालखंडात उभारले. उत्तरप्रदेशाचे तत्कालीन मुख्यमंत्री अब्दुल गफर व गुजरातचे मुख्यमंत्री चिमणभाई पटेल यांची भ्रष्ट मुख्यमंत्री म्हणून संभावना करून त्यांची उचलबांगडी करण्यासाठी यशस्वी आंदोलन त्यांनी केले. सबंध देशातून वेगवेगळ्या थरातून व्यापक पाठिंबा मिळाला. जे लोक त्या वेळी त्यांच्या चळवळीत सहभागी झाले, त्यातले अनेक आज सत्ताधिष्ठित असून वेगवेगळ्या स्कॅमच्या संदर्भात त्यांची नावे घेतली जातात. ज्या अब्दूल गफूर आणि चिमणभाईंना त्या वेळी भ्रष्टाचाराचे प्रतीक मानले गेले, ते पुन्हा आंदोलनात सहभागी झालेल्यांच्या पाठिंब्यानेच त्यांचे मुख्यमंत्री म्हणून निवडून येऊन आपापल्या राज्यात सत्तेचे दलाल झाले. आंदोलनानंतरच्या काळात भ्रष्टाचार कमी न होता उलट जास्तच फोफावला. हा इतिहास ताजा आहे, त्यामुळे केवळ काही व्यक्तींना बदलून अथवा त्यासाठी नकारात्मक आंदोलन उभारून भ्रष्टाचाराचे निर्मूलन होऊ शकेल असे मानणे हा भाबडेपणा ठरेल.

याचा अर्थ भ्रष्टाचाराचे निर्मूलन होऊच शकणार नाही काय? त्यासाठी काही प्रयत्नच करावयास नकोत काय? याचाच ऊहापोह आपल्याला पुढील लेखात करायचा आहे.

विवेक, १९-०१-१९९७

* * *

# नकारात्मक आंदोलन नको

भ्रष्टाचाराचा संबंध मानवी आचरणाशी आहे. नीती-नियम व कायद्याची चौकट मोडून काम केल्याने अथवा वागल्याने आपला अधिक फायदा होतो असे जेव्हा एखाद्या व्यक्तीच्या लक्षात येते तेव्हा ती व्यक्ती भ्रष्ट आचरण करण्यास उद्युक्त होते. आणि असे भ्रष्ट आचरण करूनही समाज आणि कायदा आपले काहीही बिघडवू शकत नाही, याची जेव्हा त्या व्यक्तीस जाणीव होते तेव्हा ती अधिक भ्रष्टाचार करण्यास धजावते. आणि मग त्याची लागण सर्वत्र होत जाते.

भ्रष्टाचाराचे संपूर्ण निर्मूलन केव्हाही अशक्य आहे. अगदी रामराज्य आणि शिवशाहीतही ते झाले नव्हते. मात्र ते काबूत आणणे, मर्यादित ठेवणे सहज शक्य आहे. जसे ते कुठल्याही चांगल्या राजवटीत असते आणि तसे ते असते म्हणूनच ती राजवट चांगली ठरते.

भ्रष्टाचाराचे प्रमाण कमी करायचे असले तर सर्व क्षेत्रातील वैध आचरणाचे नियम व व्याख्या सर्वांना कळू शकतील इतपत सोप्या करावयास हव्यात. कायदे व त्याखालील नियम; सद्यःस्थिती व समाजातील जास्तीत जास्त लोकांच्या हिताचे रक्षण होईल अशा पद्धतीने केले जायला हवेत. असे न होता अल्पसंख्य लोकांच्याच हितास प्राधान्य दिले जाऊन जेव्हा कायदे तयार केले जातात, तेव्हा भ्रष्टाचारास आपोआपच निमंत्रण मिळते. कालबाह्य कायद्यांची उचलबांगडी व्हायला हवी, तसेच कायदे व नियम सुस्पष्ट आणि पळवाटांना स्थान नसलेले असावेत.

**सक्षम सरकारी यंत्रणेची आवश्यकता**

असे कायदे आणि नियमांचे पालन कसोशीने व कठोरपणाने होईल असे बघणारी सक्षम सरकारी यंत्रणा हवी. यंत्रणा सरकारच्या आधिपत्याखाली असली, तरी राज्यकर्त्यांना ढवळाढवळ करायला वाव मिळेल अशी ठिसूळ नसावी. कायद्याचे व ठरवलेल्या नीतिनियमांचे उल्लंघन करणाऱ्यास कठोर शासनाची तरतूद हवी. कायद्याची जरब नसली, तर भ्रष्टाचार बोकाळलाच म्हणून समजा. खुनासारख्या गुन्ह्यांची सुनावणीदेखील १०-२० वर्षे चालत राहते आणि शेवटी बहुसंख्य गुन्हेगार पुराव्याअभावी

शिक्षा न होता सुटतात. तिथे कायद्याची व शासनाची जरब कशी नसणार? गुन्ह्यांच्या तपासणीस व सुनावणीस विलंब झाला की भ्रष्टाचाराचा शिरकाव झालाच म्हणून समजावे.

आजच्या काळात लोकांच्या आचरणातील खऱ्या धर्माचे अधिष्ठान नष्ट झालेले असल्याने पाप-पुण्याची भीती गेलेली आहे. ती परत निर्माण होणे निधर्मी (सर्वधर्मी नव्हे!) राज्यात शक्य नाही. त्यामुळे त्या मार्गाने जाऊन भ्रष्टाचारावर प्रतिबंध घालणे आज शक्य नाही.

अर्थव्यवस्थेत कमीत कमी निर्बंध व उत्पादन वाढीस खीळ न बसता चालनाच मिळेल अशा प्रकारचे कायदे व नियम असावेत. तसेच कामगार वर्गाच्या हितांचे संरक्षण करताना त्यांच्या हातून उत्पादन व संपत्ती निर्मितीस अडसर होईल अशा प्रकारचे काम होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे.

सर्व प्रकारच्या नकारात्मक आंदोलनांवर कसोशीने बंदी असायला हवी. मग ते कामगारांचे असो की पुढाऱ्यांचे! स्वातंत्र्याच्या आधीचा परकीय जोखडाखालील भारत आणि आर्थिक विकासाच्या उंबरठ्यावरील भारत यांतील फरक आपण जाणून घेणार आहोत की नाही? विकासाच्या वाटेवरील देशात संपत्तिनिर्मितीच्या वाटेत अडसर बनू पाहणाऱ्या कुठल्याही नकारात्मक आंदोलनास थारा असताच कामा नये. मग मागण्या कितीही न्याय्य व उद्दिष्टे कितीही श्रेष्ठ असोत!

## सुयोग्य नियंत्रण व नियोजन

प्रचंड लोकसंख्या, नद्या, समुद्रकिनारे ही सर्व आमची संपत्ती होय. त्यात सामावून असलेली प्रचंड ऊर्जा वाया जाऊ न देता तिचे सुयोग्य नियंत्रण व नियोजन करून संपत्तिनिर्मितीचे प्रयत्न झाले, तर भ्रष्टाचारास खूपच आळा बसू शकेल. संपत्ती व तिच्या निर्मितीचे मार्ग मर्यादित व त्यावर अवलंबून असलेली लोकसंख्या प्रचंड असे त्रैराशिक झाले, तर भ्रष्टाचार माजणारच. मात्र मनुष्यबळ हा उत्पादनाचा एक प्रमुख घटक आहे व प्रत्येक खाणाऱ्या तोंडाबरोबर काम करणारे दोन हात आणि एक डोके असते हे लक्षात घेतले, तर आपल्या आर्थिक विकासातील अपयशाचे खापर प्रचंड लोकसंख्येवर फोडत राहण्याचे कारण उरणार नाही.

जंगलसंपत्तीवर जर देशातील आदिवासी लोक गुजराण करत असतील तर त्यांच्यावर जंगलातील लाकूड तोडण्यावर बंदी आणायची की त्यांना अधिकाधिक वृक्ष लावण्यास उद्युक्त करायचे! अंडी खाल्ल्यामुळे कोंबड्यांची संख्या कमी होते, म्हणून आपण अंडी खाण्यावर बंदी आणतो की अधिकाधिक अंडीनिर्मितीवर भर देतो! मग जंगलसंपत्तीच्या बाबतीत हा उरफाटा न्याय का? त्यामुळे भ्रष्टाचार वाढणार नाही तर काय कमी होईल?

**व्यापक जनहिताच्या दृष्टीकोनाची आवश्यकता**

मुंबईसारख्या शहरात प्रचंड जागांवर वसलेल्या गिरण्या किफायतशीर चालत नसतील आणि त्या जागांवर निवासी व व्यापारी संकुले उभारून शहरातील जागांच्या किमती खालच्या पातळीवर ठेवण्यास मदत होणार असेल, तर गिरण्या हलवण्यावर बंदी आणणे योग्य होत नाही. असे करताना समाजातील एखाद्या वर्गावर थोडा अन्याय होत आहे असे वाटले तरी व्यापक हिताच्या दृष्टीने असे निर्णय घेणे आवश्यक ठरते आणि तसे ते ठामपणे घेतले जावेत.

राज्याराज्यात पाणी वाटप व सीमाआखणी संबंधांत तंटे होऊच कसे दिले जातात? कुठल्याही राज्यातील शेतकऱ्याने पाण्याचा वापर केला तरी त्यांचा अंतिम परिणाम उत्पादनवाढीतच होतो ना? सीमावासी बांधव आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्याच शाळेत शिकायला पाठवणार, तर ती महाराष्ट्रातील इंग्रजी शाळेत गेली काय आणि कर्नाटकातील, यांत फरक तो काय पडतो? राजकारण्यांना मात्र आपण भ्रष्ट आंदोलनासाठी अजून एक राखीव कुरण निर्माण करून देतो.

स्वातंत्र्य मिळून पन्नास वर्षे होत आली. मात्र अजूनही आम्ही छोट्याछोट्या गावांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देऊ शकलेलो नाही, ही लाजिरवाणी गोष्ट होय. यात आजवरच्या सत्ताधाऱ्यांचा नाकर्तेपणाच दिसून येतो. तरीदेखील आजही अशा योजना राबवण्यासाठी आम्ही सर्वत्र सरकार व सरकारी मदतीकडेच जेव्हा आशाळभूतपणे बघत राहतो, तेव्हा आम्ही भ्रष्टाचाराचीच शिकार होऊन बसतो. ठिकठिकाणी पाणी अडवून त्याचा वापर करण्यावर भर द्यायला हवा. मात्र अशा सर्व योजना सरकारी अनुदान घेऊन राबवताना ते भ्रष्टाचाराला निमंत्रितच करत असतात, हे त्यांच्या लक्षात येत नाही हे दुर्दैव होय! अशा योजना ज्या दिवशी सर्वस्वी

विद्यार्थी व नागरिकांच्या श्रमदानातून आणि गैरसरकारी आर्थिक मदतीने राबवल्या जातील, तेव्हा राजकारणी व सत्ताधाऱ्यांचे महत्त्व आपोआप कमी होऊन भ्रष्टाचारास खूपच आळा बसू शकेल. त्यासाठी सर्वच क्षेत्रांत स्वेच्छा व श्रमदानाने काम करणाऱ्या लोकांनी पुढे येऊन सरकारी निधींवरील ताण कमी केला, तर त्या निधींना प्रकल्पांपर्यंत जाईस्तोवर लागत असलेली गळती थांबू शकेल.

शेतकरी, कारखानदार, कामगार व सार्वजनिक क्षेत्रातील लोकांना सरकारी निधी, अनुदान व कर्जाकडे आशाळभूतपणे पाहत राहून काम करण्याची जी सवय लागली आहे, ती बदलून स्वाभिमानाने स्वत:चे बळ व हिमतीवर काम करण्यास उद्युक्त करायला हवे.

चळवळ, मग ती सकारात्मक असो वा नकारात्मक, रचनात्मक असो की आंदोलनात्मक, तिचे यश जनसामान्यांचा तिच्यातील सहभागावरच अवलंबून असते. भ्रष्टाचार निर्मूलनाच्या मोहिमेत भाग घेणाऱ्या लोकांचे वेगवेगळ्या क्षेत्रातील आचरण भ्रष्ट असले तर ती चळवळ यशस्वी होणार कशी?

त्याऐवजी सर्वच क्षेत्रांतून राजकारणी आणि सरकारी माध्यमांना समांतर काम करणाऱ्या संस्था आणि लोक वेगवेगळ्या क्षेत्रात पुढे आले, तर भ्रष्टाचारास आपसूकच अटकाव होईल. त्यासाठी आवश्यकता आहे अशा लोकांना व संस्थांना पुढे आणण्याची व एक समान व्यासपीठ निर्माण करून देण्याची. लोकांना उत्तेजित करायचे असले अथवा एखाद्या मोहिमेत यशस्वीरीत्या सहभागी करून घ्यायचे असले, तर त्यांच्या अंत:करणापर्यंत पोहोचणे आवश्यक असते. ते काम होते चांगले लेखक, वक्ते आणि आपल्या कामातून लोकांपुढे आदर्श निर्माण करणाऱ्या लोकांकडून. त्यामुळे भ्रष्टाचार निपटून काढायचा असला, तर वेगवेगळ्या क्षेत्रांत रचनात्मक काम करणाऱ्या लोकांना एकत्र आणण्याचे प्रयत्न व्हायला हवेत. सामाजिक कार्यात अजिबातच भाग न घेणाऱ्या लोकांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात काम करण्यास उद्युक्त करायला हवे. त्यासाठी प्रत्येक जिल्ह्यातून, तालुक्यातून चांगले लेखक, वक्ते आणि कार्यकर्ते निवडून त्यांचे शिक्षण व मार्गदर्शन व्हायला हवे. जेणेकरून ते आपले काम सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचवू शकतील. सबंध महाराष्ट्रातून असे शंभर लेखक, शंभर वक्ते आणि

शंभर कार्यकर्ते यांना एकत्र आणून समान कार्यक्रम व धोरण आखून देऊन त्यांना जनमानसात प्रवेश करण्यास उद्युक्त केले, तर 'भ्रष्टाचार निर्मूलन' नव्हे, तर 'भ्रष्टाचार अटकाव' प्रभावीपणे होऊ शकेल.

शिक्षण हे माणूस घडवण्यासाठी असून केवळ नोकरी मिळवण्यासाठी नव्हे! अशा पद्धतीने शैक्षणिक धोरण आखून त्याची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. पुढील पिढ्यांना स्वाभिमानाने जगायला शिकवेल तेच खरे शिक्षण होय. अन्यथा नोकरीजन्य शिक्षणातून भ्रष्टाचाराची गंगोत्री अशीच पुढे वाहत राहून विस्तारत जाईल.

मात्र हे काम एका रात्रीतून होण्यासारखे नाही. स्वातंत्र्यप्राप्तिनंतर दोन पिढ्या आणि दहा केंद्र सरकारांनी रात्रन्‌दिवस मेहनत करून आपल्याभोवती भ्रष्टाचाराचे हे पाश लावून ठेवले आहेत. त्यांचे छेद करणे तेवढे सोपे नाही. त्यासाठी अजून पुढील किमान दोन पिढ्यांची आहुती पडायला हवी. आणि त्यासाठी सर्वच सुजाण नागरिकांनी अंतर्मुख होऊन आपापल्या भूमिका तपासून बघायला हव्यात आणि आजच्या नव्हे, तर उद्याच्या भारताचा विचार करायला हवा. तरच हे काम होऊ शकेल.

विवेक, २६-०१-१९९७

* * *

# काळ्या पैशाबाबत काही सूचना

काळा पैसा उजेडात आणण्यासाठी गेल्या ऑक्टोबरमध्ये केंद्रीय शासनाने जाहीर केलेल्या योजनेस मर्यादित तरीही अनपेक्षित असा जो प्रतिसाद मिळाला, त्याबद्दल शासनापासून ते असे उत्पन्न जाहीर करणाऱ्या सर्व संबंधितांचे अभिनंदन करणं आवश्यक आहे.

या योजनेखाली जाहीर केल्या गेलेल्या उत्पन्न व संपत्तिसंबंधी काही प्राथमिक स्वरूपाची आकडेवारी आता उपलब्ध झाली आहे. त्या माहितीच्या आधारे खालील निष्कर्ष निघतात :

१) दोन लाख बेचाळीस हजार लोकांनी ७४१ कोटी रुपये उत्पन्न जाहीर केले. म्हणजे सरासरी व्यक्तिपरत्वे रु. ३०,६०० एवढा काळा पैसा जाहीर झाला. वांछू समितीच्या अंदाजाप्रमाणे समाजात दडलेला काळा पैसा साधारणत: ७ ते १५ हजार कोटी रुपये एवढा आहे. तो साधारणत: १० हजार कोटींच्या आसपास जरी धरला तरी वरील सरासरीप्रमाणे साधारणत: बत्तीस लाख सत्तर हजार लोकांकडे असा काळा पैसा असण्याची दाट शक्यता आहे. म्हणजे एकंदरीत काळा पैसा तथाकथित मूठभर लोकांकडेच आहे असे नव्हे.

२) तेरा हजार तीनशे ब्याऐंशी लोकांनी ८०० कोटींची संपत्ती जाहीर केली. म्हणजे सरासरी व्यक्तिपरत्वे ६ लाख रुपयांची संपत्ती जाहीर झाली. जाहीर न झालेली संपत्ती किती आहे हा केवळ तर्काचाच विषय होय.

३) गेल्या पंचवीस वर्षांत कर विषयक कायद्यात स्थूलपणे किमान ५० वेळा म्हणजे सरासरी वर्षातून दोनदा तरी बदल करण्यात आले आहेत. हे बदल अशा कायद्यात सुधारणा करण्यासाठी झालेले नाहीत असे कसे म्हणता येईल?

त्याचबरोबर आयकर आणि संपत्तिकर यांचे दर आणि त्या कायद्याखालील निर्बंध उत्तरोत्तर वाढत असून अधिक जाचकही होत असल्याचा दावा करदाते (मूठभर), कायदाविषयक सल्लागार आणि इतरही संबंधित करत आले आहेत. असे असूनही समाजातील एवढ्या लोकांकडे एवढ्या मोठ्या प्रमाणात उत्पन्न आणि संपत्ती वर्षानुवर्षे दडून राहू शकते हे

कसे? कायद्याची अंमलबजावणी व्यवस्थित होत नाही, असा निष्कर्ष कोणी काढला तर सद्यःस्थितीत तो अव्यवहारीपणा ठरेल.

वरीलप्रमाणे जाहीर झालेल्या उत्पन्न व संपत्तीवर सरकारला सकृत्दर्शनी साधारणत: २४८ कोटी रुपये कर मिळायचा आहे. त्यांपैकी सुमारे १५८ कोटी रुपये आत्ताच वसूल झाले असून उरलेली रक्कम मार्च १९७७ पर्यंत मिळेल. शासनाकडूनच जाहीरपणे तसे आश्वासन मिळाल्यामुळे केंद्रीय शासन पैसा उत्पादन कार्यासाठीच वापरेल, असा निष्कर्ष काढणे प्राप्त आहे.

**पूर्वीचा अनुभव**

या योजनेआधीही अशा तऱ्हेच्या दोन सवलतीच्या योजना जाहीर झाल्या होत्या व त्यांतूनही काही दडलेला पैसा बाहेर पडला होता. या तिन्ही योजनांना दर वेळेस वाढीव स्वरूपाचा प्रतिसाद मिळत गेला आहे. अर्थात मागील योजनांचा लाभ घेतलेल्यांनीही या योजनेचा लाभ उठवला की नाही याची माहिती अजून उपलब्ध झालेली नाही. पण यावरून निघणारे निष्कर्ष मात्र चिंताजनक आहेत :

अ) दडलेले उत्पन्न आणि संपत्ती उत्तरोत्तर अधिकाधिक प्रमाणात बाहेर येत गेली. याचाच अर्थ, अधिकाधिक आयकर आणि संपत्तिकर बुडवण्याची प्रवृत्ती वाढत आहे.

ब) योजनेचा लाभ घेणारे आपले कर्तव्य म्हणून असे दडलेले उत्पन्न व संपत्ती जाहीर करत नसून आजवर कर चुकवून जमा केलेले उत्पन्न व संपत्ती आता भीतीपोटी जाहीर करून ते मोकळे झाले आहेत. अशी निर्मिती करण्याची त्यांची क्षमता किंवा प्रवृत्ती कमी झाली आहे असे नव्हे.

क) केवळ कायद्यात वारेमाप आणि वेळोवेळी बदल करून अशी निर्मिती शासन आणि समाज थांबवू शकत नाही. शकणार नाही.

ड) अडचणीच्या वेळी पैसा उभा करण्याचा एक सोपा आणि प्रभावी उपाय म्हणून शासन आता या योजनांकडे बघू लागले आहे, असा निष्कर्ष काढणे अगदीच चुकीचे होईल काय?

**काही अनुमाने**

वर उल्लेखलेली माहिती, वस्तूस्थितिनिष्ठ निष्कर्ष आणि इतर माहिती यांवरून काही अनुमाने निघतात. या रोगावर काही प्रभावी आणि वस्तुनिष्ठ उपाय सुचवायचे असले, तर या अनुमानांचा उल्लेख केला पाहिजे.

(१) आजवर अमलात आलेल्या सर्व योजनांखाली काळ्या बाजाराच्या व्यवहारातून निर्माण झालेले उत्पन्न व संपत्ती थोड्या फार प्रमाणात उजेडात आली. (२) नोकरशाहीच्या भ्रष्टाचारातून निर्माण झालेल्या काळ्या पैशाचे काय? या पैशाला हातही लागलेला नाही. (३) जाहीर झालेले उत्पन्न व संपत्ती ही बऱ्याच प्रमाणात रोकड रक्कम व सोने-नाणे यांच्या स्वरूपात असावी. बरीचशी रोकड रक्कम कर भरण्यासाठी वापरण्यात आली असावी. सोन्यानाण्यांत गुंतलेल्या रकमेवर, यापुढे दर वर्षी संपत्तिकर मिळणार असला, तरी त्यामुळे आयकरात ताबडतोब वाढ होईल असे वाटत नाही. (४) या योजनेची मुदत संपल्यानंतर चलनाचे त्वरित निर्मूल्यन करणे, हा काळ्या पैशाच्या व्यवहारावर निर्बंध घालण्याचा प्रभावी उपाय ठरला असता. परंतु तसे झाले नाही. त्यामुळे व इतर उपायांच्या अभावांवरून, शासनाकडे काळ्या पैशास अटकाव करणारी एखादी सर्वंकष योजना असू शकेल किंवा त्यावर साकल्याने विचार झाला असावा, असे वाटत नाही.

**काही सूचना**

अशा परिस्थितीत शासनावर टीका करणे सगळ्यांना सोपे आणि काहींना सोईचे असले, तरी विधायक सूचनांचा विचार करणे महत्त्वाचे होय, यात काही शंका नाही. सुचवलेले सर्वच उपाय नवीन नसले, तरी त्यांचा विचार केल्याशिवाय अर्थव्यवस्थेत काही गती निर्माण होईल असे वाटत नाही. (१) एखादी योजना अथवा कायदा प्रामाणिकपणे संपूर्णतः अमलात आणावयाच्या आधीच त्यात बदल करण्याच्या धोरणास फाटा द्यावयास हवा. (२) लोकांमध्ये करचुकवेगिरीची प्रवृत्ती कमी करण्यासाठी आयकर व संपत्तिकराच्या दरकोष्टकांची संपूर्ण फेरआखणी आणि सर्वाधिक दर खालच्या पातळीवर आणावयास हवेत. यामुळे येणारी संभाव्य तूट पुढील उपायांनी भरून काढण्यात यावी. (३) आयकर व संपत्तिकरांच्या आकारणीसाठी 'व्यक्ती' हा घटक न धरता 'कुटुंब' हा घटक धरला जावा. एकत्र राहणारे नवराबायको आणि त्यांच्यावर अवलंबून असलेली अज्ञान बालके, यांचे एक कुटुंब धरले जाऊन, त्यांच्या एकत्रित उत्पन्न व संपत्तिवर कर आकारला जावा. (४) शेतीचे उत्पन्न आयकर कायद्याखाली आणण्याचा धीटपणा शासनाने दाखवावा. (५) जाहीर झालेल्या काळ्या पैशातून मिळालेले उत्पन्न सरकारने गंगा-कावेरी कालव्याचा प्रकल्प हाती

घेऊन त्याच्या प्राथमिक कामासाठीच केवळ वापरावे. हा एक प्रचंड प्रकल्प असून हाती आलेला पैसा त्या मानाने फारच तुटपुंजा होय, याची कल्पना आहे. परंतु त्वरित सुरुवात करण्यासाठी तो पुरेसा आहे. पण ही योजना अमलात आली, तर वर्षानुवर्षे उत्तरेकडे येणारे महापूर आणि देशातील इतर भागांत अवर्षणामुळे पडणारे दुष्काळ या दोन्हीही संकटांतून देशाची कायमची मुक्तता होणार आहे. केवळ या दोन संकटांपायी आज देशाचे दरवर्षी कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत आहे. होणारे नुकसान टाळणे हे नवीन संपत्ती निर्माण करण्यासारखेच नव्हे काय?

भ्रष्टाचारासंबंधी होणाऱ्या टीकेबद्दल शासनाने फार हळवेपणा न दाखवता, त्यासंबंधी वस्तुनिष्ठ विचार करावा व तो कमीत कमी ठेवण्यासाठी प्रभावी कृती करावी. त्यामुळे शासन दुर्बळ होणार नसून उत्तरोत्तर अधिक कार्यक्षम होत जाण्यास मदत होणार आहे आणि यासाठी आत्ताचा काळ अनुकूल आहे.

महाराष्ट्र टाइम्स, ९-०१-१९७६

* * *

# बेनामी गुंतवणूक करून नामानिराळे होता येत नाही

कुठलीही गुंतवणूक करताना ती जोडनावांनी अथवा एकापेक्षा अधिक नावांनी करणे सोयीचे असते, हे आपण मागील लेखात बघितले. मात्र असे करणे म्हणजे संबंधित गुंतवणुकीचा वारसा हक्क जोडनाव असलेल्या व्यक्तीकडेच वर्ग करणे असे होत नाही. त्यासाठी व्यवस्थापनपत्राद्वारे वेगळी तरतूद करणे आवश्यक असते.

जोडनाव अथवा आपल्याशिवाय इतर कोणाच्या नावाने गुंतवणूक करताना वारसा हक्काबरोबरच करविषयक कायद्यांच्या तरतुदी प्रामुख्याने लक्षात घ्यायच्या असतात. विशेषत: आयकर, संपत्तिकर व मालमत्ताकर यांच्या बाबतीत.

आपण आपल्या बचतीतून केलेल्या गुंतवणुकीवर मिळणारे उत्पन्न आपले वार्षिक आयकरपत्रक भरताना दाखवायचे असते. मग असे उत्पन्न करपात्र नसले तरीदेखील त्या पत्रकात योग्य त्या ठिकाणी त्याचा उल्लेख करावयास हवा. तसेच मूळ गुंतवणुकीचापण उल्लेख योग्य त्या सदरात अथवा वेगळ्या पत्रकाने करून ठेवणे अंतिमत: आपल्या हिताचे व सोयीचे ठरते. आयकरपत्रकात असे उत्पन्न दाखवताना ती गुंतवणूक कोणाच्या नावे आहे यापेक्षा ती कोणाच्या पैशांतून केली गेली आहे हे महत्त्वाचे असते.

**काही चुकीच्या समजुती**

सर्वसाधारणपणे मध्यमवर्गीयांतून विशेषत: पगारदार करदात्यांमध्ये अशी एक भाबडी समजूत (भाबडी? छेः! काही वेळा सोईस्कररीत्या करून घेतलेली लबाड समजूत, जी करसल्लागारांना नेहमीच अडचणीत टाकते.) आढळते की, आपण आपली पत्नी (अथवा पती) आणि लहान मुले यांच्या नावे गुंतवणूक केलेली असली की तिच्यावर येणारे उत्पन्न हे आपल्या इतर उत्पन्नांबरोबर वार्षिक आयकर पत्रकात दाखवायला नको! का तर, अशी गुंतवणूक माझी, म्हणजे माझ्या नावावर नाही म्हणजे ते उत्पन्न माझे नाही! हा भाबडेपणा म्हणायचा की धूर्त लबाडी ते आपणच ठरवायचे आहे!

कर विषयक कायदे मात्र अशा बाबतीत गुंतवणुकीवरील नावांपेक्षा त्याच्या उगमाकडे (Source) अधिक लक्ष देतात आणि ते योग्यच आहे.

अशी गुंतवणूक ज्याच्या नावे केली जाते, त्या व्यक्तीला 'बेनामी' म्हणायचे. बेनामी गुंतवणूक करूच नये असा कायदा नसला, तरी त्या गुंतवणुकीस व त्यावरील उत्पन्नावर कर भरण्यास कोण जबाबदार आहे याचा योग्य उल्लेख करणे आवश्यक असते.

मात्र भेटपत्र (Declaration of Gift) करून अशी रक्कम आपण इतरांकडे वर्ग करू शकता. अशा वेळी त्या गुंतवणुकीवर येणाऱ्या उत्पन्नावर अधिकार भेट देणाऱ्याचा असत नाही, तर ती स्वीकारणाऱ्याचा असतो व त्याने त्यावर कर भरायचा असतो. अशा भेटीच्या रकमेवर भेट देणाऱ्याने कायदेशीर तरतुदीनुसार भेटकर (Gift tax) भरणे आवश्यक असते. तसेच त्या रकमेचे वेगळे परिपत्रक दाखल करणेही आवश्यक असते.

**बेनामी गुंतवणूक**

पती/पत्नीने एकमेकांस आणि आपल्या अज्ञान संततीस अथवा आपल्या मुलांच्या अज्ञान संततीस अशी रक्कम भेट म्हणून वर्ग केली तरीदेखील त्यापासून मिळणारे उत्पन्न हे भेट देणाऱ्या व्यक्तीचेच उत्पन्न समजले जाते. म्हणूनच अशा वेळी पती/पत्नी अथवा अज्ञान मुलांच्या नावे गुंतवणूक करून अथवा भेटपत्र करूनही त्यापासून मिळणाऱ्या उत्पन्नावर कर भरण्याचे आपण टाळू शकत नाही. म्हणजेच बेनामी गुंतवणूक करून 'तो मी नव्हेच' म्हणून आपण नामानिराळे होऊ शकत नाही!

आयकर कायद्यातील कलम क्रमांक ६० ते ६५ व १५९ ते १७० आणि संपत्तिकर कलम क्रमांक ४ मध्ये याबाबत संपूर्ण तरतुदी आहेत. मात्र आपल्याला कलमबद्ध होऊन विषय क्लिष्ट न करता त्या तरतुदींचे मर्म तेवढे जाणून घ्यायचे असल्याने त्यांचा साद्यंत विचार येथे केलेला नाही.

योग्यरीत्या भेटपत्र करून व त्यावरील भेटकर भरून सज्ञान व्यक्तीकडे वर्ग केलेल्या रकमेवर अथवा गुंतवणुकीवर मिळणाऱ्या उत्पन्नाच्या बाबतीत मात्र असे म्हणता येत नाही. अशा वेळी ते उत्पन्न हे भेट मिळालेल्या व्यक्तीच्या हातात करपात्र होते. आपण दर करवर्षात रुपये पाच हजारांपर्यंत अशी रक्कम कराची जबाबदारी न ओढवून घेता सज्ञान व्यक्तीस भेट देऊन आपल्या हातातील संपत्ती व करपात्र उत्पन्न कमी करू शकता. विशेषत: उतारवयात निधनानंतरची आपली करपात्र मालमत्ता हळूहळू कमी करण्यासाठी याचा चांगला उपयोग होऊ शकतो.

**भेटपत्राबाबत घ्यावयाची दक्षता**

भेटपत्र करताना ज्या व्यक्तीस भेट द्यायची त्याने ती स्वीकारल्याचे नमूद करून त्यावर सही करणे आवश्यक असते. त्याशिवाय कायदेशीररीत्या ती भेट पूर्ण झाली आहे असे म्हणता येत नाही. तसेच असे भेटपत्र करताना त्या-त्या वेळी अमलात असणाऱ्या स्टॅम्पड्यूटीविषयक तरतुदी लक्षात घेऊन आवश्यक त्या रकमेचे स्टॅम्पपेपर वापरावयास हवेत.

असे भेटपत्र न करता काही कारणास्तव बेनामी गुंतवणूक करणे भाग पडले, तर कर विषयक पत्रके भरताना योग्य त्या ठिकाणी व त्याचा उल्लेख करावयासच हवा. तसेच ज्या व्यक्तीच्या नावे गुंतवणूक करावयाची, त्यास त्याची पूर्ण माहिती दिलेली असावयास हवी. अन्यथा आपल्या गुंतवणुकीची कथा होईल, दुसऱ्या कोणा एकाची व्यथा!

**आयकरपत्रक भरणे हिताचे**

अशीच एक दुसरी समजूत - ''आमच्या पगारातून परस्पर कर कापला जातो. त्यामुळे आम्ही परिपत्रक (Return) भरण्याचे कारण नाही.'' चुकीची समजूत आहे. पगारातून परस्पर कर कापून भरला जात असला, तरी रिटर्न भरण्याची जबाबदारी प्रत्येक करदात्याची आहे. पगारदार व्यक्तीच्या बाबतीत प्रचलित तरतुदींनुसार करपात्र उत्पन्न रु. १८००० च्या पुढे जात नसेल, तर असे रिटर्न भरण्याची कायदेशीर गरज नाही. तरी असे रिटर्न भरणे प्रत्येक व्यक्तीच्या हिताचेच ठरते. कारण आज पदोपदी 'इन्कम टॅक्स क्लीअरन्स सर्टिफिकेट' व 'परमनन्ट अकाऊन्ट नंबर'ची आवश्यकता भासत असते. आपण रिटर्न भरत असलात, तर ह्या गोष्टी जलद मिळणे सोयीचे होते. तसेच बऱ्याच वेळा पगारातून परस्पर कापला गेलेला कर गरजेपेक्षा अधिक असल्याचे आढळून येते. अशा वेळी आपण रिटर्न भरत असलात तरच आपल्याला जास्त कापल्या गेलेल्या कराची रक्कम परत मिळू शकेल, अन्यथा नाही.

म्हणूनच खोट्या समजुतीपायी आपल्या नावावर गुंतवणूक करण्याचे किंवा रिटर्न भरण्याचे टाळू नका. त्यामुळे कर बचत होत नाही, पण नसता गोंधळ आणि नुकसान व्हायची शक्यताच मात्र अधिक असते.

विवेक, १०-०२-१९८४

* * *

# गुंतवणुकीचा गुंता – सोडवाल कसा?

गुंतवणूक! सदासर्वदा वाढणाऱ्या महागाईत कठीण आणि तेवढीच नकोशी वाटणारी गोष्ट. पण उज्ज्वल भविष्य आणि कुटुंबाच्या कल्याणासाठी तेवढीच आवश्यक असलेली बाब. गुंतवणूक करणे म्हणजे काय? आपल्या उत्पन्नातून कर आणि दैनंदिन व्यवहाराचा कौटुंबिक खर्च वजा जाता राहिलेली शिल्लक म्हणजे बचत. अशी बचत ज्या तऱ्हेने आणि ज्या उपलब्ध साधनांमध्ये ठेवली जाते, त्याला म्हणायचे गुंतवणूक. उदा. बँका आणि कंपन्यांकडे ठेवलेल्या वेगवेगळ्या प्रकारच्या ठेवी, शेअर्स आणि कर्जरोखे, सोनेनाणे, जमीनजुमला इत्यादी. अशी गुंतवणूक करताना काय खबरदारी घ्यायला हवी? कोणत्या मार्गांचा अवलंब करायचा? कोणत्या विचारांना प्राधान्य द्यायला हवे? गुंतवणूक केव्हा आणि किती मुदतीसाठी करायची? किती रकमेची करावयास हवी? कोणाच्या नावे करावी? इत्यादी प्रश्नांचा थोडक्यात ऊहापोह या लेखात करायचा आहे.

अशी गुंतवणूक करताना पुढील गोष्टींचा प्रामुख्याने विचार करायला हवा :–

**गुंतवणुकीवर मिळणारे उत्पन्न :** गुंतवणुकीचे विविध प्रकार उपलब्ध असताना त्यातल्या त्यात ज्या गुंतवणुकीवर अधिकाधिक उत्पन्न मिळेल, त्या प्रकारात गुंतवणूक करण्याकडे सर्वसामान्यरीत्या अधिक कल असणे साहजिक होय. या दृष्टीने बघता बँका अथवा पोस्ट ऑफिसमधील ठेवींपेक्षा खासगी कंपन्यांकडील ठेवी आणि नावाजलेल्या प्रस्थापित कंपन्यांच्या भागभांडवलात (शेअर्स) गुंतवणूक करणे अधिक फायद्याचे ठरते. नव्याने निघणाऱ्या, उत्पादन क्षेत्रातील कंपन्यांना पहिली तीन ते पाच वर्षे आपल्या भागभांडवलावर लाभांश देणे शक्य होत नाही. त्यामुळे त्यातील गुंतवणूक या दृष्टीने फायदेशीर ठरत नाही.

**उत्पन्नाची कर पात्रता :** गुंतवणुकीवरील उत्पन्नाचा विचार करताना त्या उत्पन्नावर द्यायला लागणाऱ्या आयकराचा देखील विचार करायलाच हवा. बँकांकडील ठेवी व कंपन्यांच्या भागभांडवलावर मिळणारा लाभांश इत्यादी स्वरूपातील उत्पन्न प्रत्येक व्यक्तीच्या हातात कायद्याच्या प्रचलित तरतुदीनुसार सात हजार रुपयांपर्यंत करमुक्त असते. त्यामुळे कराचा

सर्वसाधारण दर उत्पन्नाच्या तीस टक्के धरला, तरीदेखील अशा मार्गाने मिळणारे उत्पन्न रुपये सात हजारांपर्यंत पोहोचेस्तोवरची गुंतवणूक इतर कुठल्याही मार्गापेक्षा बँकांकडील ठेवी व कंपन्यांचे भागभांडवल इत्यादींत करणे श्रेयस्कर ठरते. याचबरोबर युनिट्सकडून मिळणारा लाभांशदेखील तीन हजार पाचशे रुपयांपर्यंत करमुक्त असतो. त्यामुळे सुरुवातीची गुंतवणूक करताना या मार्गासही प्राधान्य द्यावयास हवे.

**ठेवींची म्हणजेच गुंतवणुकीची सुरक्षितता :** गुंतवणुकीवर मिळणाऱ्या उत्पन्नाबरोबरच गुंतवणुकीची रक्कम सुरक्षित राहून परत मिळेल याची काळजी घेणे आवश्यक असते. व्याजाच्या आकर्षक दराचा मोह पडून डबघाईस आलेल्या कंपन्या आणि चिट फंडाकडे ठेवी ठेवून मूळ रक्कमच गमावून बसल्याची अनेक उदाहरणे बघावयास मिळतात. म्हणूनच अशा ठेवींमध्ये पैसे गुंतवताना अतिशय काळजी घेणे आवश्यक असते. सुरक्षिततेच्या दृष्टीने सरकारी कर्जरोखे, वर्गीकृत बँकांकडील ठेवी, नावाजलेल्या कंपन्यांच्या भाग-भांडवलातील गुंतवणूक, पोस्ट ऑफिसातील ठेवी, युनिट्स इत्यादींना अग्रक्रम देणे क्रमप्राप्त ठरते.

**सुलभ परतीकरण आणि कर्ज उभारणीक्षमता :** उत्पन्न व सुरक्षिततेबरोबरच विचारात घ्यायची आणखी एक गोष्ट म्हणजे, अडीअडचणीच्या वेळी आवश्यकता असल्यास अल्पावधीत गुंतवणूक सोडवता येणे अथवा त्याच्या तारणावर अल्पखर्चात पैसा उभे करता येणे. या दृष्टीने बघता बँकांकडील ठेवींना अग्रक्रम द्यावयास हवा. चांगल्या कंपन्यांच्या भागभांडवलातील तसेच सोन्यानाण्यातील गुंतवणूकदेखील या दृष्टीने बरी. सरकारी कर्जरोखे किंवा कंपन्यांकडील ठेवी मात्र या दृष्टीने चांगली गुंतवणूक ठरत नाहीत.

**गुंतवणुकीच्या बाजार भावातील वृद्धी :** विकसनशील राष्ट्रात, बचतीतून होणाऱ्या गुंतवणुकीवर मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा महागाई वाढीचा दर निश्चितच अधिक असतो. म्हणजेच चलनाचे अवमूल्यन फार मोठ्या प्रमाणात होत असते. त्यामुळे रोखीच्या स्वरूपात ठेवलेल्या ठेवी म्हणजे बँका व कंपन्यांकडील ठेवी, कर्जरोखे इत्यादी अंतिमत: बचतीला निरर्थक करून ठेवतात. बाजार भावातील वाढीचा फायदा अशा गुंतवणुकीच्या बाबतीत मिळत नाही.

याउलट जमीनजुमला, सोनेनाणे व कंपन्यांच्या भागभांडवलात केलेल्या गुंतवणुकीत या वाढीचा भरघोस फायदा मिळत असतो. अशा गुंतवणुकीवर वार्षिक उत्पन्न मिळत नसले अथवा अतिशय अल्प असले, तरीदेखील मूळ गुंतवणुकीच्या बाजार भावात भरमसाट प्रमाणात वाढ होत असल्याने गुंतवणूक मोकळी करताना त्याचा लाभ मिळतो.

तर या झाल्या सर्वसाधारण कसोट्या. परंतु गुंतवणुकीच्या साधनांविषयी तसेच त्याचे स्वरूप आणि मर्यादा यांविषयी सल्ला देताना प्रत्येक व्यक्ती आणि कुटुंब हे दोन वेगळे घटक धरून प्रत्येकाच्या गुंतवणूक क्षमता आणि गरजा लक्षात घ्याव्या लागतात.

उदा. सुरुवातीची गुंतवणूक करताना करमुक्त उत्पन्न असलेल्या गुंतवणुकीस प्राधान्य देणे फायद्याचे ठरते. एकदा ह्या सवलतींचा पूर्ण फायदा मिळण्याएवढी गुंतवणुक झाली की इतर मार्गांचा विचार अधिक मोकळेपणाने करता येतो.

**धाडसी दीर्घ मुदतीची गुंतवणूक :** तसेच ज्या कुटुंबात एकापेक्षा अधिक मिळवत्या व्यक्ती असतात आणि उत्पन्नाचा ओघ बऱ्यापैकी असतो, तिथे अधिक धाडसी, महत्त्वाकांक्षी आणि दीर्घ मुदतीची गुंतवणुक करणे फायद्याचे ठरू शकते. गुंतवणुक मोठ्या रकमेची करायची की टप्प्या-टप्प्याने थोड्या-थोड्या रकमेची यावरही साधनांची पसंती अवलंबून राहील. उदा. कुटुंबात पाच-दहा वर्षांच्या अवधीत मुलींचे लग्न असल्यास मासिक बचत, बँकांत वगैरे ठेवण्यापेक्षा लग्नातील सोन्यानाण्याच्या गरजा हळूहळू पुऱ्या करत आणणे हिताचे ठरते. एकरकमी मोठी गुंतवणूक करताना भविष्यातील आर्थिक गरजादेखील लक्षात घेणे आवश्यक ठरते. उदा. मुलांचे उच्च शिक्षण, लग्न, राहण्याच्या जागेची सोय इत्यादी.

निवृत्तीनंतर करावयाच्या मोठ्या गुंतवणुकीचा वेगळाच विचार करावयास हवा. घरखर्च अथवा स्वखर्चासाठी दरमहा ठरावीक रक्कम कशी मिळू शकेल, तसेच निधनानंतर गुंतवणुकीचे हस्तांतर सुलभरीत्या आणि कमीत कमी कर भरावयास लागून कसे करता येईल, ह्या गोष्टी प्रामुख्याने बघावयास हव्या. एक व्यक्ती अथवा कुटुंबाच्या बाबतीत जे फायद्याचे ठरेल ते दुसरी व्यक्ती अथवा कुटुंबाच्या बाबतीत तसे ठरेलच असे नव्हे. तेव्हा

इतरांचा सल्ला आणि अनुभव लक्षात घेणे महत्त्वाचे असले, तरी एकूण अंधानुकरण फायद्याचे ठरेलच असे नव्हे.

महागाई फार मोठ्या प्रमाणात वाढत असते. तेव्हा गरजेच्या, तसेच सुखचैनीच्या अनेक वस्तू कर्ज काढून अथवा हप्ता पद्धतीने घेऊन बचतीतून कर्ज फेडत राहणे नक्कीच फायद्याचे ठरते. एवढेच नव्हे तर गुंतवणुकीचे आकर्षक आणि सुरक्षित मार्ग उपलब्ध असले, तर कर्ज काढूनही अशी गुंतवणूक करणे हितावह ठरते. मात्र उत्पन्नाचा ठाशीव ओघ आणि खातरी असल्याशिवाय कर्ज उभे करून गुंतवणूक करणे धोक्याचे ठरते. उद्योग व्यापारातील मालमत्ता अशाच रीतीने वाढत जाते.

**गुंतवणूक जोडनावाने करणे श्रेयस्कर :** कोणतीही गुंतवणुक करताना ती एकापेक्षा अधिक नावांनी म्हणजेच जोडनावांनी करणे केव्हाही श्रेयस्कर. प्रौढ व्यक्तींच्या बाबतीत अशी गुंतवणुक सध्याची सामाजिक परिस्थिती लक्षात घेता, नवराबायकोच्या जोडनावांनी करणे अधिक सुरक्षित असते. जोडनावांनी, गुंतवणूक केल्याने त्यातील एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर अशी गुंतवणुक मोकळी करणे अथवा तिचे हस्तांतरण करणे कठीण जात नाही. अन्यथा इस्टेटड्यूटी, प्रोबेट, वारसा हक्क इत्यादींच्या जंजाळातून गेल्याशिवाय अशी गुंतवणूक मोकळी करणे शक्य होत नाही. घरातील एकमेव कर्त्या व्यक्तीच्या नावानेच अशी सर्व गुंतवणूक असल्यास हा जाच जास्तच जाणवतो.

मात्र दुसऱ्या व्यक्तीच्या अथवा जोडव्यक्तीच्या नावे गुंतवणुक करून अशा गुंतवणुकीचा वारसा हक्क त्या व्यक्तीकडेच जातो असे मात्र नव्हे. त्यासाठी व्यवस्थापत्र अथवा इतर कागदपत्रांद्वारे तशी सूचना करून ठेवणे आवश्यक असते.

तर मित्रहो, असे हे गुंतवणुकीचे शास्त्र! म्हटले तर अतिशय सुलभ! विचारपूर्वक बेतले धागे तर होईल गोफ सुंदर! अन्यथा व्हायचा नुसताच गुंता, जो करील आपल्या गुंतवणुकीचा नुसताच खुर्दा!

विवेक, १०-०२-१९८४

* * *

# करनियोजन व बचत
# यांचे आणखी एक प्रभावी साधन – मृत्युपत्र

मृत्युपत्र करून ठेवण्याची कल्पना अजून आपल्याकडे फारशी रुजलेलीच नाही. किंबहुना मृत्युपत्र करून ठेवावयाचे ते एवढ्यासाठीच की, आपल्या पश्चात आपले वारसदार आणि मुलेबाळे यांत आपण मिळवून ठेवलेल्या मालमत्तेच्या वाटणीसंबंधात तंटेबखेडे होऊ नयेत आणि आपल्या इच्छेनुसारच त्या मालमत्तेचा विनियोग व्हावा. एवढाच मर्यादित अर्थ मृत्युपत्र करून ठेवण्याच्या संकल्पनेस करून दिलेला बऱ्याच ठिकाणी बघण्यात येतो. परंतु मृत्युपत्र हे करनियोजन आणि बचतीचे एक प्रभावी साधन होऊ शकते, याची माहिती फारच थोड्या लोकांनी करून घेतलेली असते. आणि त्याचा उपयोग करून घेणारे त्यातूनही थोडे असतात.

**मृत्युपत्र म्हणजे काय?**

कुठल्याही सज्ञान व्यक्तीने आपल्या पश्चात म्हणजे मृत्यूनंतर आपल्या मालकीच्या स्थायी अथवा अस्थायी मालमत्तेची, विल्हेवाट लावण्यासंबंधी योग्यरीत्या प्रदर्शित केलेली लेखी इच्छा म्हणजे त्या व्यक्तीचे मृत्युपत्र, असे थोडक्यात म्हणता येईल. मृत्युपत्राच्या प्रत्येक पानावर व शेवटी मृत्युपत्र करणाऱ्याने स्वहस्ते सही करणे आवश्यक आहे आणि त्याने ती सही केल्याचे दोन साक्षीदारांनी मृत्युपत्रावर सही करून प्रमाणित करावयास हवे, म्हणजेच सही करणाऱ्या व्यक्तीने आपल्यासमोर सही केली आहे आणि ज्या कागदावर त्याने सही केली आहे ते त्याचे मृत्युपत्र आहे याची आपल्यास जाणीव आहे, असे दोन्ही साक्षीदारांनी नमूद करून मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीसमोर आपल्या सह्या करणे आवश्यक आहे. ते मृत्युपत्र साक्षीदारांनी वाचलेले असावेच अशी मात्र तरतूद नाही.

निरक्षर व्यक्तीच्या बाबतीत, ते मृत्युपत्र त्या निरक्षर व्यक्तीस वाचून दाखवण्यात आले असून तिच्या सांगण्यावरून ते तयार करण्यात आले आहे असे लिहून, मग त्यावर त्या व्यक्तीच्या डाव्या हाताचा निशाणी अंगठा रीतसर घ्यायला हवा. साक्षीदार निवडताना ते साक्षीदार मृत्युपत्र करणाऱ्यापेक्षा अधिक तरुण असलेले बघणे आवश्यक आहे. शक्यतोवर ते नात्यातील नामवंत, निदान मृत्युपत्रात नमूद केलेले मालमत्तेचे वारसदार नसावेत. शक्यतोवर कौटुंबिक विश्वासातील व्यावसायिक निवडणे अधिक

सोयीचे. मृत्युपत्र स्टॅम्प पेपरवर असणे आवश्यक नाही. तसेच मृत्युपत्राची नोंदणी करणे आवश्यक नसते.

मृत्युपत्र करून ठेवणाऱ्या व्यक्तीच्या निधनानंतर मृत्युपत्रात 'एक्झिक्यूटर' म्हणून नेमणूक केलेल्या व्यक्तीने अथवा वारसदाराने ते मृत्युपत्र स्थानिक न्यायालयात दाखल करून प्रोबेट घ्यायचे असते. प्रोबेट घेताना मृत्युपत्रावर साक्षीदार म्हणून सह्या करणाऱ्यांपैकी किमान एका व्यक्तीस तशी सही केल्याची, न्यायालयीन शपथपूर्वक प्रतिज्ञा घ्यावी लागते.

**करनियोजन कसे साधता येते?**

मृत्युपत्र हे करनियोजनाचे एक चांगले, प्रभावी साधन होऊ शकते. आयकर, संपत्तिकर आणि मालमत्ताकर या तिन्ही प्रत्यक्ष करांच्या बाबतीत हे लागू होते. कसे ते आपण बघू या. आपण आधी आयकर आणि संपत्तिकर यांचा विचार करू. एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याची सर्व मालमत्ता आणि उत्पन्नाची साधने वगैरे सर्वसाधारणपणे त्या व्यक्तीच्या वारसदारांमध्ये विभागली जातात. अशा वेळी असे सर्व वारसदारदेखील मिळवते व धनवान असले, तर अशा तऱ्हेने वारसाहक्काने मिळालेल्या संपत्तीमुळे त्यांची संपत्ती व उत्पन्न यांत भरीव वाढ होऊन आयकराचा व संपत्तिकराचाही बोजा वाढतो. पण जर अशा वेळी मयत व्यक्तीने मृत्युपत्र करून ठेवलले असून, त्यात आपल्या मृत्यूनंतर आपली संपत्ती आपल्या वारसदारांकडे न जाता त्यांच्या बायकामुलांकडे (सज्ञान वा अज्ञान) जावी, अशी तरतूद करून ठेवलेली असली, तर अनायासेच संपत्तीचे व उत्पन्नाच्या साधनांचे विभाजन होते. उदाहरणार्थ, खालीलप्रमाणे एका कुटुंबाची रचना आहे.

श्री. वामनराव (वय वर्ष ६५), गोपिकाबाई (वय वर्ष ६०), निरंजन (मुलगा ३७ वर्ष), अशोक (मुलगा १५ वर्ष), सौ. अलका (सून ३४ वर्ष), मीना (नात १२ वर्ष), पराग (नातू ८ वर्ष)

वामनराव, गोपिकाबाई व निरंजन या तिन्ही व्यक्ती मिळवत्या असून तिघांच्या नावाने भरपूर संपत्ती व उत्पन्नाची साधने आहेत. तिघेही आपल्या उत्पन्नावर ६०% पेक्षा अधिक कर भरताहेत. अशोक, सौ. अलका, मीना व पराग यांच्या नावे काहीही संपत्ती अथवा उत्पन्नाची साधने नाहीत. अशा वेळी श्री. वामनराव जर मृत्युपत्र न करता वारले, तर त्यांची सर्व संपत्ती व उत्पन्नाची साधने हिंदू वारसा हक्कानुसार गोपिकाबाई, निरंजन व अशोक यांत समप्रमाणात म्हणजे प्रत्येकी १/३ याप्रमाणे वाटली जातील. आणि त्यावर

गोपिकाबाई व निरंजन यांना ६०% वर आयकर आणि बऱ्याच वरच्या दराने संपत्तिकरही दरवर्षी भरावा लागेल. गोपिकाबाईंची मालमत्ताही त्यांच्या मृत्यूनंतर निरंजन व अशोक यांत विभागली जाऊन निरंजनचे करपात्र उत्पन्न व संपत्ती बरीच वाढणार आहे. शिवाय निरंजनने ही संपत्ती सौ. अलका, कु. मीन अथवा पराग यांच्या नावे करूनही काही उपयोग नाही. कारण आयकराच्या कलम ६४ नुसार संपत्तिकर कलम नं. १२२/१२३ नुसार असे उत्पन्न व संपत्तिकर यांवरील आकारणी निरंजनच्याच हातात होईल.

वामनराव मृत्युपत्र करून ठेवून अशा संपत्तिची विभागणी सौ. अलका, कु. मीना व पराग यांच्यासाठी एक ट्रस्ट उभारून करू शकतात. असे केल्याने सदर संपत्ती व उत्पन्नाची साधने परस्पर सून व नातवंडांकडे वर्ग केली जाऊ शकतील. आयकर कलम १६८ अनुसार मृत्युपत्राने काही संपत्ती एखाद्या ट्रस्टकडे वर्ग झालेली असेल व असा ट्रस्ट ऐच्छिक असेल, तर त्यास आयकर कायद्याचे कलम १६४ लागू होत नाही. ऐच्छिक ट्रस्ट म्हणजे त्या ट्रस्टच्या उत्पन्नाची विभागणी करण्याचे अधिकार विश्वस्तांना दिलेले असतात.

मालमत्ताकराच्या बाबतीत हीच बचत बऱ्याच मोठ्या प्रमाणात होण्याची शक्यता असते. वरील उदाहरणच घ्याचये झाले तर वामनरावांनी मृत्युपत्र करून न ठेवता जर त्यांचे निधन झाले, तर त्यांच्या सर्व करपात्र मालमत्तेवर मालमत्ताकर भरावा लागेल. त्यांच्या मालमत्तेचा १/३ हिस्सा गोपिकाबाईंच्या वाटणीला येऊन त्यांच्या निधनानंतर पुन्हा त्यावर मालमत्ता कर भरणे प्राप्त आहे. वामनरावांच्या निधनसमयी गोपिकाबाईंचेही वय ६० वर्षांचे झालेले असल्याने, निसर्गनियमाप्रमाणे असा कर लवकरच भरावा लागण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तेच जर वामनरावांनी आपले मृत्युपत्र करून ठेवून आपल्या मालमत्तेचे अधिकार पुढच्या पिढीच्या हाती सुपूर्द करून ठेवले, तर ही पाळी येणार नाही.

अशा रितीने मृत्युपत्र करून ठेवल्याने नुसती मालमत्तेची विल्हेवाट योग्यरीत्या तंटे-बखेडे न उद्‌भवू देता करता येते. एवढेच नव्हे तर त्यामुळे प्रचंड प्रमाणावर करबचत आणि नियोजन करता येणे शक्य आहे. म्हणून किमान प्रत्येक करपात्र व्यक्तीने सर्वसाधारपणे, साठीत प्रवेश केल्यानंतर आपले मृत्युपत्र करून ठेवणे इष्ट होय.

महाराष्ट्र टाइम्स, १७-१२-१९८०

* * *

# आयकर निवेदनपत्र भरण्याचे महत्त्व
## (Income Tax Return)

उद्योगधंदा करणाऱ्या, विशेषत: नव्यानेच उद्योग व व्यवसाय सुरू करणाऱ्या लोकांमध्ये एक समज असा असतो की, आपले उत्पन्न करपात्र होईपर्यंत आपण आयकर निवेदनपत्र (रिटर्न) भरण्याचे कारण नाही.

तांत्रिकदृष्ट्या हा समज खरा आहे, पण तेवढाच नुकसानीचा! त्याचे कारण असे की, आपले उत्पन्न आपल्याला लागू असलेल्या करपात्र उत्पन्नाच्या मर्यादेखाली असले, तर आपल्याला कर भरावा लागत नाही हे तर खरेच, पण जर आपल्याला एखाद्या वर्षी व्यवसायात खोट आली (तोटा अथवा नुकसान झाले), तर अशी तूट पुढे ओढून पुढील वर्षाच्या आपल्या उत्पन्नातून त्यास वजावट मिळण्याची तरतूद आयकर कायद्यात आहे. मात्र त्यासाठी आपण त्या-त्या वर्षासाठी वेळेवर आयकरपत्र भरणे आवश्यक आहे. ते न भरताच आपण उत्पन्नाच्या वर्षी मागील तुटीसाठी अशी वजावट मागू लागलात तर तशी ती मिळणार नाही.

आपण एक उदाहरणच घेऊ या ना! रामराव, वसंतराव आणि गोविंदराव आपापले स्वतंत्र व्यवसाय सुरू करतात. आर्थिक वर्ष १९८०-८१ आणि १९८१-८२ साठी त्यांचे उत्पन्न पुढीलप्रमाणे आहे असे समजू या. -

| अ.नं. | वर्ष | रामराव | वसंतराव | गोविंदराव | करपात्र उत्पन्नाची मर्यादा |
|---|---|---|---|---|---|
| (१) | १९८०-८१ | १२००० | -१२००० | -१२००० | १५००० |
| (२) | १९८१-८२ | २६००० | २६००० | २६००० | १५००० |

रामराव आणि वसंतराव पहिल्या वर्षी पत्रक भरत नाहीत. गोविंदराव मात्र भरतात.

दुसऱ्या वर्षी तिघेही आपापली पत्रके भरतात. आता काय परिणाम होतो ते आपण बघू या -

पहिल्या वर्षी पत्रक न भरल्यामुळे रामरावांचे काहीच नुकसान होत नाही. तसेच त्यात कायद्याचे उल्लंघनही होत नाही. दुसऱ्या वर्षी वेळेवर भरलेल्या पत्रकानुसार त्यांना रु. २६००० वर रु. ३८५० एवढा कर भरावा लागतो.

वसंतरावांच्या बाबतीतही पहिल्या वर्षी पत्रक न भरल्याने कायद्याचे उल्लंघन होत नाही. मात्र पत्रक न भरल्याने त्यांना पहिल्या वर्षातील तुटीसाठी दुसऱ्या वर्षाच्या उत्पन्नातून वजावट मिळत नाही व त्या वर्षासाठी रामरावांप्रमाणेच रु. २६००० वर रु. ३८५० एवढा कर भरावा लागतो.

**शहाणे गोविंदराव**

गोविंदराव मात्र शहाणे ठरतात. पहिल्या वर्षी कायदेशीर जबाबदारी नसतानादेखील ते पत्रक भरून आपली तूट मंजूर करून घेतात. त्यामुळे त्यांना त्यासाठी पुढील वर्षाच्या उत्पन्नातून वजावट मिळून त्या वर्षासाठी फक्त रु. १४००० वर (२६०००–१२०००) रु. ६६० मात्र कर भरावा लागतो.

म्हणूनच व्यवसायात करपात्र उत्पन्न असताना पत्रक भरणे जेवढे बंधनकारक, तेवढेच असे पत्रक तूट असतानादेखील भरणे हिताचे असते. मात्र असे परिपत्रक वेळेवर भरणे बंधनकारक असते. ही वेळ आयकर कायद्याच्या कलम १३९ मध्ये ठरवून दिलेली आहे. त्यातही पोट–कलम (१), (३) व (४) मधील तरतुदी सकृत्दर्शनी परस्परविरोधी असल्याचा भास निर्माण होतो. पोटकलम (१)मध्ये सर्वसाधारणपणे पत्रक केव्हा भरायचे याविषयी तरतूद आहे, तर पोटकलम (३)मध्ये तोटा असताना पोटकलम (१)मध्ये घातलेल्या मर्यादेच्या आतच पत्रक भरले पाहिजे असे बंधन घातले आहे, तर पोटकलम (४)मध्ये पहिल्यांदाच असे पत्रक भरणाऱ्यांसाठी वेळेच्या वेगळ्या मर्यादा घातलेल्या आहेत. आयकर खाते, तोट्याच्या पत्रकासाठी पोटकलम (३)मधील तरतुदींसाठी अधिक जागरूक असल्याने करदात्यांनी याबाबतीत सावध असणे आवश्यक आहे.

**पुढे खेचता येणारा तोटा**

एखाद्या वर्षात झालेला असा तोटा पुढील आठ वर्षांपर्यंत वजावटीसाठी खेचता येऊन तेवढ्या काळात जर त्याची वजावट होऊ शकली नाही, तर तो बाद ठरतो. अशा वजावटीच्या तरतुदी आयकर कायद्यातील कलम ७० ते कलम ८० यांमध्ये सामावलेल्या आहेत.

तोट्याचे असे पत्रक भरणे नवीन करदात्यांसाठी (म्हणजे प्रथमच पत्रक भरणाऱ्यांसाठी) ऐच्छिक असले, तरीदेखील एकदा आपण पत्रक भरायला सुरुवात केल्यानंतर मात्र दरवर्षी असे पत्रक भरत राहणे आपल्यावर

बंधनकारक असते. मग एखाद्या वर्षी आपले उत्पन्न करपात्र मर्यादेच्या खाली असले तरी पत्रक भरणे अनिवार्य असते.

**तरतूद व्यवसाय उत्पन्नापुरतीच**

तोट्याच्या अशा वजावटीची तरतूद फक्त व्यवसायधंद्यातून मिळणाऱ्या उत्पन्नापुरतीच मर्यादित असते. इतर कुठल्याही प्रकारच्या उत्पन्नाच्या वर्गवारीसाठी ती लागू नाही. उदाहरणार्थ, जमीनजुमल्यापासून अथवा व्याज–लाभांश इत्यादींपासून मिळणारे उत्पन्न. अशा प्रकारे उत्पन्न मिळवणाऱ्या करदात्यांना एखाद्या वर्षात काही कारणांसाठी तूट आली, तर त्यासाठी पुढील वर्षातील उत्पन्नातून वजावट मिळत नाही. अपवाद फक्त जमीनजुमल्यातून उत्पन्न मिळवण्यासाठी जी गुंतवणूक केलेली असते त्यावर द्यायला लागणाऱ्या व्याजाचा. अशा प्रकारच्या व्याजाची रक्कम जर गुंतवणुकीतून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या रकमेपेक्षा अधिक असली, तर तेवढ्यापुरती तूट पुढे खेचून वजावट मागण्याची सवलत कायद्याने दिलेली आहे.

जमीनजुमल्यापासून म्हणजेच भाड्यापासून मिळणाऱ्या काही विचित्र तरतुदींचा विचार आपल्याला पुढील लेखात करायचा आहे.

विवेक, १५–०४–१९८४

* * *

# गृहसंपत्तीपासून मिळणारे उत्पन्न

## (Income From House Property)

एखाद्या व्यक्तीचे करपात्र उत्पन्न काढताना त्याच्या उत्पन्नाची विभागणी प्रथम वेगवेगळ्या गटात करण्यात येते हे आपण आधी बघितले आहेच. उदाहरणार्थ, पगारातून मिळणारे उत्पन्न, व्यवसाय-धंद्यातून मिळणारा नफा, व्याज व लाभांशातून मिळणारे उत्पन्न इत्यादी उत्पन्नांची अशी गटवार विभागणी केल्यानंतर, तसे उत्पन्न मिळवण्यासाठी करायला लागणाऱ्या खर्चासाठी वजावट मिळून मग त्या गटातील करपात्र उत्पन्न ठरवले जाते.

प्रत्येक गटातील असे करपात्र उत्पन्न काढल्यानंतर त्या सर्वांची बेरीज करून त्यातून सवलतपात्र उत्पन्न व खर्च इत्यादी वजा केले जाते. उदाहरणार्थ, बँकेकडील ठेवींवर मिळणारे व्याज, लाभांश, आयुर्विम्याचे भरलेले हप्ते इत्यादी.

उत्पन्नाचा असाच एक गट म्हणजे गृहसंपत्तीपासून मिळणारे उत्पन्न. थोडक्यात, भाड्यापासून मिळणारे उत्पन्न. तर या गटात मोडणाऱ्या उत्पन्नातील करपात्र उत्पन्न कसे ठरवले जाते याविषयीच्या सर्वसामान्य तरतुदींचा विचार या लेखात आज आपण करायचा आहे.

**काही विचित्र तरतुदी**

आयकर कायद्यातील कलम २२ ते कलम २७ यांमध्ये यासंबंधीच्या तरतुदी आहेत. यांतील काही तरतुदी चांगल्याच विचित्र आहेत. त्याचे पहिले कारण असे की, त्यात ज्या प्रकारच्या संपत्तीचा विचार केला आहे ती म्हणजे, बांधलेले घर व त्याला लागून असलेली मोकळी जागा. असे घर व मोकळी जागा (असल्यास) यापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचाच या गटात समावेश होतो. नुसतीच मोकळी जमीन असली व त्यापासून काही भुईभाडे मिळत असेल, तर मात्र त्याचा समावेश या गटात होणार नाही, तेव्हा त्याचा विचार 'इतर उत्पन्न' म्हणूनच करावा लागेल.

दुसरे कारण असे की या प्रकारात आपल्याला काही उत्पन्न प्रत्यक्षात मिळायला हवेच असेही नाही. आपल्याकडे घर आहे ना? मग ते भाड्याने दिलेले असो वा नसो, त्यात आपण स्वत: राहत असो वा ते घर रिकामे

असो, ते जर आपण भाड्याने दिले, तर त्यापासून आपल्याला साधारणत: काय उत्पन्न मिळू शकेल, हे स्थानिक स्वराज्य संस्थेने (Municipality) त्यावर आकारलेल्या कराच्या आधारे ठरवायचे आणि मग ते आपले त्या गृहसंपत्तीपासून मिळणारे उत्पन्न असे गृहीत धरायचे.

ते जर आपण भाड्याने दिलेले असले, तर प्रत्यक्षात मिळत असलेले असे भाडे अथवा वर विचार केल्याप्रमाणे गृहीत धरलेले भाडे, यांत अधिक असेल ती रक्कम आपले त्या गृहसंपत्तीपासून मिळणारे उत्पन्न समजले जाते.

**मिळणाऱ्या सवलती**

अशा रितीने मिळणाऱ्या भाड्यातून ज्या खर्चासाठी वजावट मिळते, त्या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे देता येईल –

१) ज्या जमिनीवर गृहसंपत्ती आहे, अशा जमिनीसाठी भरावे लागणारे भुईभाडे अथवा महसूल आकारणी.

२) महसुलाचा आकार तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांनी लादलेले कर.

३) गृहसंपत्तीवरील विम्याची आकारणी.

४) भाडे वसुलीसाठी करावा लागणारा खर्च, उत्पन्नाच्या सहा टक्क्यांपर्यंत.

५) दुरुस्तीसाठी, उत्पन्नाच्या एक षष्ठांश एवढी रक्कम मग असा खर्च असो वा नसो. तसेच प्रत्यक्ष दुरुस्तीचा खर्च अशा १/६ पेक्षा कमी अधिक कसाही असला तरी त्याचा विचार केला जात नाही.

६) याशिवाय अशी गृहसंपत्ती ३१ मार्च १९८२ नंतर बांधलेली असली, तर पहिल्या पाच वर्षांपर्यंत रु. ३६०० ची सर्वसाधारण वजावट प्रत्येक गृहाबाबत मिळते.

७) एवढी वजावट केल्यानंतर येणारे उत्पन्न जर तुटीचे असले, तर अशा गृहसंपत्तीपासूनचे उत्पन्न शून्य धरले जाते. या गटात तूट आल्यास त्यासाठी इतर उत्पन्नातून अथवा पुढील वर्षाच्या उत्पन्नातून वजावट मिळत नाही.

८) अशा उत्पन्नातून वजावटीस पात्र असलेली अजून एक खर्चाची रक्कम म्हणजे अशा गृहसंपत्तीत गुंतवणूक करण्यासाठी घेतलेल्या कर्जावर देण्यात येत असलेले व्याज. अशा व्याजाची रक्कम जर उत्पन्नापेक्षा अधिक असली, तर तेवढ्यासाठी मात्र इतर उत्पन्नातून वजावट मिळण्याची तरतूद आहे.

गेल्या आर्थिक वर्षापर्यंत, गृहसंपत्ती बांधून ती वापरात आणायच्या आधीच्या काळात अशा प्रकारे दिलेल्या व्याजासाठी वजावट मिळत नव्हती. त्यामुळे नानाविध मार्गांने कर्ज उभे करून छोटेसे घरकुल अथवा फ्लॅट घेताना, असा फ्लॅट ताब्यात येईपर्यंत वर्षानुवर्षे व्याज भरत राहणाऱ्या मध्यमवर्गीयांची फार हानी होत असे. आता यापुढे मात्र, असे घर वापरात येईपर्यंतच्या काळात दिल्या गेलेल्या व्याजासाठी, ते घर वापरात आल्यापासूनच्या पाच वर्षांच्या काळात पाच समान वार्षिक हप्त्यांची वजावट मिळण्याची तरतूद कायद्यात झालेली आहे.

**इतर वजावटी (Deductions)**

अशी जागा आपण भाड्याने न देता स्वत:च्या अथवा आपल्यावर अवलंबून असलेल्या कुटुंबीयांच्या रहिवासासाठी वापरत असलात तरीदेखील त्यावरच्या गृहीत उत्पन्नावर आपल्याला कर भरायला हवा, हे आपण आधी बघितलेच आहे. अशा गृहीत उत्पन्नामधून आपल्याला वरीलप्रमाणेच सर्व खर्चासाठी वजावट मिळते. त्याशिवाय, भुईभाडे व स्थानिक कर वजा जाता राहिलेल्या उत्पन्नाच्या निम्म्या रकमेएवढी वजावट मिळते. यास कायद्याच्या परिभाषेत म्हणतात, Self-occupancy at lowance. मात्र आपण असा Self-occupancy allowance घेत असाल, तेव्हा नवीन घरासाठी मिळणारी रु. ३६०० ची सर्वसाधारण सूट मिळत नाही.

तसेच अशी जागा जर वापरात न येता नुसतीच पडून असली, तर त्यापासूनचे उत्पन्न शून्य धरले जाते. याचाच अर्थ अशा रिकाम्या पडून राहिलेल्या घराच्या बाबतीत आपणास व्याजासाठीदेखील वजावट मिळणार नाही.

सहकारी गृहसंस्थांमध्ये राहणाऱ्या लोकांना सोसायटीची देखभाल वर्गणी भरायला लागते. अशा खर्चासाठी वजावट मिळत नाही, हे मुद्दाम नमूद करावयास हवे.

**सहमालकीची जागा**

जेव्हा अशी गृहसंपत्ती एकाहून अधिक व्यक्तींच्या नावे असते, तेव्हा त्या सर्व व्यक्तींना त्या जागेचे सहमालक समजले जाऊन त्यापासून मिळणारे उत्पन्न अथवा गृहीत उत्पन्न त्या सर्व व्यक्तींमध्ये विभागले जाऊन त्याप्रमाणे करआकारणी होते. अशा सहमालकीमध्ये जर प्रत्येकाचा भाग किती याचा

प्रत्यक्ष उल्लेख असला, तर त्या प्रमाणात अथवा एकूण गुंतवणुकीत असलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या हिश्शाप्रमाणे अशा उत्पन्नाची विभागणी केली जाते.

कुटुंबातील इतर व्यक्तींच्या नावे गृहसंपत्तीत गुंतवणूक केल्यास त्यापासून मिळणारे उत्पन्न आपल्या उत्पन्नात दाखवायला नको असा एक समज सर्वसाधारण करदात्यांत असतो. तो कसा चुकीचा आहे, हे आपण 'बेनामी गुंतवणूक' करून नामानिराळे होता येत नाही, पुढील एका लेखात बघणार आहोत.

विवेक, ९-०९-१९८४

* * *

# गुडविल म्हणजे काय?

'गुडविल' ही एक विचित्र, मजेदार, गोंधळात टाकणारी; मात्र तेवढीच खरीखुरी संकल्पना आहे. एखाद्या व्यवसाय-धंद्याच्या संदर्भात 'गुडविल' म्हणजे काय? त्याचे मूल्य कसे ठरवायचे? करकायद्यांच्या संदर्भात त्याचे स्थान काय? या प्रश्नांची उत्तरे शोधायचा प्रयत्न आपल्याला या लेखात करायचा आहे.

'गुडविल'ला व्याख्येत बसवणे कठीण आहे. ते अदृश्य असले तरी काल्पनिक मात्र नव्हे. तसेच त्याला व्यवसायातील इतर मालमत्तेपासून वेगळे करून त्याचे स्वतंत्ररीत्या मूल्यांकन करणे अवघड आहे. त्याहून ते वेगळे करून स्वतंत्रपणे विकणे तर अशक्यच आहे. कारण ते नेहमीच व्यवसायाशी संबंधित असते. एवढेच नव्हे, तर व्यक्तिपरत्वे त्याची कारणे आणि मूल्येही बदलत जातात. मग त्याची कारणे आणि मूल्ये काहीही असोत.

**'गुडविल' एक व्यापक संस्था**

'गुडविल' म्हणजे व्यवसायाची पत काय? नाही, तेवढेच नव्हे. व्यवसायाने बाजारात, समाजात मिळवलेली पत म्हणजे 'गुडविल'चा केवळ एक भाग झाला. 'गुडविल' नुसते व्यावसायिक पतीवरच अवलंबून असते, असे नव्हे तर त्या व्यवसायाचे स्वरूप, ते करण्याचे ठिकाण, त्याचे व्यवस्थापन, त्याची पूर्वपीठिका, नफा मिळवण्याची व वाढवण्याची त्याची क्षमता, व्यवसायाचे तंत्र, बाजारातील स्पर्धा व इतर स्पर्धकांची क्षमता/पत इत्यादी अनेक गोष्टींवर ते अवलंबून असते.

एखाद्या व्यवसायाच्या संदर्भात 'गुडविल' म्हणजे एका बाजूला त्याची दृश्य मालमत्ता व दुसऱ्या बाजूला त्याची देणी आणि जबाबदाऱ्या यांची वजावट करून जी रक्कम येते त्यापेक्षा जी अधिक किंमत तो व्यवसाय चालू स्वरूपात विकून येऊ शकेल ती किंमत.

लोक अशी अधिक किंमत द्यायला का तयार होतात? याची कारणे अनेक असतात. तसेच व्यक्तिपरत्वे ती बदलत जातात.

म्हणजे असे की, एखाद्या व्यक्तीस त्या व्यवसायाच्या जागेचे आकर्षण असते आणि त्यामुळे तो त्यासाठी अधिक किंमत द्यायला उद्युक्त होतो. याउलट, दुसऱ्या एखाद्या व्यक्तीला त्या व्यवसायाची पूर्वपीठिका आणि त्याने

मिळवलेले नाव अधिक महत्त्वाचे वाटते. काही वेळा याचा संबंध उत्कृष्ट व्यवस्थापनाशी असतो, तर कोणी तो उत्पादनक्षमतेशी जोडतो.

उदाहरणेच द्यायची, तर अनेक देता येतील. बाजारात गेल्यावर आपण गोदरेजच्या कपाटासाठी इतर कपाटांपेक्षा चढी किंमत द्यायला तयार होतो की नाही? हे गोदरेजचे 'गुडविल' नव्हे काय? रत्नागिरीचा हापूस, काश्मीरची लोकर आणि बंगलोरची सिल्क यांसाठी ग्राहक दोन पैसे अधिक मोजायला राजीखुशीने तयार होतो की नाही? आयात-निर्यातीचा व्यापार करणारी पेढी आपल्या कार्यालयासाठी मुंबईतील उपनगरापेक्षा फोर्टमधील जागेसाठी कितीतरी पटीने अधिक पैसे द्यायला तयार होते की नाही?

म्हणजेच काय तर 'गुडविल' किंवा त्याची किंमत ठरवताना व्यवसायाचा इतिहास, भूगोल, ग्राहकाच्या मनातील त्याचे स्थान (म्हणजेच मानसशास्त्र) अशा वेगवेगळ्या दृष्टीकोनातून विचार केला जातो. व्यक्तिपरत्वे तो बदलत जातो. पशुपक्ष्यांची उदाहरणे देऊन असे म्हणता येईल की मांजराचे प्रेम जागेवर असते, तर कुत्र्याचे त्याच्या मालकावर. म्हणजे असे की, आपण जर एखादे मांजर पाळलेले असले आणि आपण जागा बदलली, तरी मांजर सहसा जुनी जागा सोडून जायला तयार होत नाही. कुत्र्याची निष्ठा मात्र जागेपेक्षा व्यक्तीवर अधिक असते आणि तो मालकाबरोबर नव्या जागेत जाणे पसंत करतो. याउलट, मांजर मात्र जिथे उंदीर खायला मिळेल, तिथे जायला तयार असते. सत्तेभोवती घोटाळणाऱ्यांसारखे त्याचे प्रेम ना जागेवर ना माणसावर!

म्हणूनच व्यवसाय-धंद्याच्या संदर्भात त्याच्या 'गुडविल'ची व्याख्या करणे जसे कठीण, तसेच त्याची कारणमीमांसा करणे अवघड! त्याची मालकी व्यवसायाबरोबरच बदलत असते.

व्यवसायात अशा 'गुडविल'ची किंमत वेगवेगळ्या वेळी, वेगवेगळ्या परिस्थितीत आणि वेगवेगळ्या संदर्भात करावी लागते.

**'गुडविल' केव्हा देतात?**

उदाहरणार्थ, एखादा व्यवसाय चालू स्वरूपात विकायचा असला, तर त्याचा मालक 'गुडविल' मागतो. एखाद्या भागीदारीत नवीन भागीदारास प्रवेश द्यायचा असला, तर जुने भागीदार 'गुडविल' मागतात. तसेच एखाद्या भागीदारास निवृत्त करायचे/व्हायचे असले, तर त्याला 'गुडविल' द्यायला

लागते. भागीदारी व्यवसायाचे प्रायव्हेट लिमिटेडमध्ये रूपांतर करायचे असले, तर भागीदारी व्यवसायाचे 'गुडविल' ठरवले जाते. मात्र असे करणे अनिवार्य असते अथवा 'गुडविल' द्यायला हवेच असा कायदा/नियम नाही. व्यवसायाच्या स्वरूपावर व संबंधित व्यक्तींमधील करारमदारावर 'गुडविल' देणे न देणे अवलंबून असते. 'गुडविल' देणे-घेणे बेकायदेशीर नव्हे. किंबहुना उपरनिर्दिष्ट संदर्भात 'गुडविल'ची किंमत ठरवून त्याप्रमाणे व्यवहारात त्याची नोंद व्हायला हवी असाच कर विषयक कायद्याचा आग्रह असतो. कारण 'गुडविल' म्हणजे सर्वसंमत भाषेतील 'पागडी' नव्हे. एखाद्या जागेचे हस्तांतर करताना 'पागडी' देणे-घेणे बेकायदेशीर असले, तरी त्या जागेत चालू असलेल्या व्यवसायाचे जागेसहित हस्तांतर करताना देण्या-घेण्यात येत असलेल्या 'गुडविल'वर कायद्याचे बंधन अथवा त्याची मनाई नाही.

**'गुडविल' ठरवणे सोपे नाही**

व्यवसायाच्या 'गुडविल'चा संबंध अनेक घटकांशी असल्यामुळे त्याची किंमत ठरवणे फार अवघड असते, हे मागे सांगितले आहेच. परंतु, सर्वसाधारणपणे 'गुडविल'चे मूल्य ठरवताना व्यवसायाच्या नफा मिळवण्याच्या क्षमतेचा विचार प्रामुख्याने केला जातो. असे मूल्य व्यावसायिक चार्टर्ड अकाऊन्टन्टस्‌कडून केले जाते. मात्र व्यवहारात असे मूल्य ठरवण्याचे प्रत्येक व्यावसायिकाचे, स्वत:चे काही आडाखे असतात आणि त्याप्रमाणे संबंधित व्यक्तींनी आपापसात विचारविनिमय करून व आपले ठोकताळे लावूनच असे मूल्य ठरवले जाते.

'गुडविल' निर्माण होणे व ते वाढणे ही एक प्रक्रिया आहे. जसजसा व्यवसायाचा जम बसत जातो, त्याची व्याप्ती वाढत जाते, उत्पादन व नफानिर्मितीची क्षमता वाढत जाते, जागेची किंमत वाढत जाते, तसतसे 'गुडविल'चे मूल्य वाढत जाते.

याउलट, उत्पादनाची नवनवीन तंत्रे, हत्यारे, अवजारे, यंत्रसामग्री, नवनवीन स्पर्धक, व्यवस्थापनातील शिथिलता, औद्योगिक कलह, सरकारी नियंत्रणे यांमुळे चालू व्यवसायाचे 'गुडविल' घटतही जाते. त्यामुळेच 'गुडविल'चे मूल्य सारखे बदलत राहते असे म्हणावयास हवे.

वेगवेगळ्या परिस्थितीत अशा तऱ्हेने मिळणारे 'गुडविल'चे उत्पन्न करपात्र असते काय? असल्यास त्याचे मूल्यमापन व कर आकारणी कशी

होते? नसल्यास, त्याला कायद्यातील कोणत्या कलमांचा अथवा न्यायालयीन निवाड्यांचा आधार आहे?

**'गुडविल' कॅपिटल ॲसेट**

कायद्याच्या परिभाषेत आयकराच्या संदर्भात बोलायचे तर 'गुडविल' हे एक कॅपिटल ॲसेट आहे. त्यामुळे वेगवेगळ्या परिस्थितीत 'गुडविल'चे हस्तांतर होऊन मिळणारे उत्पन्न हे 'कॅपिटल गेन'च्या सदरात मोडते आणि म्हणूनच त्याची आकारणी कॅपिटल गेनशी संबंधित असलेल्या कलमाखाली होते.

आयकर कायद्याखाली एखाद्या 'कॅपिटल ॲसेट'चे हस्तांतर होते, तेव्हा त्या ॲसेटच्या विक्रीच्या व खरेदीच्या किमतीत जी तफावत असते, त्यास 'कॅपिटल गेन' म्हणतात व त्या कॅपिटल गेनची उत्पन्न म्हणून करआकारणी होते. आपणच सुरू केलेल्या व्यवसायातील 'गुडविल' स्वनिर्मित असते. त्यामुळे त्याची खरेदीची किंमत नसते. म्हणूनच अशा परिस्थितीत'गुडविल'चे हस्तांतर होऊन मिळणाऱ्या रकमेतील कॅपिटल गेन ठरवता येत नाही. त्यामुळे त्यावर कॅपिटल गेन आकारता येत नाही, म्हणजेच असे उत्पन्न करपात्र नाही, असे निवाडे मुंबई व मद्रास उच्च न्यायालयाने दिलेले आहेत आणि सर्वोच्च न्यायालयाने ते वैध ठरवले आहेत. (कमिशनर ऑफ इनकम् टॅक्स वि. होम इंडस्ट्रीज आणि कं., कमिशनर ऑफ इनकम् टॅक्स वि. रत्नम नादर, इ.). खरे म्हणजे अशा परिस्थितीत 'गुडविल' म्हणून मिळणारी सर्व रक्कम करपात्र व्हावयास हवी. कलकत्ता व केरळ न्यायालयाचे निवाडे मात्र याच्या उलट आहेत.न्यायालयाचे निवाडे बऱ्याच वेळा सर्वसामान्यांच्या आकलनाबाहेरचे असतात हेच खरे. अशा परिस्थितीत कायद्यात यासंबंधी योग्य ते स्पष्टीकरण देऊन संदिग्धता नष्ट करणे आवश्यक आहे, असे सुचवावेसे वाटते.

**न्यायलयाचे निवाडे**

भागीदार निवृत्त होताना त्यास मिळालेले 'गुडविल' वा त्या पोटी त्याच्या वाटणीस आलेली मालमत्तादेखील करमुक्त असल्याचा निवाडा गुजरात न्यायालयाने मोहनभाई पामाभाईच्या केसमध्ये दिलेला आहे. कारण अशा परिस्थितीत त्या ॲसेटचे हस्तांतरच झालेले नाही, असे करदात्यांचे म्हणणे न्यायालयाने ग्राह्य धरले.

मात्र ज्या ठिकाणी एकदा हस्तांतर होऊन ‘गुडविल’साठी काही किंमत द्यावी लागली आहे, अशा ठिकाणी दुसऱ्यांदा हस्तांतर होऊन ‘गुडविल’पोटी काही कॅपिटल गेन झाला, तर तो करपात्र होणार हे निर्विवाद.

भागीदारीचे प्रायव्हेट लिमिटेडमध्ये रूपांतर करताना ‘गुडविल’वर कॅपिटल गेन कर ओढवणार नाही हे बघणे अतिशय महत्त्वाचे होय, असे मी मागील लेखात म्हटले होते, त्याचे मर्म हेच.

चालू व्यवसायात ताळेबंदात ‘गुडविल’ घेतलेले नसले, तर केवळ वेल्थ टॅक्ससाठी त्याचे मूल्यांकन करण्याची आवश्यकता नाही की त्यावर वेल्थ टॅक्सची आकारणी करता येणार नाही.

तसेच एखाद्या भागीदाराचे निधन झाल्यास, भागीदारीपत्रकात ‘गुडविल’ देण्यासंबंधी तरतूद नसली, तर इस्टेट ड्यूटीसाठी त्याचे मूल्यांकन करता येत नाही. एरवी मात्र त्यावर इस्टेट ड्यूटीची आकारणी होण्याची शक्यता अधिक आहे.

भागीदारी व्यवसायात वेगवेगळ्या परिस्थितीत व संदर्भात करदात्यांच्या वारसदारांना भागीदारीत प्रवेश देताना ‘गुडविल’चे हस्तांतर होते काय व होत असल्यास त्यावर गिफ्ट टॅक्स आकारता येईल काय, असे प्रश्न न्यायालयासमोर उभे राहिले असता त्यावर न्यायालयांनी सर्वसाधारणपणे नकारात्मक म्हणजेच करदात्यांच्या बाजूने निवाडे दिलेले आहेत.

म्हणूनच असे म्हणावेसे वाटते की ‘गुडविल’ची कर आकारणी हा एक क्लिष्ट आणि गुंतागुंतीचा तसाच गोंधळाचा विषय होऊन बसलेला आहे. त्या संबंधीच्या न्यायालयीन निवाड्यांचा इत्थंभूत विचार करण्याचा या लेखाचा उद्देश नसला, तरी त्यांचा पुसटसा उल्लेख मात्र केलेला आहे. अभ्यासकांना तो अपुरा वाटायची शक्यता असली, तरी लेखाची मर्यादा लक्षात घेऊन जास्त विस्तृत चर्चा केलेली नाही.

‘गुडविल’ला व्याख्येत बसवणे जेवढे कठीण, त्याला मराठी प्रतिशब्द शोधणेसुद्धा तेवढेच अवघड. त्याला सुयोग्य प्रतिशब्द लक्षात आला, तर वाचकांनी तो अवश्य कळवावा.

विवेक, २९-०७-१९८४

* * *

# आयकरपद्धती – भारत व जपान (पूर्वार्ध)

आपल्या देशात उत्पन्नावर फार मोठ्या प्रमाणावर कर भरावा लागतो आणि त्यामुळे करबुडवेगिरीस फार मोठ्या प्रमाणावर चालना मिळते, अशी हाकाटी नेहमी ऐकायला मिळते. त्यात कितपत तथ्य आहे? इतर पुढारलेल्या देशांत काय परिस्थिती आहे? तेथील करकायदे आपल्या तुलनेत कसे आहेत? यासंबंधी विचार करणे उद्बोधक ठरते.

तसेच जपान हे, दुसऱ्या महायुद्धात उद्ध्वस्त झालेले आशियातील एक चिमुकले राष्ट्र. पण आज जगातील एक पहिल्या प्रतीची औद्योगिक वाढ झालेले व तंत्रज्ञानात आघाडीवर असलेले राष्ट्र. तेथील करपद्धती कशी आहे? तिथे काळा पैसा निर्माण होत नाही काय? तिथे भांडवल उभारणी कशी होते? हे आपल्याला क्रमश: बघायचे आहे, तसेच तेथील करपद्धतीचा आवश्यक तसा आणि आवश्यक तेवढा तुलनात्मक अभ्यास करायचा आहे.

या लेखात आपण जपानमधील आयकर कायदा आणि आपल्या येथील आयकर कायदा व या कायद्यांद्वारे कराच्या स्वरूपात सरकारकडे येणारे उत्पन्न यांचा विचार करायचा आहे.

आधीच हे स्पष्ट करावयास हवे की, मूलत: दोन्ही देशांतील आयकर विषयक कायद्यांचे स्वरूप सारखेच आहे. व्यवसायधंद्यांतून मिळणारे उत्पन्न, भाडे, व्याज, लाभांश, शेती उत्पन्न इत्यादी प्रकारची वर्गवारी सर्वसाधारणपणे दोन्हींकडे आढळते. मात्र आपल्याकडे शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नावर अजून खऱ्या अर्थाने कर द्यावा लागत नसला, तरी जपानमध्ये तो द्यावा लागतो. तसेच टिंबर इनकम (जंगल संपत्तीतून मिळणारे उत्पन्न) अशी एक वेगळी वर्गवारी तिकडे आढळते.

**करदात्यांची वर्गवारी**

आपल्या इथे करदात्यांची वर्गवारी व्यक्ती, हिंदू अविभाज्य कुटुंब, भागीदारी संस्था, कंपन्या (त्यातही अनेक पोटविभाग), सहकारी संस्था, सार्वजनिक विश्वस्तसंस्था व अन्य व्यक्तीसमूह अशी केली जाते. जपानी कायद्याखाली अशी विभागणी फक्त व्यक्ती व कॉर्पोरेशन अशी केली जाते आणि कंपन्या, सहकारी संस्था इत्यादी सर्वांचा समावेश कॉर्पोरेशनमध्ये केला जातो.

व्यक्ती व कॉर्पोरेशनसाठी वेगवेगळे आयकर कायदे जपानमध्ये आहेत. आपल्याकडे सर्वांसाठी एकच आयकर कायदा असून त्यातच प्रत्येक समूहासाठी वेगवेगळ्या तरतुदी केलेल्या आहेत.

आपल्या कायद्याप्रमाणे कर आकारणी वर्ष एक एप्रिल ते एकतीस मार्च असे असले, तरी प्रत्येक करदात्यास आपले उत्पन्न ठरवण्यासाठी आपल्या सोयीचे वर्ष निवडण्याची मुभा आहे. त्यातही एकाच करदात्यास आपल्या उत्पन्नाच्या वेगवेगळ्या साधनांसाठी वेगवेगळे वर्ष निवडणे शक्य असते. जपानमध्ये मात्र प्रत्येक करदात्यास जानेवारी ते डिसेंबर असे एकच वर्ष अवलंबावे लागते आणि दि. १५ मार्चच्या आत आपले रिटर्न भरावे लागते.

आपल्या देशाच्या एकूण महसुलात प्रत्यक्ष कराचा वाटा तसा फारच थोडा. १९८१-८२ च्या आकडेवारीनुसार खालीलप्रमाणे तुलनात्मक माहिती मिळते.

| | **भारत** | **जपान** |
|---|---|---|
| एकूण कर उत्पन्न जर १००% धरले तर : | | |
| अप्रत्यक्ष कर | ७६.१ | २७.६ |
| प्रत्यक्ष कर | २३.९ | ७२.४ |
| त्यातील आयकर | ४.० | ३९.३ |
| कंपनीकर | १७.० | ३१.३ |

यावरून दोन्ही देशांतील वेगवेगळ्या कराचे व्यस्त प्रमाण लक्षात यावे. तसेच जपानी अर्थव्यवस्थेतील व्यक्ती व कॉर्पोरेशन्सच्या उत्पन्नावरील कराचे महत्त्वही लक्षात यावे.

व्यक्तिगत उत्पन्नावरील त्याच वर्षातील किमान व कमाल दर पुढीलप्रमाणे होते :-

| | **भारत** | **जपान** |
|---|---|---|
| | % | % |
| किमान% | १६.५० | १० |
| कमाल% | ६६.०० | ७५ |

यावरून आपल्याकडे आयकराचे प्रमाण फार आहे या विधानातील वैय्यर्थ्य लक्षात यावे.

**करमुक्त उत्पन्नाची मर्यादा**

पण त्याचबरोबर याचाही विचार करायला हवा की, जपानमधील व्यक्तिगत करमुक्त उत्पन्नाची मर्यादा आपल्यापेक्षा बरीच वर आहे. संबंधित वर्षातील आपल्या येथील करमुक्त उत्पन्न रु. ८००० होते, तर जपानमधील २,९०,००० येन. (दोन लाख नव्वद हजार येन, रुपयांच्या भाषेत रु. ११६०० मात्र. जपानमधील येनला येथील रुपयांचेच महत्त्व दिले, तर या आकडेवारीतील तफावत चांगलीच जाणवते.)

तसेच स्वत:साठी व कुटुंबातील व्यक्तींसाठी उत्पन्नाच्या ५% पर्यंत औषधपाण्यावरील खर्च, राहत्या जागेच्या विम्यावरील खर्च, पती/पत्नी व मुलांसाठी वेगळी भरगच्च सूट यांमुळे करमुक्त उत्पन्नाची पातळी बरीच वर जाऊन पोहोचते आणि त्यामुळेच मध्यमवर्गीयास कराचा जाच तेवढा जाणवत नाही.

एवढेच नव्हे तर ठरावीक पद्धतीने जमाखर्च ठेवणाऱ्या व्यक्तीस वेगळी सूट दिली जाते. अशा पद्धतीने जमाखर्च ठेवणाऱ्यांसाठी रिटर्नचा एक वेगळा फॉर्म ठरवून दिलेला आहे. त्यास म्हणायचे 'ब्लू रिटर्न'. हे रिटर्न भरणाऱ्याची आकारणी अतिशय सुलभ होते. आपल्याकडील 'समरी ॲसेसमेंट'च म्हणा ना! पण दोन्ही पद्धतीत खूपच फरक. समरी ॲसेसमेंट करण्यापेक्षा ती कशी न होईल हे बघण्याकडेच आमच्या अधिकाऱ्यांचा कल अधिक! नियमानुसार करआकारणी होण्यासाठी देखील काय, काय प्रकारांना तोंड द्यायला लागते ही माहिती आपल्या येथील प्रत्येक करदाता आणि कर सल्लागार आपणास देऊ शकेल. मात्र जपानमध्ये जाऊन तेथील 'ब्लू फिल्म'ची रसभरित वर्णने करणाऱ्या आमच्या नागरिकांना व अधिकाऱ्यांना तेथील 'ब्लू रिटर्न'चा अभ्यास करून त्याचा कित्ता गिरवावा असे वाटू नये ही खेदाची गोष्ट होय.

**विशेष सवलती**

'फॅमिली एम्प्लॉयी अलाउन्स' हे तेथील व्यक्तिगत कर आकारणीतील एक वैशिष्ट्य. करदात्याच्या कुटुंबात त्याच्या नात्यातील एखादी व्यक्ती राहून त्यास त्याच्या उद्योगधंद्यात मदत करत असली आणि अशा व्यक्तीस पगार दिला जात असला, अथवा तिचा भार करदात्यावर असला तर त्यासाठी वेगळा अलाउन्स दिला जातो.

सर्वसाधारणपणे उत्पन्नाची आकारणी उत्पन्न लागू होण्याच्या वेळीच केली जाते. (Accrual Basis) मात्र छोटे दुकानदार व उद्योजकांना रोख पद्धतीवर जमाखर्च ठेवण्याची मुभा दिली जाते.

तसेच ज्या करदात्यास आपल्या उत्पन्नाची कर आकारणी कॉर्पोरेशन प्रमाणे व्हावी असे वाटते, त्याची करआकारणी त्या पद्धतीने केली जाऊन त्यास आपल्या उत्पन्नातून स्वत:च्या पगाराची वजावट दिली जाते. अशा तऱ्हेने आकारणी झालेल्या करदात्यास 'डिमड् कॉर्पोरेशन' असे संबोधले जाते. त्याचे फायदे काय आणि कॉर्पोरेशन टॅक्सची वैशिष्ट्ये कोणती ते आपण पुढील लेखात बघायचे आहे.

मात्र जपानमध्ये करदात्यांच्या प्रामाणिकपणावर सर्वसाधारणपणे भर दिला जाऊन 'सेल्फ ॲसेसमेंट'च्या तत्त्वावर कर आकारणी केली जाते आणि त्यामुळेच करविषयक अपिलांचेच प्रमाण फार कमी आहे, ही गोष्ट मुद्दाम नमूद करावयास हवी.

**संदर्भ :–**


१) An outline of Japanese Taxes - 1982, A publication of Tax Bureau Ministry of Finance.

२) Interview with Mr. Nishimura an Mr. Uchida, Certified Accountants, Tokyo.


विवेक, १५–०४–१९८४

* * *

# आयकरपद्धती – भारत व जपान (उत्तरार्ध)

जपानमध्ये कंपन्यांच्या उत्पन्नावर करआकारणी होते, ती 'कॉर्पोरेशन इनकम्–टॅक्स ॲक्ट'खाली. या कायद्याखाली करआकारणीसाठी सार्वजनिक महत्त्वाच्या कॉर्पोरेशन्स, सर्वसाधारण कॉर्पोरेशन्स, सहकारी संस्था व इतर व्यक्तीसमूह अशी विभागणी केलेली आढळते. स्थानिक स्वराज्य संस्था व काही सार्वजनिक महत्त्वाच्या संस्थांना आपल्या उत्पन्नावर कर भरायला लागत नाही. मात्र अशा संस्था काही व्यवसाय–धंदादेखील करत असल्या आणि त्यातून काही उत्पन्न मिळवत असल्या, तर त्यावर मात्र त्यांना कर भरावा लागतो. थोडक्यात यासंबंधीच्या तरतुदी आपल्या सारख्याच आहेत.

कंपन्यांचे करपात्र उत्पन्न ठरवण्याची पद्धत सर्वसाधारणपणे आपल्यासारखीच. ज्या खर्चासाठी योग्य व्हाऊचर्स नाहीत, असा खर्च मान्य केला जात नाही. एवढेच नव्हे तर असा खर्च ज्या व्यक्तीच्या माध्यमातून केला जातो, त्या व्यक्तीच्या वैयक्तिक उत्पन्नात त्याची गणना केली जाते. या तरतुदीचा खास उल्लेख करावयास हवा. त्यामुळे असा खर्च जमाखर्चात येण्यावर खूपच निर्बंध येतात.

**काही उल्लेखनीय तरतुदी**

दुसरी उल्लेखनीय तरतूद म्हणजे कंपन्यांना काही मालमत्ता (Assets) घेण्यासाठी सरकारी अनुदान मिळाले, तर त्याची गणना त्या त्या वर्षातील उत्पन्न म्हणून न केली जाता तेवढ्या रकमेने त्या मालमत्तेची घसारापात्र किंमत कमी केली जाते. यामुळे असे अनुदान पूर्णपणे करमुक्त ठरत नसले तरी त्यावर कर भरण्याची जबाबदारी पुढे ढकलली जाते.

कंपन्यांचे करपात्र उत्पन्न ठरवताना कित्येक निधींना वर्ग केलेल्या रकमांसाठी सूट दिली जाते. अशा उल्लेखनीय निधींची वर्गवारी पुढीलप्रमाणे करता येईल :–

१) बुडीत कर्जनिधी

२) विक्री नाकारून परत येणाऱ्या मालासाठी निधी

३) बोनस व निवृत्ती वेतन निधी

४) मालमत्ता दुरुस्ती निधी

५) किंमत फेरफार निधी

६) निर्यात खर्च निधी, इत्यादी.

यांशिवायही इतर अनेक निधींसाठी सूट दिली जाते. आपल्याकडे अशा निधींच्या उभारणीसाठी सूट दिली जात नाही आणि त्यामुळेच बऱ्याच कंपन्यांच्या बाबतीत भांडवल उभारणी होऊ शकत नाही, याचा संबंधितांनी विचार करावयास हवा.

तसेच कर आकारणी करताना निवळ उत्पन्नावर सररास कर आकारणी न करता त्याची दोन भागांत विभागणी करण्यात येते. एक लाभांश म्हणून वाटले जाणारे उत्पन्न व दुसरे राखून ठेवलेले म्हणजेच न वाटले जाणारे उत्पन्न. १९८४ सालासाठी सर्वसामान्य कंपन्यांसाठी असलेले करांचे दर पुढीलप्रमाणे होते :-

| | |
|---|---|
| लाभांश म्हणून वाटले जाणारे उत्पन्न : | ३२% |
| न वाटले जाणारे उत्पन्न : | ४२% |

मात्र ठरावीक रकमेपेक्षा कमी भांडवल असलेल्या छोट्या कंपन्यांसाठी हेच दर अनुक्रमे २४% व ३०% होते. आपल्याकडे वरीलपैकी कुठल्याही निधीसाठी वजावट न मिळताही कंपन्यांना सर्वसाधारणपणे ६०% ते ७०% पर्यंत कर भरावा लागतो. यावरून कंपन्यांमध्ये भांडवल उभारणीवर येणाऱ्या निर्बंधाची कल्पना येऊ शकेल. तसेच उत्पन्न दडविण्याच्या प्रवृत्तीच्या कारणांवरही प्रकाश पडावा.

कंपन्यांना इतर कंपन्यांकडून मिळणारा लाभांश आपल्या भागधारकांमध्ये परत वाटला, तर त्यावरही कर भरावा लागत नाही. आपल्याकडे अतिशय मर्यादित प्रमाणपत्रावर असलेली अशा स्वरूपाची एक सवलतही यंदाच्या अर्थसंकल्पाद्वारे काढून टाकण्यात आली आहे.

कंपन्यांना मिळणाऱ्या या विविध सवलतींसाठी जपानमध्ये अतिशय छोट्या स्वरूपाचे धंदेदेखील कंपन्यांच्या माध्यमातून करण्याची प्रवृत्ती आढळून येते. उदा. छोट्या-छोट्या खाणावळी, किराणा मालाची दुकाने, औषधविक्रीची दुकाने इत्यादी. तसेच आधीच्या लेखात उल्लेख केल्याप्रमाणे 'डीमड् (Deemed) कॉर्पोरेशन'च्या तरतुदीमुळेदेखील करदात्यांना या सवलतींचा फायदा घेता येतो.

व्यक्तीसाठी लागू असलेली 'ब्लू रिटर्न'ची सवलत कंपन्यांनादेखील घेता येते.

**कॅरी बॅकची सवलत**

जपानमधील आयकर कायद्यातील एका तरतुदीचा प्रामुख्याने उल्लेख करावयास हवा. उद्योगधंद्यात नेहमी नफाच होतो असे नव्हे, बऱ्याच वेळा तोटादेखील होतो. व्यवसाय धंद्यात एखाद्या वर्षी आलेला असा तोटा पुढील वर्षी खेचून पुढील वर्षातील उत्पन्नातून त्यासाठी वजावट मिळण्याची तरतूद सर्वत्रच आढळते. भारतात असा तोटा आठ वर्षांपर्यंत पुढे खेचला जाऊ शकतो, तर जपानमध्ये असा तोटा व्यक्तींसाठी तीन वर्षे व कंपन्यांसाठी पाच वर्षे पुढे खेचला जाऊ शकतो. यास कायद्याच्या भाषेत म्हणायचे 'कॅरी फॉरवर्ड ऑफ लॉसेस'.

मात्र जपानमध्ये 'कॅरी फॉरवर्ड'सारखीच विशेष सवलत आहे, ती 'कॅरी बॅक'ची. म्हणजे एखाद्या वर्षात तुम्हांला तोटा असला, तर तो पुढील वर्षी खेचायच्या ऐवजी तुम्ही मागील वर्षातील उत्पन्नातून त्यासाठी वजावट मागून आधी भरलेली रक्कम परत घेऊ शकता. हा पर्याय करदात्यांचा असतो. ही सवलत खरोखरच नमूद करण्यासारखी आहे.

जपानी करपद्धतीत असलेल्या या काही विशेष तरतुदींचा बारकाईने अभ्यास केला, तर त्यामुळे नुसत्या भांडवल उभारणीसच मदत होते असे नाही तर करचुकवेगिरीसही फार मोठ्या प्रमाणावर आळा बसतो, या निष्कर्षाप्रत यावे लागते. थोड्या लोकांकडून जास्त कर वसूल करण्यापेक्षा जास्त लोकांकडून त्यांच्या दैनंदिन गरजा भागवून मर्यादित प्रमाणावर कर घेणे अधिक उपयुक्त असते, असे जपानला पटलेले दिसते. मात्र कंपन्यांवरील करांची मर्यादा ५०%च्या खाली ठेवताना व्यक्तिगत कराची मर्यादा ७५%वर नेऊन ठेवण्याची जपानी कायद्यातील तरतूद विसंगत वाटते. कदाचित भांडवल उभारणी व्यक्तीपेक्षा कंपन्यांच्या हातात करण्यास चालना मिळावी हा यामागील उद्देश असावा. राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीतून ते अर्थातच हितावह होय.

हे झाले प्रत्यक्ष कायद्यातील आयकराविषयी. त्यानंतर आपल्याकडे ज्याप्रमाणे संपत्तिकर (Wealth tax) आहे, त्याप्रमाणे संपत्तीवर निर्बंध आणणारा कायदा जपानमध्ये नाही.

**वारसा करासंबंधीचे नियम**

माञ आपल्याकडे वारसाकर (Estate Duty) व भेटकर (Gift tax) यांना समांतर असे Inheritance tax व Gift tax जपानमध्येही आहेत. तेथील वारसाकराच्या बाबतीत मुद्दाम उल्लेख करायची तरतूद म्हणजे मृत व्यक्तीच्या एकूण इस्टेटीवर करआकारणी न होता, ज्या त्या वारसदाराला फक्त त्याला मिळणाऱ्या इस्टेटीवर कर भरावा लागतो आणि असा कर भरण्याची जबाबदारी त्यांची असते. म्हणूनच असा कर खऱ्या अर्थाने 'इस्टेट ड्यूटी' न ठरता 'वारसा कर' ठरतो.

माझ्या लक्षात आलेली, जपानी प्रत्यक्ष करपद्धतीतील ही काही ठळक वैशिष्ट्ये. आपल्याकडे प्रचलित असलेल्या/नसलेल्या तशाच काही तरतुदींशी व माझ्या आकलनात आलेल्या त्यांच्या परिणामांशी ही एक तुलना. परत केव्हा तरी एकदा आपण असाच अप्रत्यक्ष करपद्धतीचादेखील तुलनात्मक अभ्यास करू.

विवेक, २२-०४-१९८४

* * *

# भागीदारी संस्था व खासगी मर्यादित कंपनी

एकाहून अधिक व्यक्ती एकत्र येऊन जेव्हा नवीन उद्योग अथवा व्यवसाय करू इच्छितात, तेव्हा त्यांना सर्वप्रथम विचार करावा लागतो तो त्या धंद्याच्या स्वरूपाविषयी, म्हणजेच तो व्यवसाय भागीदारी म्हणून करायचा की प्रायव्हेट लिमिटेड कंपनी म्हणून? तसेच भागीदारीत करत असलेल्या व्यवसायाचे प्रायव्हेट लिमिटेड कंपनीत रूपांतर केव्हा, कसे आणि का करायचे व त्याचे फायदे-तोटे काय असा एक दुसरा प्रश्न नेहमी विचारला जातो. येथे आपण विचार करायचा आहे, तो पहिल्या प्रश्नाचा. म्हणजेच भागीदारी संस्था व प्रायव्हेट लिमिटेड कंपनी यांचा एक तुलनात्मक अभ्यास.

अशी तुलना विविध अंगाने करायला हवी. अगदी त्याच्या स्वरूपापासून ते नोंदणी, कायदेशीर अस्तित्व व कर कायद्याखालील जबाबदारी पर्यंत.

**१) स्वरूप :** दोन किंवा अधिक सज्ञान व्यक्ती (वयाची किमान अठारा वर्षे पूर्ण झालेली) एकत्र येऊन आपापसात भागीदारी करार करून आपल्या फर्मचे नाव नक्की करून त्या नावाखाली व्यवसाय करू शकतात. अशा रितीने एकत्रितपणे काम करणाऱ्या व्यक्तींना भागीदार म्हणतात व त्यांचे हक्क व जबाबदाऱ्या समान असतात. मात्र कोणी किती भांडवल आणायचे व नफा-तोट्यात कोणाच हिस्सा किती असावा हे भागीदारी पत्रकाद्वारे ठरवता येते. अशा फर्मचा कारभार भागीदारांमार्फत चालतो. एखाद्या फर्ममध्ये जास्तीत जास्त दहा व बँकींग व्यवसाय करणाऱ्या अशा भागीदारीत जास्तीत जास्त वीस भागीदार राहू शकतात.

प्रायव्हेट लिमिटेड कंपनी सुरू करायलादेखील किमान दोन सज्ञान व्यक्तींची आवश्यकता असते. प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या प्रत्येक सभासदास 'शेअरहोल्डर' म्हणतात व अशा सभासदांची जास्तीत जास्त संख्या पन्नास असू शकते. प्रा.लि.कं. 'मेमोरंडम ऑफ असोसिएशन' व 'आर्टिकल्स ऑफ असोसिएशन'द्वारे अस्तित्वात येते व तिचा कारभार शेअरहोल्डर्सनी निवडून दिलेल्या संचालक मंडळामार्फत (बोर्ड ऑफ डायरेक्टर्स) चालतो.

**२) नोंदणी व कायदेशीर अस्तित्व :** भागीदाराची नोंदणी इंडियन पार्टनरशिप ॲक्ट, १९३२ खाली रजिस्ट्रार ऑफ फर्मस्‌कडे केली जाते, तर प्रा.लि.कं.ची नोंदणी कंपनीज ॲक्ट, १९५६ खाली रजिस्ट्रार ऑफ कंपनीज्‌कडे केली जाते.

'भागीदारी' च्या नोंदणीचे काम सोपे व कमी खर्चाचे असते, तर प्रा.लि.कं.च्या नोंदणीचे काम तुलनेत बऱ्याच अधिक खर्चाचे, जिकिरीचे व वेळ घेणारे असते.

प्रा.लि.कं. स्थापन करताना आधी तिचे नाव रजिस्ट्रार ऑफ कंपनीकडून मंजूर करून घ्यावे लागते, तर पार्टनरशिप (भागीदारी)साठी अशी तरतूद नाही. त्यामुळे एकाच नावाच्या अनेक भागीदारी संस्था एकाच वेळी दिसत असल्या तरी प्रा.लि.कं.च्या बाबतीत असे आढळणार नाही.

कायद्याच्या दृष्टीकोनातून प्रा.लि.कं. ही एक वेगळी व्यक्ती समजली जाते, तर पार्टनरशिपला असे वेगळे अस्तित्व नाही. म्हणूनच प्रा.लि.कं. तिच्या शेअरहोल्डर्सपासून वेगळी समजली जाते, तर पार्टनरशिप तिच्या भागीदारांपासून वेगळी समजली जात नाही.

**३) सभासदांची आर्थिक जबाबदारी :** भागीदारी संस्थेच्या व्यवहारासंबंधी तिच्यातील भागीदारांची जबाबदारी अमर्यादित समजली जाते, तर प्रा.लि.कं.च्या संदर्भात तिच्या भागधारकांची जबाबदारी त्या त्या भागधारकांच्या भागभांडवलापुरतीच मर्यादित समजली जाते. या एका कारणामुळेच प्रा.लि.कं.ला भागीदारीच्या तुलनेत अधिक प्राधान्य दिले जाते.

**४) दैनंदिन कारभार व व्यवस्थापन :** भागीदारीचा दैनंदिन कारभार सर्व भागीदार अथवा त्यांनी आपापसात ठरवल्याप्रमाणे एका अथवा काही भागीदारांमार्फत बघितला जातो. त्याचे व्यवस्थापन सर्वसाधारणपणे सोपे व साधे असते.

या उलट प्रा.लि.कं.चा दैनंदिन कारभार भागधारकांनी निवडून दिलेल्या संचालकांमार्फत बघितला जातो. व्यवस्थापन मंडळाने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयानुसार काम केले जाते. मंडळाच्या बैठकींचा वृत्तांत ठेवला जातो. संचालक मंडळ, भागभांडवल इत्यादींत होणारे बदल रजिस्ट्रार ऑफ कंपनीला ठरावीक नमुन्यांचे फॉर्मस भरून वेळचेवेळी कळवावे लागतात. म्हणजेच यात कायद्याचे नियंत्रण अधिक असते. जमाखर्चाची वार्षिक

तपासणी (ऑडिट) करवून घेणे व ठरावीक मुदतीत अहवाल सादर करणे कायद्याने आवश्यक असते. कायद्याच्या असल्या वाजवी नियंत्रणामुळेच प्रा.लि.कं.च्या व्यवहारांची विश्वासार्हता अधिक समजली जाते.

**५) उत्पन्नावरील कर आकारणी :** आयकर (इनकम टॅक्स) कायद्याखाली भागीदारी संस्था व प्रा.लि.कं. या दोघांची, त्यांच्या उत्पन्नावर वेगवेगळी कर आकारणी होत असते. प्रा.लि.कं.वरील कर आकारणी सर्वसाधारणपणे उत्पन्नाची रक्कम कितीही असली, तरी एका ठरावीक दराने (सर्वसाधारणपणे ५५% ते ६५%) होत असते, तर भागीदारीच्या उत्पन्नाची कर आकारणी उत्पन्नाप्रमाणे वाढत्या दरात (सर्वसाधारणपणे ५ ते २५%) होत असते. मात्र प्रा.लि.कं.त संचालक मंडळाला देण्यात येणारे पगार, भत्ते, व्याज इ. रकमांसाठी वजावट मिळत असली, तरी भागीदारीच्या कर आकारणीत भागीदारांना देण्यात आलेल्या असल्या रकमांसाठी वजावट मिळत नाही.

**६) नफा-तोट्याची वाटणी :** कर आकारणी झालेल्या उत्पन्नाची/तोट्याची वाटणी भागीदारी व्यवसायात, सर्व भागीदारांमध्ये त्यांच्या ठरलेल्या प्रमाणात होते व त्यावर त्यांना वैयक्तिकरीत्या कर भरावा लागतो आणि तोट्याच्या बाबतीत इतर उत्पन्नातून वजावट मिळते. अन्यथा असा तोटा त्या भागीदारांच्या हातात पुढे खेचला जातो.

प्रा.लि.कं.च्या बाबतीत मात्र असे सर्व उत्पन्न भागधारकांमध्ये वाटले जात नाही, तर भागधारकांच्या सर्वसाधारण सभेत ठरेल तेवढे व त्या प्रमाणात लाभांश (डिव्हिडंड)च्या रूपात, भागभांडवलाच्या प्रमाणात वाटले जाते व उर्वरित उत्पन्न कंपनीच्याच हातात रिझर्व्ह अथवा वाटणी न झालेले उत्पन्न म्हणून पुढे खेचले जाते. तसेच तोट्याची वाटणी न होता तो कंपनीच्याच हातात पुढे खेचला जाऊन नंतरच्या वर्षामध्ये वजावट मिळते. हा एक महत्त्वाचा फरक होय.

**७) मालकीचे हस्तांतर, निवृत्ती इत्यादी :** भागीदाराची निवृत्ती अथवा मालकीचे हस्तांतर एरवी कठीण नसले, तरी भागीदारांचे मतभेद अथवा भांडणतंटे असले, तर हे खूपच त्रासदायक ठरण्याची शक्यता असते आणि अनेक वेळा व्यवसाय बंद करण्याची पाळी येते. तसेच एखाद्या भागीदाराने नोटीस देऊन तशी इच्छा प्रदर्शित केली अथवा एखाद्या

भागीदाराचे निधन झाले तर फर्म बंद करण्यास भाग पडण्याची खूप शक्यता असते. प्रा.लि.कं.च्या बाबतीत मात्र असे घडत नाही. भागभांडवलाचे हस्तांतर करून निवृत्ती करणे शक्य असते. तसेच एखाद्या भागधारकाच्या अथवा संचालकाच्या लहरीवर कंपनीचे अस्तित्व अवलंबून असत नाही. कंपनी अस्तित्वात आणणे सोपे असले तरी ती बंद करणे मात्र खूपच कठीण असते. तिचे अस्तित्व कोणाच्या लहरीवर अथवा जगण्यावर अवलंबून असत नाही.

दोन्ही प्रकारच्या संस्थांच्या या वैशिष्ट्यांचा अभ्यास करून मगच आपल्या धंद्याचे स्वरूप ठरवणे इष्ट असते.

सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की, जेव्हा फारसा पूर्वपरिचय वा घसट नसलेल्या व्यक्ती एकत्र येऊन, नवीन व्यवसायात शिरू इच्छितात, तेव्हा प्रा.लि.कं.च्या माध्यमातून व्यवसाय सुरू करणे केव्हाही श्रेयस्कर असते. प्रा.लि.कं.ची विश्वासार्हता निर्विवादपणे अधिक समजली जाते.

आयकराच्या जबाबदारीच्या दृष्टिकोनातून बघता सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की, वैयक्तिक उत्पन्नावरील कर आकारणी ५०%च्या पुढे जात नाही, तोवर प्रा.लि.कं. फायदेशीर ठरत नाही. त्यातूनही प्रा.लि.कं.कडून मिळणाऱ्या डिव्हीडंडची कर मुक्तता, शेअर्समधील गुंतवणुकीस वेल्थ टॅक्सखाली मिळणारी सूट इत्यादी गोष्टींचाही विचार करावयास हवा.

एक गोष्ट खरी की, दिवसेंदिवस लोक या विषयासंबंधी जसजसे जास्त जाणून घेत आहेत, तसतशी प्रा.लि.कं.ची लोकप्रियता/पसंती अधिकाधिक वाढत आहे.

व्यवसायास सुरुवात करताना भागीदारी ठेवून व्याप वाढेल तसे त्याचे रूपांतर प्रा.लि.कं.त करणाऱ्यांची संख्याही खूप आहे.

असे रूपांतर केव्हा आणि कसे करावे व ते करताना काय काळजी घ्यावयास हवी ते आपण पुढील लेखात बघायचे आहे.

विवेक, ३-०६-१९८४

* * *

# प्रायव्हेट लिमिटेड कंपनीत रूपांतर का व कसे?

मागील लेखात आपण भागीदारी व्यवसाय व प्रायव्हेट लिमिटेड कंपनी यांच्या स्वरूपाचा तुलनात्मक अभ्यास केला. चालू व्यवसायात वैयक्तिक व भागीदारी संस्थेचे रूपांतर प्रायव्हेट लिमिटेडमध्ये केव्हा व कसे करायचे असा एक प्रश्न नेहमी विचारला जातो व त्यात येणाऱ्या अडचणींवर मात कशी करायची याचा विचार प्रामुख्याने आपल्याला या लेखात करायचा आहे.

असे रूपांतर केव्हा करायचे हे प्रत्येक व्यवसायाचे स्वरूप, व्याप्ती, उत्पन्न, भांडवलाच्या गरजा इत्यादी लक्षात घेऊन करायचे असते. अशा व्यवसायातून मिळणारे उत्पन्न व त्यावर भरायला लागणारा आयकर इत्यादी गोष्टींचा प्रामुख्याने विचार करायला लागतो.

सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की वैयक्तिक उत्पन्नावर भरायला लागणारा कर ५०%च्या पुढे जायला लागला की प्रायव्हेट लिमिटेडच्या दिशेने वाटचाल करायला हवी. तसेच व्यवसायात लागणाऱ्या भांडवलाच्या गरजा वाढू लागल्या अथवा अन्य व्यवसायात सहभागी करून घेणे आवश्यक वाटू लागले की प्रायव्हेट लिमिटेडचा विचार करायला हवा.

**कर बचतीचा लाभ**

प्रायव्हेट लिमिटेड करून कर बचत होते काय? होय. परिस्थितीनुरूप बऱ्याच केसेसमध्ये हे शक्य होते. तसेच उत्पन्नाची विभागणी अधिक व्यापक पायावर होऊ शकते. खासगी अथवा भागीदारी व्यवसायात मालक अथवा भागीदारांना देण्यात येणारे व्याज, पगार, प्रवास भत्ते इत्यादींसारख्या खर्चासाठी वजावट मिळत नाही. मात्र प्रायव्हेट लिमिटेडमध्ये याच व्यक्ती संचालकांच्या रूपाने वावरू लागल्या, तर त्यांच्यावर होणाऱ्या अशा प्रकारच्या खर्चासाठी वजावट मिळू शकते.

तसेच भागीदारीत नवरा व बायको एकाच भागीदारी संस्थेत असले, तर त्यांचे उत्पन्न जोडले जाऊन त्यावर एकत्रितरीत्या कर आकारणी होते. या उलट, प्रायव्हेट लिमिटेडमध्ये अशा व्यक्ती एकाच वेळी संचालक म्हणून राहून प्रायव्हेट लिमिटेडमधून पगार घेऊ शकतात व त्यांच्या उत्पन्नाची जोडणी होत नाही.

प्रायव्हेट लिमिटेडमधून लाभांशाच्या स्वरूपात मिळणारे उत्पन्न (डिव्हिडंड), आयकर कायद्याच्या कलम ८०एल खाली रु. ७००० पर्यंत करमुक्तीस पात्र असते. अशी करमुक्ती प्रत्येक व्यक्तीच्या बाबतीत स्वतंत्ररीत्या मिळते.

व्यवसायाच्या वाढत्या व्याप्तीबरोबरच त्याच्या भांडवलाच्या गरजा वाढत जातात. तसेच अनेक वेळा तंत्रज्ञ व इतर क्षेत्रातील व्यावसायिकांना व्यवसायात सामावून घेणे व्यवसायाच्या हिताचे ठरते. अशा वेळीदेखील व्यवसायाचे प्रायव्हेट लिमिटेडमध्ये रूपांतर करणे आवश्यक व हिताचे ठरते.

**काही समस्या**

असे रूपांतर करताना अनेक प्रश्न निर्माण होतात. कायदेशीर, आर्थिक, कामगारविषयक, धंदेविषयक, करविषयक इत्यादी नाना तऱ्हेच्या समस्या उद्भवतात. त्या सर्वांचा साकल्याने विचार करून मगच असे रूपांतर अथवा हस्तांतर करताना कोणत्या मार्गाचा अवलंब करायचा ते ठरवावे लागते.

उदाहरणार्थ, असे रूपांतर करताना पहिला मोठा प्रश्न उद्‌भवतो तो नामांतराचा. प्रायव्हेट लिमिटेड करताना आपल्या जुन्या फर्मचे अथवा तत्सदृश नाव उपलब्ध होईलच असे नव्हे. त्यामुळे जुन्या नावाशी जी एक व्यावसायिक प्रतिष्ठा (Goodwill) जोडली गेलेली असते, तिचा लाभ मिळणे नव्या फर्ममध्ये कठीण होत जाते. तसेच जुन्या नावात काही परवाने, नोंदणी, प्रमाणपत्रे वा इतर काही सवलती उपलब्ध झालेल्या असल्या, तर त्यांचे हस्तांतर प्रायव्हेट लिमिटेडकडे करणे दरवेळी शक्य होतेच असे नाही.

जुन्या फर्मकडे काही स्थावर मालमत्ता असली, तर तिचे हस्तांतर करणे हे अतिशय खर्चीक होऊन बसते. त्यावर स्टॅम्पड्यूटी भरण्याचा प्रश्न उद्‌भवतो. तसेच त्याचा बाजारभाव व योग्य किंमत ठरवणे हेदेखील एक अतिशय क्लिष्ट, पण तेवढेच महत्त्वाचे काम ठरते.

जुन्या फर्ममधील भागीदारांचे भांडवल व नफातोटा वाटणीचे प्रमाण तसेच ठेवणे, हेदेखील एक नाजूक काम असते.

असे हस्तांतर करताना जुन्या फर्मचे गुडविल ठरवणे व त्यावर कायद्याच्या चौकटीत राहून कर बचत कशी होईल हे बघण्यासाठी कुशल व अनुभवी कर सल्लागाराचे मार्गदर्शन घ्यावे लागते. जुनी फर्म एम.आय.डी.सी. औद्योगिक वसाहतीत वसलेली असली, तर तिच्या मालकीचा गाळा अथवा

प्लॉटचे हस्तांतर करण्यास प्रतिबंध असतो. अशा वेळी यासंबंधीच्या कुठल्याही नियमांचे उल्लंघन न करता असे हस्तांतर करावे लागते.

**हस्तांतरासाठी आवश्यक तरतुदी**

असे हस्तांतर करताना जुन्या फर्मची सर्व मालमत्ता, देणी-घेणी इत्यादी नवीन प्रायव्हेट लिमिटेडकडे सुपुर्द करायची की काही ठरावीक मालमत्ताच विकायची, तसेच प्रायव्हेट लिमिटेड सुरू झाल्यावर जुनी फर्म बंद करायची की एकाच वेळी दोन्ही फर्मस चालू ठेवायच्या हेदेखील महत्त्वाचे प्रश्न ठरतात. जुन्या फर्ममधील कामगार वर्ग व त्यासंबंधीची आर्थिक जबाबदारी हे दोन्ही कसे हाताळायचे हा एक नाजूक प्रश्न असतो.

जुन्या फर्मची बाजारपेठ, कंत्राटे, इत्यादी प्रायव्हेट लिमिटेडकडे वळती करून, ती टिकवायची, तसेच बाजारातील पतीचा (credit) फायदा चालू ठेवायचा हे एक अतिशयन जिकिरीचे काम असते.

एवढेच नव्हे तर जुन्या फर्ममध्ये बँका अथवा पतपुरवठा करणाऱ्या इतर कुठल्या संस्थेकडून काही कर्ज घेतलेले असले, तर प्रायव्हेट लिमिटेडकडे त्याचे योग्यरीत्या हस्तांतर होईल हे बघणे महत्त्वाचे ठरते.

हे सर्व करताना कुठे उगाचच अवाजवी कर आकारणी होत नाही ना, तसेच कागदपत्रांमध्ये कायद्यासंबंधीच्या काही उणिवा राहत नाहीत ना, हे कसोशीने बघायला लागते. तसेच संबंधित व्यक्तींमध्ये काही भांडण-तंटे अथवा बखेडे निर्माण होऊन व्यवसायाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यायला लागते.

या व अशाच अनेक समस्यांचा साकल्याने विचार करून हे रूपांतर कसे घडवून आणायचे हे ठरवावे लागते. यासाठी ज्या वेगवेगळ्या पद्धतींचा अवलंब केला जातो, त्यांचा सर्वसाधारण विचार थोडक्यात करू या. यांपैकी कुठल्याही पद्धतीचा अवलंब करायचा असला, तरीदेखील आधी प्रायव्हेट लिमिटेड कंपनीची नोंदणी करून तिला प्रथम अस्तित्वात आणणे आवश्यक असते.

**१) जुन्या फर्मचे हस्तांतर टप्प्याटप्प्याने**

या पद्धतीत जुन्या फर्मची मालमत्ता टप्प्या-टप्प्याने प्रायव्हेट लिमिटेड कंपनीस विकण्यात येऊन तिचा व्यवसाय वाढवला जातो. जुन्या फर्मचा व्यवसाय हळूहळू कमी करत तिची देणीघेणी चुकती केली जातात व शेवटी

ती फर्म बंद केली जाते. ज्या ठिकाणी हस्तांतर एकदम करणे आवश्यक नसते अथवा फारशी स्थावर मालमत्ता असत नाही तिथे या पद्धतीचा वापर करणे शक्य होते. विशेषत: नुसत्याच व्यापारी पेढ्या (ट्रेडींग कंपनीज)च्या बाबतीत हे शक्य होते. उत्पादन क्षेत्रात असलेल्या पेढ्यांच्या बाबतीत या पद्धतीचा अवलंब करणे कठीण असते.

**२) संपूर्ण पेढी एक चालू व्यवसाय म्हणून घेणे**

या पद्धतीत जुन्या पेढीच्या संपूर्ण व्यवसायाची किंमत ठरवून ती तिच्या देण्या-घेण्यासहित प्रायव्हेट लिमिटेडमध्ये सामावून घेण्यात येते. अशा वेळी जुन्या पेढीची नोंदणीपत्रके, परवाने, कोटे, क्लेमस् इत्यादी सर्व प्रायव्हेट लिमिटेडकडे गुडविलसहित वर्ग करण्यात येतात.

या पद्धतीत स्टॅम्पड्युटी इत्यादींचा खर्च बराच येतो. तसेच कामगारविषयक ग्रॅच्युइटीसारख्या सर्व जबाबदाऱ्या प्रायव्हेट लिमिटेड कंपनीस स्वीकाराव्या लागतात. तसेच असे करताना जुन्या पेढीत इनव्हेस्टमेंट अलाऊन्स वगैरेंसारखे फायदे घेतलेले असले, तर ते परत करायला लागणार नाहीत अशा तऱ्हेने प्रायव्हेट लिमिटेडची उभारणी करणे आवश्यक असते. जुन्या पेढीच्या मालमत्तेची किंमत ठरवताना ती अवाजवीरीत्या कमी किंवा अधिक होत नाही ना याची काळजी घेणे आवश्यक असते. अन्यथा गिफ्ट टॅक्सखाली कराची जबाबदारी येण्याची शक्यता असते. तसेच गुडविलची किंमत काळजीपूर्वक व तज्ज्ञांकडून ठरवून घेणे आवश्यक असते.

एम.आय.डी.सी.सारख्या औद्योगिक वसाहतीतील मालमत्तेचे अशा रितीने हस्तांतर करताना नियमांचे उल्लंघन होऊन आर्थिक बोजा वाढत नाही ना याची काळजी घ्यावी लागते.

**३) चालू व्यवसायात प्रायव्हेट लिमिटेडला भागीदार करून नंतर दुसऱ्या टप्प्यात वैयक्तिक भागीदारांनी निवृत्त होणे.**

वर उल्लेख केलेल्या बऱ्याचशा समस्यांवर या पद्धतीचा अवलंब केल्यास मात करता येते. या पद्धतीत चालू व्यवसायात प्रायव्हेट लिमिटेड कंपनीस आधी भागीदार करून घेण्यात येते आणि नंतर दुसऱ्या टप्प्यात इतर भागीदारांनी व्यवसायातून निवृत्त होऊन भागीदारी बंद करून तिचा व्यवसाय सर्वस्वी प्रायव्हेट लिमिटेडच्या हवाली करण्यात येतो. यात चालू व्यवसायाच्या मालमत्तेची विक्री होत नसल्यामुळे स्टॅम्पड्यूटीचा खर्च होत

नाही, तसेच रुढार्थाने हस्तांतर होत नाही. चालू व्यवसायाचे नाव बदलणे अथवा नोंदणी परवाने हे परत करणेदेखील टाळता येते व हे रूपांतर सुलभरीत्या होते. मात्र रूपांतराचे सर्व कागदपत्र अतिशय काळजीपूर्वक करणे आवश्यक असते.

या पद्धतीतही जुन्या पेढीच्या सर्व जबाबदाऱ्या साहजिकपणेच व्यवसायाबरोबर प्रायव्हेट लिमिटेडकडे येतात. तसेच कॅपिटल गेन टॅक्स वाचवता येणे शक्य होते.

**४) जुनी पेढी प्रायव्हेट लिमिटेड** कंपनी**स भाडेपट्ट्याने (लीजवर) चालवण्यास देणे.**

या पद्धतीने जुन्या पेढीतले मालमत्तेचे व उत्पन्नाचे मूल्यांकन करून तिचे वार्षिक/मासिक भाडे ठरवले जाते व त्या मोबदल्यात तो व्यवसाय प्रायव्हेट लिमिटेड कंपनीवर सोपवला जातो. त्यामुळे कुठल्याही मालमत्तेचे हस्तांतर होत नाही व गुडविल, कॅपिटल गेन यांचे मूल्यांकन करून त्यावर कर भरण्याचा प्रश्न उद्भवत नाही. जुनी पेढी व प्रायव्हेट लिमिटेड कंपनी एकाच वेळी चालू राहतात. व्यवसायात नफातोटा झाल्यास तो प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचा असतो व जुन्या पेढीस भाडे ठरले असेल त्याप्रमाणे ठरावीक उत्पन्न मिळते.

मात्र अशा पद्धतीत प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला आपल्याकडील मालमत्तेच्या तारणावर वगैरे कर्ज घेण्याबाबत बरीच बंधने येतात. इनव्हेस्टमेंट अलाऊन्ससारखे फायदे परत घेतले जाण्याची शक्यता निर्माण होते.

औद्योगिक वसाहतीतील व्यवसायाचे हस्तांतर/रूपांतर करणे या पद्धतीत कठीण होते.

याशिवायही इतर काही पद्धतींचा अवलंब करणे शक्य होते. मात्र कुठल्या पद्धतीचा अवलंब करायचा हे प्रत्येक व्यवसायाचे स्वरूप, गरज व व्याप्ती लक्षात घेऊन ठरवायला हवे हे पुन्हा सांगावेसे वाटते.

ह्या आणि अशाच परिस्थितीत गुडविल दिले-घेतले जाते. त्याची कर आकारणी कशी होते ते आपण पुढील लेखात बघायचे आहे.

विवेक, १-०७-१९८४

* * *

# जपानला भीती दक्षिण कोरियाची आणि तैवानची

जपानची राजधानी टोकियो येथे गेल्या ऑक्टोबर महिन्यात भरलेल्या 'इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन प्रॉडक्टिव्हिटी अँड क्वालिटी इंप्रूव्हमेन्ट : स्टडी ऑफ अ‍ॅक्च्युअल केसेस'च्या निमित्ताने जपानला जाण्याचा योग आला. त्याचबरोबर ओसाका येथील आंतरराष्ट्रीय मशीन टूल प्रदर्शनासही भेट दिली. जपानमधील काही छोटे-मोठे कारखाने बघावयास मिळाले. अनेक लोकांना भेटता आले. चर्चा करावयास मिळाली आणि त्या सर्वांतून असे जाणवले की, जपान ही एक ऐश्वर्याच्या शिखरावर स्थिरावलेली औद्योगिक संस्कृती होय. तेथील बारा दिवसांच्या वास्तव्यात या संस्कृतीचे जे दर्शन घडले ते केवळ विलोभनीय होते.

जपानमध्ये ऐश्वर्य आहे असे मी म्हणतो याचे कारण असे की, अन्न-वस्त्र-निवारा या माणसाच्या मूलभूत गरजा भागविण्याची क्षमता सर्वसाधारणत: प्रत्येक कुटुंबातून निर्माण झाल्याचे दिसून येते. एवढेच नव्हे तर टी.व्ही., फ्रीज, एअरकंडिशनर, मोटार वगैरे आपल्याकडे चैनीच्या म्हणून समजल्या जाणाऱ्या वस्तू तिकडे दैनंदिन गरजांत आल्या असून प्रत्येक तिसऱ्या कुटुंबाकडे मोटार असल्याचे आम्हांला सांगण्यात आले. छोट्याछोट्या गावांतूनदेखील इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक्सच्या वस्तू आणि उपकरणांनी भरभरून ओसंडणारी दुकाने याची प्रचिती देत होती.

**स्थिर उद्योग व्यवस्था**

हे ऐश्वर्य स्थिरावले आहे, रुजले आहे असे मी म्हणतो याचे कारण असे की, जपानमध्ये बेकारी ४ टक्क्यांपेक्षा कमी आहे, आणि बेकारीच्या तेवढ्या टक्केवारीनेदेखील जपान सरकार, उद्योजक, विचारवंत आणि सर्वसाधारण जनता बेचैन झाल्याचे प्रत्ययही जाणवत होते. तसेच जपानी उद्योजक आता आपला माल नव्हे, तर तंत्र निर्यात करण्यास उत्सुक आहे. उद्योगव्यवस्था स्थिरावल्याचेच हे लक्षण होय. आणि ही नुसतीच उद्योगव्यवस्था नव्हे, औद्योगिक वाढ नव्हे, तर एक मनोहारी संस्कृती होय. कारण हे ऐश्वर्य भूगर्भातून मिळणारे खनिजतेल निर्यात करून आलेले नव्हे. तसेच चोरट्या आंतरराष्ट्रीय व्यापाराला उत्तेजन देऊनही नव्हे. नुसत्याच आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करूनही नव्हे, किंवा आपली हत्यारे खपविण्यासाठी आंतरराष्ट्रीय लढाया लावूनही नव्हे. साम्यवादी बडगा दाखवून नव्हे, की धर्माच्या नावानेही नव्हे.

जपान हे सर्व साधू शकले ते त्यांच्या अंगभूत उद्यमशीलतेमुळे. राष्ट्रीय चारित्र्यामुळे. वस्तू व तंत्रात सतत सुधारणा घडवून आणण्याची कास धरल्यामुळे. कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीने काम करायचे असते या जाणिवेतून आणि राष्ट्र स्वयंपूर्ण बनवायचे असले, प्रगतिपथावर न्यायचे असले, तर प्रत्येक व्यक्ती, प्रत्येक कुटुंब हे घटक मानून त्याप्रमाणे वाटचाल करायला हवी याची जाणीव ठेवल्यामुळे.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे मुलाला भूक लागल्यानंतर ते आईकडे ज्या भाषेत अन्नाची मागणी करते, त्याच भाषेत त्याला जाण आल्यानंतर ज्ञानही मिळायला हवे याचे महत्त्व जपानने जाणले. त्यामुळे मुलांचे घरातील आणि शाळेतील संस्कार यांत कधी भिन्नता येत नाही.

**केवळ पुस्तकी नव्हे**

उद्योगात 'झिरो डिफेक्ट', 'ग्रूप डिस्कशन' या संज्ञा व त्यातून सुधारणा घडवून आणण्याचे तंत्र प्रथम जपानने जगाला दिले. आणि व्यवस्थापनशास्त्रात आता जगात सगळीकडेच या विषयावर पुस्तके लिहिली जाऊन चर्चा होत असली, तरी त्याचे प्रात्यक्षिक मात्र जपानी कारखान्यांतून बघावयास मिळाले. परिषदेत जपानी उद्योगाचे अग्रणी जे बोलले, ते केवळ औपचारिक अथवा पुस्तकी स्वरूपाचे नव्हते, तर त्यास कृतीची जोड आहे हे अनुभवास आले.

कारखान्याच्या आवारात प्रवेश केल्यानंतर कामगारांप्रमाणेच मालक, अधिकारीवर्ग आणि भेट द्यायला येणाऱ्या पाहुण्यांनीदेखील गणवेषाचा गाऊन घालून हिंडण्याचा दंडक, कामगार-मालक यांतील अंतर कमी करणारा वाटला. कामगारांचे छाटेछोटे गट करून त्यांना आपल्या उत्पादित वस्तू, तंत्र, साधने यावर चर्चा करायला वाव देऊन त्यात सुधारणा करण्यास उत्तेजन दिल्यामुळे सतत सुधारणा करण्यास दिशा मिळते व मदत होते. तसेच कामगारांचे आपला व्यवसाय व हत्यारांवरील प्रेम वाढून तो जाळपोळ अथवा मोडतोड करण्यास उद्युक्त होत नाही. हत्यारांची आदळआपट नाही की कामाच्या वेळात हातावर तंबाखू चोळणे नाही. कारखान्याच्या आवारात अथवा रस्त्यावर पचापच थुंकणे नाही की सिगरेटची थोटके फेकणे नाही. अपवाद फक्त आमच्यासारख्या त्या संस्कृतीशी विसंगत वर्तन करणाऱ्या प्रवाशांचा. प्रत्येक कारखान्यातून फिरणे हे एखाद्या सुंदर उपवनातून फेरफटका मारण्यासारखे आल्हाददायक होते.

रोज लागणाऱ्या कच्च्या मालाचा अचूक अंदाज, अत्यंत प्रभावी विक्रयव्यवस्था आणि पुरवठ्यातील नियमितपणा यामुळे होंडा मोटर्ससारखे अनेक कारखाने आज 'नो स्टॉक'च्या तत्त्वावर चाललेले बघून तोंडात बोट न गेले तरच नवल.

**आततायीपणा नाही**

जे बघितले ते केवळ एक विकसित तंत्र नव्हते. नुसती औद्योगिक वाढ अथवा सुधारणा म्हणून बोळवण करण्यासारखे नव्हते. ती होती एक औद्योगिक संस्कृती. सुजाण कारखानदार, जबाबदार कामगार, प्रभावी व सुधारित हत्यारे आणि अवजारे, अत्याधुनिक तंत्रज्ञान, सुरक्षित कार्यपद्धती आणि कामाचा सुयोग्य मोबदला हे औद्योगिक संस्कृतीचे विविध पैलू होत. या सर्वांचे मनोहारी मिश्रण जपानी कारखान्यांतून बघावयास मिळाले. जपानमध्ये संप होत नाहीत काय? होतात. पण आततायीपणा नाही. उद्योगाबाहेरील लोकांचा कामगारांवर जाणवण्याइतपत प्रभाव नाही. मोडतोड, जाळपोळ, मारझोड नाही अशी माहिती मिळाली. जे कारखान्यांतून बघितले त्याचाच प्रत्यय रस्त्यावर, स्टेशनात, दुकानात, हॉटेलात सगळीकडे आला. प्रत्येक गोष्ट अंतिम ग्राहकाची सोय आणि संतोष लक्षात घेऊन केलेली.

एका बाबतीत मात्र जपान खूपच मागासलेला दिसला. राष्ट्रोन्नतीसाठी स्थिर सरकारची आवश्यकता असते याची जाणीव तेथील राजकारण्यांना झालेली दिसली नाही. गेल्या दहा वर्षांत पाच पंतप्रधान होऊन गेले! भ्रष्टाचाराचे आरोप सिद्ध झालेले मंत्री आणि महामंत्री यांची चक्क हकालपट्टी करून आकाशवाणी, दूरचित्रवाणीसारख्या माध्यमांतून धिंडवडे काढतात! भावी पिढ्यांवर याचा काय परिणाम होईल याचा विचार होत नसावा हेच खरे!

असा हा जपान आर्थिक उन्नतीच्या शिखरावर स्थिरावलेला आहे. त्यास आपल्या स्थानापासून ढळण्याची भीती अमेरिका, जर्मनी अथवा औद्योगिकदृष्ट्या विकसित अशा तत्सम पाश्चिमात्य राष्ट्रांपासून वाटत नाही. तसेच चीन-रशियासारख्या साम्यवादी शेजाऱ्यांचीदेखील भीती वाटत नाही. तर त्यास भीती वाटते ती दक्षिण कोरिया आणि तैवानसारख्या राष्ट्रवादाने प्रेरित झालेल्या आणि आपल्याच मार्गाने औद्योगिक वाटचाल करणाऱ्या चिमुकल्या राष्ट्रांची.

## कोरिया व तैवान

कोरिया आपल्या बरोबर २ वर्ष आधी, म्हणजे १५ ऑगस्ट १९४५ रोजी स्वतंत्र झाला. त्यानंतर यादवी युद्धात फाळणी होऊन दक्षिण कोरिया आणि उत्तर कोरिया असे दोन भाग झाले. उत्तर कोरियाने साम्यवाद स्वीकारला. दक्षिणेने आपल्या जुन्या जपानी राज्यकर्त्यांचेच अनुकरण करायला सुरुवात केली त्यांचेच तंत्र-मंत्र-पद्धती आणि संस्कृती यांचा अवलंब करून त्याच शिडीवर चढून चढाओढीत भाग घेतला. जपानसारख्याच भुयारी गाड्या, तसेच फ्लायओव्हर्स, तीच मंगोल वंशीय माणसं, तोच राष्ट्रवाद, तीच कामसू वृत्ती, तीच शिस्त, सुधारणेची कास धरणारी व ऐश्वर्याचा मार्ग दाखवणारी तीच संस्कृती.

तैवानदेखील त्याच मार्गाने जात आहे. तैवानमध्ये आम्ही थांबलो नाही, पण तैवानच्या आकाशातून विमान जाताना खाली पावसाचे पाणी वाहून जाऊ नये म्हणून ठिकठिकाणी बांध-धरणे बांधून पाणी अडवून जलाशय निर्माण करून ठेवलेले दिसत होते. साठवून ठेवलेल्या याच पाण्याचे रूपांतर धनधान्याच्या विपुलतेत व औद्योगिक भरभराटीत होते. काही वर्षांपूर्वी महाराष्ट्रात असेच स्तुत्य प्रयत्न करण्यात आले. पण त्या धरणामुळे जमिनीत पाण्यापेक्षा पैसाच अधिक मुरला गेल्याचे जाणकार सांगतात.

## ऐश्वर्याबरोबर आळस

'ॲग्रिक्लचरल मिशनरी न्यूज' व 'फार्मिंग मेकॅनायझेशन' या नियतकालिकांचे तरुण संपादक व शिन नोरिशा कं.लि.चे अध्यक्ष श्री. योशिसुके कीशिडा यांच्या मते, जपानी माणूस आता सुखावला आहे. त्यामुळेच थोडा आळसावला आहे, तसेच थोडा बेफिकीरही झाला आहे. ऐश्वर्याबरोबर हे येणे अपरिहार्य आहे.

त्यामुळेच दक्षिण कोरिया आणि तैवानने सुरू केलेल्या या चढाओढीतही जपान आता शिखरावरील आपले स्थान किती वर्षे टिकवून ठेवतो हे बघणे उद्बोधक ठरेल, की एकापेक्षा अनेक अशी समांतर शिखरे निर्माण होतील? माझ्या मते येत्या पंधरा वर्षांत याचा निकाल लागावा. आंतरराष्ट्रीय युद्धाला तोंड द्यावे लागले नाही, तर जपानचे स्थैर्य व अनुभव आणि कोरिया-जपानचे स्थैर्य व अनुभव आणि कोरिया-तैवानची जिद्द यांतील रस्सीखेच सबंध औद्योगिक विश्वाला ढवळून काढील यात शंका नाही.

महाराष्ट्र टाइम्स, १६-०१-१९८३

# उद्योजक महाराष्ट्र

औद्योगिक क्रांतीमुळे समाजातील आर्थिक घटकांचे महत्त्व मोठ्या प्रमाणात वाढले व जगातील सर्व समाजांच्या रचनेलाच या क्रांतीने धक्का दिला. उत्पादनाचे वेगवेगळे घटक एकत्र आणून समाजाच्या गरजा पुऱ्या करणारा उद्योजकांचा वर्ग हळूहळू समाजामध्ये प्रतिष्ठित झाला. आर्थिक सत्तेद्वारा समाजाची सर्व सूत्रे हलवू लागला.

महाराष्ट्रीय मनाची जी जडणघडण झाली तिच्याशी हा नवा प्रवाह फारसा सुसंगत होता असे नाही. व्यापारासाठी लागणाऱ्या व्यावसायिक सौजन्याचा अन् महाराष्ट्रीयांचा छत्तीसाचा आकडा! व्यावसायिक शिस्त अंगी बाणवणे त्याच्या लढाऊ स्वभावात बसण्यासारखे नव्हते. या नव्या आर्थिक क्रांतीची पहाट काही आत्मकेंद्रित मराठी मनाला स्पर्श करू शकली नाही. व्यवसायामध्ये धोका पत्करण्यापेक्षा सुरक्षित नोकरी स्वीकारून आपल्या बुद्धिमत्तेचा उपयोग त्यांनी अन्य प्रांताच्या उद्योगपतींना एका बाजूने करून दिला व दुसऱ्या बाजूने अमहाराष्ट्रीयांच्या महाराष्ट्रावर होणाऱ्या आक्रमणाबद्दल तक्रारींनाही सुरुवात केली.

या परिस्थितीतही काळाची पावले ओळखून अनेक महाराष्ट्रीय उद्योगाच्या क्षेत्रात शिरले, त्यांनी आपला ठसा त्या क्षेत्रावर उमटवला. त्यांपैकी काही मोजक्या उद्योगपतींची मुलाखत रूपाने वाचकांना परिचय घडवण्यासाठी हा विभाग.

आज परिस्थिती बदलते आहे. नोकरीमध्ये स्वत:ची सृजनशीलता गोठवून टाकण्यापेक्षा स्वतंत्र उद्योगांमध्ये तिला वाट करून द्यावी या प्रेरणेने अनेक महाराष्ट्रीय तरुण या क्षेत्रात उतरत आहेत. त्या सर्वांनाच या मुलाखती उपयोगी पडतील.

## गुलामगिरी

‘आजची शिक्षणपद्धती
घडवते केवळ नोकर!
‘आजची शिक्षणपद्धती,
नाही उपयोगाची, नोकरी मिळविण्यासाठी!
टीकेच्या या दोन टोकांमध्ये

आहे मोठ्ठी खाई,
आमच्या दस्यू वृत्तीची!
शिक्षण माणूस घडविण्यासाठी,
न की नोकरी मिळविण्यासाठी!
समजेल जेव्हा आम्हांस हे
वाटतील शिखरे खुजी,
रशिया-अमेरिकेच्या प्रगतीची!
दोन माणसे,
मारवाडी, गुजराथी किंवा पंजाबी
भेटतात जेव्हा एकमेकांना,
विचारतात-
'आपरो काई धंदो?'
'आपनो सूं कामकाज?'
'आप किस लाईनमे है जी?'
मात्र तीच असली जर,
मद्रास, केरळ अथवा मराठी अस्मितेची
विचारतात, करीत प्रदर्शन आपल्या दस्युत्वाचे-
'Where are you working, Sir?'
'Whom are you working for?'
'आपण कसली नोकरी करता?'
डोंबलाची!
अस्सा राग येतो!
दोष हा शिक्षणपद्धतीचा?
की आमच्या दस्यू वृत्तीचा?
गुलामगिरी, गुलामगिरी!
अन् जमेल तिथे उचलेगिरी!
राजकारणात दिल्लीची,
साहित्य अन् आचार-विचारात पश्चिमेची!
पोषाखात सगळ्यांची
अन् कामधंद्यात कुणाचीही!

पाश हे तुटायचे कधी?
मायाजाल हे विरायचे कधी?
दोष न हा शिक्षणाचा,
दोष हा पंगू संस्कारांचा!
संकोच हवा गुलामगिरीचा
न की
छोट्या-मोठ्या व्यवसायाचा!
गुलामगिरी ही थांबलीच पाहिजे!
अस्मिता प्रत्येकाची जागलीच पाहिजे!

महाराष्ट्र टाइम्स, महाराष्ट्र दिन विशेषांक, १९८५

* * *

# प्रगतीची विलोभनीय झेप

उद्योगाच्या क्षेत्रात हरीभाऊ दिवेकरांसारखे तरुण सव्यसाची उद्योजक विरळेच! कानडी धाटणीचे मराठी बोलणारा, कर्नाटकातील शिमोग्याचा हा तरुण आपली इंजिनियअरींगमधली पदवी घेतल्यानंतर मुंबईतील 'भांगर ब्रदर्स अँड कंपनी प्रा.लि.' या कंपनीत १९६४ मध्ये मासिक रु. २५० वेतनावर नोकरी करू लागला. परंतु पाच महिन्यांनंतर त्या नोकरीचा राजीनामा देऊन राज्य सरकारच्या उद्योग खात्यात कारखाना निरीक्षक म्हणून कामास लागून आपल्या आधीच्या कंपनीस तांत्रिक सल्लाही देऊ लागला.

कारखाना निरीक्षक म्हणून काम करताना उद्योगधंद्यातील खूपच गोष्टींचे त्यांनी निरीक्षण केले. तांत्रिक बाबींवरून कारखानदारांना सतावून पैसे कमावण्याचा राजमार्ग सोडून तेथील उद्योगाचे तंत्र शिकण्याचाच उपद्व्याप करू लागले!

**दूरदृष्टीची वाटचाल**

त्याचाच परिणाम म्हणून १९७१ मध्ये ही राजस चाकरी सोडून अतिशय तोकड्या भांडवलावर 'मॅकइलक्' या नावाची एक भागीदारी फर्म त्यांनी सुरू केली. मुंबईतील कारखान्यांना प्रेशर व्हेसल्स आणि चेन पुली ब्लॉक्सचे टेस्टींग करून प्रमाणपत्र देणे, त्यांची देखभाल आणि दुरुस्ती करणे वगैरे असे धंद्याचे स्वरूप होते. त्याचबरोबर घरखर्च चालण्यास मदत व्हावी म्हणून व मुख्यत: धंद्यातील अधिक प्रगत तांत्रिक ज्ञान मिळवण्याच्या उद्देशाने क्रॉम्प्टन पार्किन्सन लि.च्या मोटर डिपार्टमेन्टमध्ये महिना रु. २५० वर उमेदवारीदेखील पत्करली. सुमारे पंधरा महिन्यांच्या या उमेदवारीनंतर पुन्हा भांगर बदर्स प्रा.लि.मध्ये चीफ इंजिनियर म्हणून नोकरी पत्करून त्यात सहा वर्षे काढली.

मात्र नोकऱ्या बदलण्याचा हा प्रकार अस्थिर मानसिक परिस्थिती अथवा निर्णय न घेण्याच्या कुवतीतून उद्भवत नव्हता. तर उद्योगातील विविध अंगांचे सखोल ज्ञान करून घेऊन अनुभवाचे भांडार वाढवून मोठ्या उद्योगाचा पाया रचण्याची ही पद्धतशीर तयारी होती. मध्यंतरी १९६८ मध्ये त्यांचे लग्न झाले, तसेच एका बाजूला मॅकइलक्ची वाटचालही चालूच होती.

शिमोग्यास वडिलांनी १९६८ मध्ये आपल्या इतर मुलांच्या साहाय्याने 'भारत फाऊन्डेर्स' या नावाचा एक फाऊन्ड्री उद्योग काढला. त्यात

सेन्ट्रीफ्युगल कास्टिंग्ज व सिलिंडर लायनर्सच्या उत्पादनास सुरुवात झाली आणि हरीभाऊंनी त्याच्या विक्रीव्यवस्थेची जबाबदारी स्वीकारली. १९६८ साली केवळ पंधरा हजार रुपये भांडवल गुंतवून सुरू केलेल्या या कारखान्याची विक्री १९७२ मध्ये तीन लाख रुपये होती. हरीभाऊंनी आपल्या विक्री कौशल्याने हीच विक्री १९७५ मध्ये ८० लाख रुपये आणि १९८० मध्ये चार कोटींवर नेऊन पोहोचवली. कुठल्याही कारखान्यास हेवा करावासा वाटावा अशीच ही वाटचाल आहे.

**आदर्श वातावरणामुळेच!**

ही तुफान विक्री आणि अफाट वाढ एवढेच या कारखान्याचे वैशिष्ट्य नव्हे. त्याचे वेगळेपण आहे ते त्यांनी वाढीस लावलेल्या इतर कारखानदारीत. जाहिराती देऊन तरुण तंत्रज्ञांना बोलावून त्यांनी शिमोग्यास आपल्या कारखान्याच्या आवारात आणि आवतीभोवती इतर पूरक कारखाने काढण्यास उत्तेजन दिले. जागा दिली. आर्थिक साहाय्य मिळवून दिले. विक्रीची हमी दिली. याचाच परिणाम म्हणजे या सर्व उद्योगसमूहाची विक्री १९८० मध्ये चार कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आणि एकूण भांडवल गुंतवणूक ६० लाख रुपयांपर्यंत!

या कुठल्याही कारखान्यात सुरुवातीपासून आजपर्यंत एकही कामाचा तास संपामुळे वाया गेला नाही, असे हरीभाऊ अभिमानाने सांगतात. कामगारांना सुयोग्य वेतन, कामाच्या वेळात पोषक अन्न व बरोबरीची वागणूक हे सर्व घटक यास जबाबदार आहेत. तसेच औद्योगिक केंद्रापासून लांब असणे आणि कामगार संघटनांवर उद्योगाबाहेरील शक्तींचा प्रभाव नसणे या गोष्टींचादेखील परिणाम उत्पादनवाढ आणि चांगल्या औद्योगिक संबंधांवर होतो हे हरीभाऊ मान्य करतात.

**उंच, अधिक उंच**

मात्र हे सर्व करत असताना कर्नाटकातील अनिश्चित आणि अनियमित वीज पुरवठ्यास सातत्याने तोंड द्यावे लागत असल्याची खंत हरीभाऊ व्यक्त करतात. एवढे असूनही आज किर्लोस्कर उद्योगसमूहातील सर्व कंपन्या, रस्टन इंगरसोल रॅन्ड, भारतीय रेल्वे अशा अनेक खासगी व सरकारी उपक्रमांना पिस्टन लायनर्सचा पुरवठा सर्वस्वी आपल्या उद्योग समूहाकडून होत असल्याचे हरीभाऊ अभिमानानं सांगतात व १९८५ मध्ये बारा कोटी

रुपयांच्या उलाढालीचे लक्ष्य ठेवतात. आपल्या या यशाचे रहस्य ते प्रामुख्याने आपल्या मालाची गुणवत्ता, उच्च दर्जाचे तंत्र, पुरवठ्यातील नियमितपणा व कामगारांचे सहकार्य यांस देतात.

हरीभाऊंचे वैशिष्ट्य हे केवळ त्यांच्या उद्यमशीलतेपुरतेच मर्यादित नव्हे. ते विलक्षण संगीतप्रेमी आहेतच. पण त्याहीपेक्षा गेल्या दोन-तीन वर्षांत ठाणे-पुणे-मुंबई येथे सर्प प्रदर्शन भरल्याचे आपल्या वाचण्या-बघण्यात आणि ऐकण्यात आले असणार. तसेच दूरदर्शनवरदेखील एका प्रसन्न व्यक्तिमत्त्वाची मुलाखत त्याच संदर्भात बघितली असणार. त्या प्रदर्शनामागची प्रेरणा ह्याच प्राणिमित्र आणि निसर्गप्रेमी दिवेकरांची. बघताबघता स्वैर झेपावणाऱ्या नागास पकडून पोतडीत बंदिस्त करण्याचे हरीभाऊंचे कसब मी स्वत: तलासरीच्या रानात बघितले आहे. ते बॉम्बे नॅचरल हीस्टरी सोसायटीच्या कार्यकारिणीचे क्रियाशील सभासद आहेत. तसेच ठाण्यातील जनीजनार्दन सेवासमितीचे संस्थापक विश्वस्तही आहेत. जंगली म्हशी या वन्य प्राण्यावरील त्यांचे संशोधन आणि अभ्यास त्या क्षेत्रात मार्गदर्शक समजले जाते.

महाराष्ट्र टाइम्स, १५-१२-१९८२

* * *